म. ग्रं. सं. ठाणें
निवांध
४२०.

१६-८-३१

# कादंबरीची गोष्ट

REFBK-0003294

लेखक,
गणेश रंगनाथ दंडवते.

विषय :—
वाङ्मयाचा
इतिहास

" श्री सयाजीसाहित्यमाला "–पुष्प १२० वें

( प्रकीर्ण–गुच्छ )

# कादंबरीची गोष्ट.

लेखक व प्रकाशक

गणेश रंगनाथ दंडवते

लायब्ररीयन सेंट्रल लायब्ररी, बडोदें

आणि

बडोद्याचें मराठी साहित्य, महाराष्ट्र–नियतकालिकदीपिका इ. पुस्तकांचे कर्ते.

मुद्रक

भगवंत बळवंत पाळेकर

जागृति प्रेस, रावपुरा–बडोदें

REFBK-0003294

इ. स. १९२७ | किंमत १–०–० | प्रथमावृत्ति
संवत १९८३ | | ५०० प्रति.

श्री.

# जाहिरात.

आपल्या देशी भाषेच्या साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें पतितपावन श्रीमंत सरकार महाराज साहिब श्रीसयाजीराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादुर, जी. सी. एस. आय., जी. सी. आय. ई., एलएल. डी., ह्यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्रीसयाजी साहित्यमाले"तून विविध विषयांवर पुस्तकें तयार करविण्यांत येत असतात.

तदनुसार हें '**कादंबरीची गोष्ट**' या नांवाचें पुस्तक रा. रा. गणेश रंगनाथ दंडवते, बडोदें ह्यांचेकडून तयार करवून उक्त मालेंतील "प्रकीर्ण गुच्छां"त एकशें विसावें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| भाषांतरशाखा,<br>विद्याधिकारी कचेरी,<br>बडोदें, ता ८-१०-२७ | **भ. भा. महेता,**<br>भा. म.<br>( अ. ) | **नं. के. दीक्षित.**<br>विद्याधिकारी,<br>बडोदें राज्य. |

# उपोद्घात.

पुस्तक लिहूनही तें लिहिण्याची कल्पना लेखकाच्या मनांत प्रथम कशी उद्भवली हें उपोद्घात लिहिते वेळीं त्यास खरोखरीच स्मरत नाहीं, याबद्दल तो दिलगीर आहे. अशा स्थितींत त्याला येथें एवढेंच सांगणें पुरे आहे कीं, बडोदें येथील सेंट्रल लायब्ररींतील त्याची नोकरी व मराठी वाङ्मयाचा त्याचा अल्प व्यासंग या दोहोंच्या संयोगाचेंच प्रस्तुत पुस्तक एक दृश्य फल आहे. मराठी वाङ्मयासंबंधीं अमुक एक प्रकारची अपूर्तता दूर करण्याची प्रौढी हें पुस्तक मिरवीत नाहीं अलबत त्याच्या वाचकांस कांहीं उपयुक्त व तशीच मनोरंजक अशी माहिती देण्याची मात्र त्याला पूर्ण आशा आहे. तथापि येथील श्रीसयाजीसाहित्यमालेनें पुस्तक स्वीकारिलें नसतें तर लेखकास तें वाचकांच्या हातांत इतक्या लवकर खचित देतां आलें नसतें. श्रीसयाजीसाहित्यमालेच्या या उत्तेजनाबद्दल लेखक तिचा कृतज्ञतापूर्वक ऋणी आहे. त्याचप्रमाणें लेखकाच्या विनंतीस मान देऊन प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल श्रीयुत दाजी नागेश आपटे, बी ए. एल्. एल्. बी. यांचें व तसेंच पुस्तक अवघ्या दोन महिन्यांत छापून देण्याची मेहनत घेतल्याबद्दल येथील ' जागृति ' छापखान्याचे मालक रा रा. भगवंत बळवंत पाळेकर यांचें येथेंच आभार मानणें त्यास आपलें कर्तव्य वाटतें. पुस्तक लवकर छापविण्याच्या घाईत मुद्रणदोष बरेच राहिले आहेत. त्याबद्दल वाचकांजवळ क्षमायाचना करून त्यास पुढील आवृत्तींत ते न राहूं देण्याचें अश्वासन मात्र खचित देतां येतें.

बडोदें,<br>
ता १६ आक्टोबर सन १९२७. } ग्रंथकर्ता.

सं० १११
११..

# प्रस्तावना.

वाङ्मयाला पुष्कळ वेळां नदीची उपमा देण्यांत येते व ती अनेक दृष्टया सार्थ आहे. नदीप्रमाणेंच वाङ्मयाचा उगम कल्पनेच्या उच्चस्थापासून झालेला असतो व तोहि आरंभीं केवळ दृष्टमात्रच असतो; नंतर त्याचा प्रवाह नदीप्रमाणेंच काव्य, गद्य, इतिहास, चरित्रें, कादंबरी, नाटकें इत्यादि विविध प्रदेशांतून गेल्यामुळें त्याला कोठें गंभीर, तर कोठें उत्तान, कोठें रुक्ष तर कोठें सुंदर कोठें अरुंद तर कोठें विस्तृत असें स्वरूप येतें. नदीप्रमाणेंच त्याला निरनिराळ्या परभाषेंतील वाङ्मयाचे ओघ मिळून तें पुष्ट होत जातें, नदीच्या प्रवाहांप्रमाणेंच वाङ्मयाचा प्रवाहहि पुढें राष्ट्रांतील अथवा समाजांतील विशिष्ट कल्पनांचें वहनसाधन होतो व क्वचित् स्थानीं नदीच्या होणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणेंच वाङ्मयाचा प्रवाहहि क्वचित् प्रसंगीं देशभक्ति, धर्मश्रद्धा अथवा शास्त्रीय उन्नति वगैरेंची विद्युत् समाजांत उत्पन्न करूं शकतो. असें होतां होतां अखेर नदीप्रमाणेंच वाङ्मयाचा आकार व स्वरूप प्रचंड होऊन तें सहस्र मुखानें प्रसृत होतें.

मराठी वाङ्मयाचा प्रकारहि अर्थात् असाच आहे. त्यांतल्या त्यांत मराठी गद्यवाङ्मयाचा खरा प्रारंभ इंग्रजीशाहीनंतरचाच आहे. तत्पूर्वी कांहीं बखरी, पत्रें वगैरे एवढेंच काय तें गद्य होतें व

तेंहि वाङमयनिर्माणदृष्टया जन्माला आलेलें नव्हतें. इंग्रजी अमला-नंतर इंग्रजी वाङमयाचा जो परिचय मराठीला झाला त्यामुळेंच मराठींत गोष्टी, कथानकें व पुढें कादंबऱ्या लिहिण्याचा परिपाठ पडूं लागला व तो आतां जोरांत येऊन बरीं, वाईट, मध्यम अशीं शेंकडों पुस्तकें हल्लीं बाहेर पडूं लागलीं आहेत. तेव्हां आरंभापासून आतांपर्यंतच्या पन्नास साठ वर्षांत जें हें कथात्मक वाङमय प्रसिद्ध झालें आहे त्यापैकीं बरेंचसें आतां सांप्रतच्या पिढीच्या दृष्टिपथाच्या पलीकडे गेलें आहे अथवा जाऊं लागलें आहे व म्हणूनच त्याचा आढावा कोठें तरी एक ठिकाणीं काढलेला असणें अवश्य आहे. विशेषतः मराठीचा प्रवेश आतां विश्वविद्यालयांत बहुशः पूर्णतेनें झाला असल्यानें तिच्यांतील स्वतंत्र अंगांचा अभ्यास करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. अशा वेळीं ही 'कादंबरीची गोष्ट' प्रसिद्ध करून रा. दंडवते यांनीं मराठी भाषेंत एका उपयुक्त ग्रंथाची भर टाकली आहे. कालानुक्रमानें गोष्टी, कथानकें, कादंबऱ्या कशा कशा लिहिल्या गेल्या त्या दर्शवून व एका स्वतंत्र प्रकरणांत मराठींतील प्रमुख कादंबऱ्यांच्या संविधान-कांचा सारांश देऊन, त्यांनीं कथावाङ्मयाचा एक चित्रफलकच वाचकांपुढें उभा केला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

रा. दंडवते यांचा हा ग्रंथ लिहिण्याचा उद्देश मर्यादित स्वरूपाचा आहे, हें ग्रंथाच्या आकारावरूनच ध्यानांत येईल. कादंबरी कशी असावी, तिच्या कथावस्तूचा परिपोष कसा झालेला

असावा, संविधानकाची जुळणी कशी असावी, तिच्यांतलि पात्रांचे स्वभाव कसे सांगावे वगैरेबद्दलच्या तत्त्वांची चर्चा करून त्या शास्त्रीय दृष्टीनें मराठी कादंबऱ्यांची चिकित्सा करणें इतका भारी उद्देश त्यांनीं आपल्या मनांत ठेवला नाहीं. तर साधारणतः नाम निर्देशपूर्वक कादंबऱ्यांची वाढ कसकशी होत गेली व दरेक प्रमुख कादंबरीकाराचें वैशिष्ठय काय आहे, ह थोडक्यांत सांगून मुख्य कादंबऱ्यांचें विषयदिग्दर्शन करविणें इतकाच यांचा हेतु आहे व तो चंगल्या रीतीनें पार पडला आहे. काहीं कांहीं जुन्या कादंबऱ्या तूर्त अनुपलब्ध आहेत व त्यामुळें त्यांचें पुनर्मुद्रण होईपर्यंत सर्व-साधारण वाचकवर्गाला त्यां या नांवापलीकडे कांहीं कळणें शक्य नाहीं. यासाठीं नमुन्यादाखल त्यांमधील चटकदार उतारे रा. दंडवते यांनीं दिल्यानें त्यांच्या स्वरुपाची थोडीबहुत कल्पना येण्यास मदत होईल

कांहीं जुन्या कादंबऱ्या सोडून दिल्या तर साधारणतः असें म्हणतां येईल कीं, कादंबऱ्यांची विषेश वाढ गेल्या पंचवीस तीस वर्षांतीलच आहे. अर्थात त्यांपैकींच्या कित्येकांचे जनक अजून हयात आहेत व त्यांचीं हीं ग्रंथापत्यें इतक्या लहान अवस्थेंत आहेत कीं त्यांच्या स्वरूपाविषयीं निःसंदिग्ध अभिप्राय ठरविण्याचा काल अजून आला नाहीं. त्यामुळें अशा अर्वाचीन कादंबरीकाराबद्दल रा. दंडवते यांनीं या ग्रंथांत जे अभिप्राय दिले आहेत अथवा त्यांना जे तुलनात्मक सापेक्ष महत्त्व दिलें आहे, तें वाचून प्रत्येक वाचकानें आपला स्वत.चा स्वतंत्र निर्णय करावा हें उत्तम.

रा. दंडवते हे येथिल सेंट्रल लायब्ररींत काम करीत असल्यानें हजारों पुस्तकें त्यांच्या हातून जातात तशींच ती लायब्ऱ्यांतुन काम करणाऱ्या इतर अनेक लोकांच्या हातून जातात. परंतु या संधीचा रा. दंडवते यांनीं स्वतः फायदा करून घेऊन, स्वश्रमानें तो उलट वाचकांना अधिक सुसंबद्ध रीतीनें देण्याचा जसा उपक्रम केला आहे तसा करण्याची प्रवृत्ति इतरांत फारच थोडी दिसून येते. या दृष्टीनें रा. दंडवत्यांचा हा उपक्रम प्रशंसनीय व अनुकरणीय आहे यांत शंका नाहीं. लंडन येथील ब्रिटिश लायब्ररीचे क्युरेटर व तेथील लायब्रेरिअन् यांनीं त्य ग्रंथालयांतील पुस्तकांचें आलोडन करून कसे सुंदर ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत हें पाहिलें म्हणजे हा क्रम इकडेहि कसा उचलण्यासारखा आहे हें ध्यानांत येईल. असो.

रा. दंडवते अशाच रीतीनें मराठी वाङ्मयांच्या इतर अंगांच्या संग्रहाचीं पुस्तकेंहि प्रसिद्ध करतील अशी आशा आहे.

बडोदें,
ता २१-८-१९२७

**दाजी नागेश आपटे.**

# अनुक्रमणिका.

| प्रकरण | पृष्ठ. |
|---|---|
| १ विषयप्रवेश | १ |
| २ प्रतिष्ठान तें पुणें | १९ |
| ३ कथावाङ्मयाचा अभ्युदय | २९ |
| ४ गोष्टीची कादंबरी | ४४ |
| ५ एक पाऊल पुढें | ५९ |
| ६ मनोज्ञ मन्वंतराचा पाया | ७४ |
| ७ पायाचें दृढीकरण | ९३ |
| ८ नंतरची मशागत | १०९ |
| ९ स्त्री आणि बालवाङ्मय | १२३ |
| १० कांहीं लोकप्रिय कादंबऱ्या व त्यांचीं कथानकें | १३२ |
| ११ उपसंहार | १५९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३२८६
मुख्य शाखा (स्थल प्र)

# कादंबरीची गोष्ट

## प्रकरण १ लें.

### विषयप्रवेश.

पटुत्वं सत्यवादित्वं कथायोगेनबुध्यते

हितोपदेश.

ब्रम्ह सत्यं ! जगन्मिथ्या ! ! असें आपला वेदांत आपणास कितीही कंठशोष करून सांगो—( आणि हें त्याचें सांगणें तत्त्वतः कदाचित् खरेंही असो ) प्रत्यक्ष श्रीमदाचार्यासारख्या तत्त्वज्ञांखेरीज इतरांस या अनुपमेय सूत्राचें मर्म कसें कळावें ? संसार दुःखमय असून मानवी जीवन जन्मापासून तों मृत्यूपर्यंत क्लेशमय आहे, असें आपल्याही पदोपदीं अनुभवास येवो; परंतु तुकारामासारख्या जीव-

न्मुक्ताखेरीज इतरांस त्याचा मोह कसा आवरतां यावा ? आणि मानवी जीवन हें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें अस्थिर व क्षणार्धांत नाश पावणारें असतांही प्रत्यक्ष त्याच तुकारामानें संतसंग घडून येण्यासाठीं कां होईना—आपणास " ( तुका म्हणे ) गर्भवासी । सुखें घालावें ( आम्हांसी )" अशी भगवंताची प्रार्थना कां करावी ? अर्थात् संतसंग घडून यावयाचा असेल तर तो स्वर्ग आणि पाताळ या संशयास्पद लोकांत नव्हे तर आपल्या मिथ्या व नाशिवंत मानलेल्या या मृत्युलोकांतच घडेल, अशी निदान तुकारामाची तरी खात्री झाली असली पाहिजे. तसेंच या संतसंगाचें महत्व त्यास इतकें वाटतें कीं, त्या पुढें धनसंपदा नर काय, पण प्रत्यक्ष मुक्तीचीही तो पर्वा करीत नाहीं. एवंच या मोहक जगताचा व मानवजन्माचा जो मोह तुकारामासारख्यास सुद्धां सुटत नाहीं, त्या मोहानें आम्हां संसारिकांना पक्की भुरळ पाडावी यांत आश्चर्य कोणतें ?

परंतु या वेदांत्यांच्या आणि तार्किकांच्या प्रश्नांत आपणास शिरण्याचें कारण काय ? जगताचें मिथ्यात्व खरें ठरो किंवा खोटें, एकदां जन्म घेतल्यावर नियतकालपर्यंत आपणास आपलें जीवन या मृत्युलोकांत व्यतित करावेंच लागतें. आपणास तें आवडो अथवा न आवडो, आपण त्यास शाश्वत किंवा अशाश्वत कसेंही समजो, नियतकालपर्यंत तें आपणास व आपण त्यास सोडीत नाहीं. अशा स्थितींत जगाविषयीं आपण अनुकूल बुद्धि ठेवल्यावांचून आपणास गत्यंतरच नाहीं. कारण आपल्या प्रतिकूलतेनें जगताचें कांहीं एक

अडणारें नसून, उलट पाण्यांत राहून माशांशीं वैर केल्याप्रमाणें आपलेंच हंसें व नुकसान होतें. तसेंच अनादि कालापासून सुरू झालेलें त्याचें कार्य अनंतकालपर्यंत असेंच अप्रतिहत चालू राहणार आहे. त्याच्या घटनाचक्रास कशानेंही अडथडा येत नाहीं व त्रिकालाबाधित असे त्याचे नियम कोणीही मोडू शकत नाहींत. भयंकर उल्कापातानें आणि त्याहूनही भयंकर अशा भूकंपानें थोड्याशा डगमगण्यापलीकडे त्याला कांहीं एक होत नाहीं. नेपोलियन आणि शिवाजी यांचे पराक्रम; एडिसन आणि बोस यांचे शास्त्रीय शोध; ख्रिस्त, महंमद, बुद्ध व शंकराचार्य यांचा धर्मप्रचार, कुरुक्षेत्रांतील कौरवपांडवांचे प्राचीन अथवा गिलचे व मराठे यांचे अर्वाचीन महायुद्ध; आणि कानपूरची अथवा जालियानवालाबागची कत्तल; वगैरे अनेक लहानमोठ्या गोष्टी केवळ त्याच्या त्यालाच शोभणाऱ्या आहेत. स्मशानभूमीचें विलासमंदिर व विलासमंदिराची स्मशानभूमि त्यालाच करतां येते. कारण आपल्या घटनाचक्रास त्यानें चक्रनेमिक्रमाची योग्य उपाधी लावून घेतली आहे. त्याचा शेवट—आणि तो व्हावयाचा असेल तर—त्याच्या निर्माणकर्त्याच्या इच्छेवरच अवलंबून आहे.

जगाचा संबंध जगांतील प्रत्येक वस्तूशीं आहे. तथापि मनुष्याचा जगाशीं असणारा संबंध सर्वांत श्रेष्ठ आहे. वास्तविकच आहे. जगतील यच्चयावत् वस्तूंत मनुष्यप्राणी ज्या अर्थी श्रेष्ठ आहे, त्या अर्थी त्याचा जगाशीं असणारा संबंधही सर्वांहून श्रेष्ठ असलाच पाहिजे. नव्हे—मनुष्यप्राणी इतका श्रेष्ठ आहे कीं, त्याचा जन्म या मृत्युलोका-

तील दुर्लभ वस्तूंच्या यादींत पहिल्यानें लिहावा लागतो. ' पुनर्दारा-पुनर्वित्तं न शरीरं पुनःपुनः ' अथवा ' दुर्लभं मानवंजन्म ' इत्यादि वचनें मानवजन्माच्या याच दुर्लभतेचें समर्थन करतात. आणि धर्म, अर्थ, काम व मोक्ष इत्यादि सर्व गोष्टी एका मनुष्य--जन्मांतच मिळविणें शक्य असल्यामुळें या सर्व समर्थनास बळकटीच येते. कसेंही असो, या ईश्वरदत्त श्रेष्ठपणामुळें त्यास या सर्व जगताचा ताबा मिळाल्यासारखें झालें आहे, आणि त्याच्या बळावर तो आज जगावर साम्राज्य मिरवित आहे.

परंतु असें असूनही-म्हणजे मनुष्यप्राणी इतका श्रेष्ठ असूनही तो स्वतंत्र नाहीं. त्याला बंधनें आहेत. त्याला ज्ञान आहे. परंतु तें अज्ञान-तिमिरावृत आहे हेंच अज्ञान मायेच्या नांवानेंही संबोधिलें जातें. त्याच्यांत सदसद्विवेकबुद्धि, विवेक, दूरदर्शित्व इत्यादि मित्रवृत्ति जशा वास करतात तशा काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ व अहंकार या शत्रुवृत्तीही वास करतात. देवानें त्याला मन दिलें आहे; पण तें आवरण्याचें सामर्थ्य त्याच्यांत ठेवलें नाहीं. त्याला वासना दिल्या आहेत; पण त्यांच्या तृप्तीचें साधन देवानें त्याच्या हातांत ठेवलें नाही. त्याला जन्ममरण दिलें आहे; परंतु तेंही त्याच्या स्वाधीन नाहीं. या व अशा प्रकारच्या अनेक कारणांमुळें मनुष्यासारख्या सर्वश्रेष्ट प्राण्यासही पारतंत्र्यानें सोडलें नाहीं.

परंतु हीं मनुष्याच्या पारतंत्र्यतेची अंतस्थ कारणें झालीं. तो परतंत्र ऊर्फ समाजशील कां झाला याविषयीं प. आगरकांनीं उत्कृष्ट

विवेचन केलें आहे व तेंच आपणास विशेष पटण्यासारखें आहे. ते म्हणतात. " मनुष्यासारख्या बलहीन प्राण्यास क्रूर पशूंच्या व आपल्या जातींतील पशुतुल्य व्यक्तींच्या त्रासांतून सुटण्यास कसा तरी समाज करून राहणें व आपल्याच पैकीं एखाद्या बलवंताच्या छत्राचा आश्रय करणें, याहून स्वसंरक्षणाचा दुसरा मार्ग नसतां, व्याघ्रसिंहादि जे सामर्थ्यवान् व क्रूर हिंस्र पशु आहेत, ते एकमेकांच्या सहवासाची मुळींच पर्वा करीत नाहींत. किंबहुना एकांतवासच त्यांना विशेष प्रिय असतो. भूक लागेल तेव्हां एखाद्या सावजावर झडप घालावी; तहान लागली म्हणजे एखाद्या डबक्यांत तोंड घालावें, व या दोहों-पासून पीडा होत नसली म्हणजे एखाद्या घळीत, झाडींत किंवा गुहेंत स्वस्थ झोंप घेत पडून रहावें, असा त्यांचा आयुष्यक्रम असतो ! तीव्र दाढा, प्रखर नखें, आणि प्रचंड शक्ति, यांच्या जिवावर त्यांना आपल्या जातभाईंची किंवा दुसऱ्या कोणत्याही प्राण्यांची मैत्री कर-ण्याची इच्छाच होत नाहीं ! कळप करणें, समाज करणें, शत्रूवर साऱ्यांनीं जमून जाणें, किंवा त्याचा हल्ला आला असतां एका जुटीनें वागून स्वसंरक्षण करणें—हीं सारीं लचांडें बलहीन किंवा बल असून संरक्षणाचें कोणतेंही साधन नाहीं अशा जनावरांच्या पाठीमागें लागलीं आहेत. ज्या मानानें स्वसंरक्षणाचीं साधनें अधिक त्या मानानें समा-जाचा जास्त तिटकारा व एकांतवासाची जास्त आवड जनावरांत दिसून येते. मुंगीसारख्या क्षुद्र कीटकापासून हत्तीसारख्या धिप्पाड पशूपर्यंत हा नियम लागू पडण्यासारखा आहे. मनुष्य तरी संगमनशील होण्याचें कारण हेंच. उद्यां जर मनुष्याला एकाएकीं सिंहाच्या दाढा

आणि पंजे येऊन त्यांचा उपयोग करण्यासारखें सामर्थ्य हीं प्राप्त होईल तर तो आतां जसा समाजप्रिय आहे तसा मुळींच राहणार नाहीं." अस्तु.

कोणताही काळ आणि कोणताही समाज घेतला तरी त्या काळांतील व त्या समाजांतील लोकांस जशी श्रम करण्याची तशी त्याचा परिहार करण्याची आवश्यकता असणारच. आणि जसे श्रमाचे प्रकार व कारणें अनेक आहेत तसें त्यांचा परिहार करण्याचे मार्ग व साधनेंही भिन्न भिन्न आहेत. मजूरवर्गासारख्या शारीरिक श्रमाचें काम करणाऱ्या मनुष्याचा श्रमपरिहार केवळ विश्रांतीनें होतो. परंतु सुखवस्तु लोकांस त्याच्या करतां श्रवण, निवेदन, गायन वादन, इत्यादि मनोरंजक विषयांचा आश्रय करावा लागतो.

कथाश्रवणही अनादि कालापासून मनुष्याच्या मनोरंजनाचें व कालहरणाचें एक साधन झालें आहे. या श्रवणयोग्य गोष्टीचें स्वरूप देशकालपरत्वें भिन्न भिन्न असूं शकेल. परंतु कोठेंही आणि केव्हांही झालें तरी कथाश्रवण निवेदनाचा हा प्रकार असणारच. प्राचीन काळीं राजे व श्रीमान् लोक गोष्टी सांगण्याकरितां आपल्या पदरीं तसे लोक नोकर ठेवीत व नवीन गोष्टीस बक्षिस देत. हल्लीं ज्याप्रमाणें जगावर असा एकही सुशिक्षित इसम सांपडणार नाहीं कीं, ज्यानें या नाहीं त्या रूपानें एक सुद्धां कादंबरी वाचली नसेल. त्याप्रमाणें अति प्राचीनकालीं देखील असा एकही इसम दाखवितां

येत नसेल कीं, ज्यानें या नाहीं त्या कारणानें एकही गोष्ट ऐकली नाहीं. गोष्टींची श्रवणोत्सुकताही इतर अनेक वृत्तीप्रमाणें मनुष्याच्या अंगची एक प्रधानवृत्ति आहे. ही उत्सुकता जशी त्याच्यांत जन्मापासून उगम पावते तशी ती त्याच्याबरोबरच लयास जाते. मनुष्य कोऽहं? हें कळण्यासाठीं जन्मास येतो खरा; पण तो तें कळल्यावाचूनच मृत्यु पावतो. हेंच त्याच्या विविध जिज्ञासा कायम व जागृत ठेवण्याचें मुख्य कारण आहे. कारण हें असो अथवा दुसरें; फावल्या वेळीं मनोरंजनार्थ गोष्टी सांगणें व ऐकणें हा प्रकार अति प्राचीन आहे यांत संशय नाहीं.

बरें, पण या खऱ्या अथवा कल्पित कथोपकथा व त्यांचें श्रवण, मनुष्याचें मनोरंजन करण्यास समर्थ कां असाव्यात हें आपण पाहूं या. कर्णमधुर आलाप कानीं पडत असल्यामुळें गायनश्रवणानें अथवा एखादी सुंदर वस्तू नयनांस आल्हाद देत असल्यामुळें अशा वस्तूच्या प्रेक्षणानें मनुष्याचें मनोरंजन होऊन त्यास आनंद वाटावा हें ठीकच आहे. परंतु गोष्टींत असें काय असणार कीं ज्यानें मनुष्याचें मनोरंजन व्हावें? परंतु या शंकेच्या समाधानार्थ आम्हांस येथें एक दुसराच पण साधा दाखला द्यावा लागतो. तो असा कीं, मनुष्यास आरसा पाहणें कां आवडतें? तर आरशांत त्यास आपलें प्रतिबिंब दिसतें म्हणून असें उत्तर कोणासही देतां येईल. आणि याच उत्तराच्या अनुरोधानें आम्हांस येथें असें सांगतां येईल कीं, मनुष्य आपलें शारीरिक प्रतिबिंब जसें आरशांत, तसें आपलें मानसिक प्रतिबिंब

तो कथा कादंबऱ्यांतून पाहतो. मनुष्य हा घटक व लहानमोठ्या गोष्टी ह्या त्याच्या जीवनक्रमविषयक घटना होत. मनुष्य हा बिंब व गोष्ट हें त्याचें प्रतिबिंब होय. अर्थात् घटनेनें घटकास व प्रतिबिंबानें बिंबास मोहित करावें यांत आश्चर्य नाहीं. एवंच गोष्ट आपणास आवडते याचें कारण तिच्यांत आपणास आपल्या व आपल्यासारख्या इतर लोकांच्या आचारविचाराचें प्रतिबिंब आपल्या दृष्टीपत्तीस येतें म्हणून, असें वरील शंकेचें सरळ समाधान झालें.

आतां गोष्टीविषयीं इतर विचार बाजूस ठेवून पहिल्यानें गोष्ट कशास म्हणावें हें पाहिलें पाहिजे. विशेष खोल शिरलें नाहीं तर घडणाऱ्या अथवा घडलेल्या प्रत्येक घटनेस गोष्ट ही संज्ञा देतां येईल. प्रत्येक मनुष्याचा सबंध जीवनक्रम ही एक लहानशी गोष्टच आहे. एक पाश्चात्य विद्वान् तर असें म्हणतो कीं, प्रयत्न केल्यास प्रत्येक मनुष्यास एखादी गोष्ट किंवा कादंबरी लिहितां येणें शक्य आहे. आपण अशी कल्पना करूं या कीं, प्रत्येकास तसें करतां येणें शक्य नाहीं. परंतु यावरून त्याचा विशिष्ट जीवनक्रम गोष्टीचा विषय होऊं शकत नाहीं, असें नाहीं. जितक्या व्यक्ति तितक्या प्रकृति आणि जितक्या प्रकृति तितक्या प्रतिकृति !

परंतु असें जरी आहे तरी माणसाइतक्या गोष्टी नाहींत हें उघड आहे. असें कां ? असें होण्याचीं कारणें अनेक आहेत. एक तर एखादी गोष्ट ऐकण्यासारखी होण्यास तिच्यांत सांगण्यासारखें कांहीं

असलें पाहिजे. तिच्या ठायीं ऐकणारांत हर्षशोकादि विकार उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे. ऐकणारांच्या मनोवृत्ति तिला उचंबळून टाकतां आल्या पाहिजेत. आणि असें होण्यास ती थोडी तरी असामान्य असली पाहिजे हें निर्विवाद आहे. निदान तिनें एखाद्या धार्मिक, नैतिक, व्यावहारिक, इत्यादि सत्यविशिष्टावर प्रकाश तरी पाडला पाहिजे. एखादें प्रमेय, एखादा सिद्धांत तिनें सोडविला पाहिजे, एखादें कोडें उलगडलें पाहिजे. असें कांहींच न होईल तर कोणतीही घटना निरूपणयोग्य व तसेंच श्रवणयोग्य ठरणार नाहीं. असो.

मराठी वाङ्मयांत कथावाङ्मय निर्माण होण्याच्या पुष्कळ आधीं लोकांच्या तोंडीं अनेक प्रकारच्या गोष्टी व उपदेशाकरितां रचलेल्या कल्पित कथा असत. गांधर्वकथा, प्रहसनें, आख्यायिका व गोष्टी या सर्व वाङ्मयांतील गोष्टींचें कांहीं अंशीं उगम होत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. " भारतीयांच्या बुद्धींतून वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीनें ज्या अतिशय मौल्यवान् गोष्टी निघाल्या त्यामध्यें गंधर्वकथा ( Fairy tales ), कल्पित कथा ( Romance ) व वृत्तांतपरकथा यांना स्थान द्यावें लागेल. इतर सुधारलेल्या लोकांपेक्षां भारतीयांमध्यें त्यांना फारच लवकर वाङ्मयीन दर्जा प्राप्त झाला. बौद्ध व जैन धर्मग्रंथामध्यें त्यांनीं महत्त्वाचें स्थान पटकाविलें, एवढेंच नव्हें तर भारतीय काव्यकलेंतील इतर कोणत्याही शाखेपेक्षां त्याचें महत्त्व अधिक आहे असें मत प्रो. विंटरनिट्झ यानें आपल्या भारतीय वाङ्मयेतिहासांत

व्यक्त केलें आहे. एकस्वरूपीं पात्रें घालण्याचा ललितवाङ्मयाच्या इतर शाखांतून आढळून येणारी विशेष प्रवृत्ति भारतीयांच्या या वाङ्मयांत आपणास आढळत नाहीं. ज्यांच्या ठिकाणीं व्यक्तिशः निरनिराळीं लक्षणें आहेत अशा लोकांशीं कथावाङ्मयांत आपली गांठ पडते. सद्गुणी राजे, धीरोदात्त पुरुष, सुंदर व सुस्वभावी राजकन्या आणि आदर्शाई आचार्य किंवा अशा प्रकारच्या श्रेष्ठ व्यक्तीच महाकाव्य आणि नाट्य या वाङ्मयांत आढळून येतात. कथावाङ्मयांत तसें नाहीं. शेतकरी, कारागीर, व्यापारी, जुगारी, जादूगार, ठक, तसेंच आत्म-ज्ञानी ब्राह्मण, ढोंगी बैरागी, वेश्या आणि वारांगना इत्यादि समाजां-तील इतर अनेक दर्जाचे लोक आपण या कथावाङ्मयांत पाहतों. कोणत्याही भारतीय काव्याच्या शाखेनें बाह्यवाङ्मयावर याच्या इतका परिणाम केला नाहीं किंवा दुसरी कोणतीही शाखा जागतिक वाङ्मयाला याच्या इतकी महत्त्वाची वाटली नाहीं. भारतीय कथा एका लोकसमूहापासून दुसऱ्या लोकसमूहाकडे इतक्या लवकर भटकत गेल्या कीं, आपणाला युरोप आणि आशियाखंडांतील बहुतेक सर्व प्रदेशां-तून, इतकेंच नव्हें तर आफ्रिकन लोकांतही त्या अंशरूपानें आढळतात; व याविषयीं अतिशय आश्चर्य वाटतें. कांहीं काळ तर असें समजण्यांत येत असें कीं, सर्व गंधर्वकथांचें उत्पत्तिस्थान आपला हिंदुस्थान देश आहे !"*

---

* महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग १० पृ २६५.

यक्षगंधर्वांच्या कथा करमणुकीसाठीं असून पुराणकथेचा उद्देश एखादें धार्मिक सत्य पटवून देण्याचा असे. ज्या ठिकाणीं शिक्षणाचें कार्य करावयाचें असेल त्या ठिकाणीं यक्षगंधर्वकथा प्रामुख्यानें पुढें येत. म्हणून नीतिकथा गांधर्वकथेपेक्षां कमी लौकिक कथाश्रयी असतात. मात्र कालांतरानें त्या पंचतंत्र किंवा इसापाच्या गोष्टीप्रमाणें लोकांना आवडूं लागतात. याच्या उलट गोष्ट गांधर्वकथांची आहे. त्यांचा जन्म प्रत्यक्ष लोकारम्यापासून झाला असल्यानें या बहुधा अधिक लोकप्रिय असतात.

पंचतंत्र, हितोपदेश, बृहत्कथा, बृहत्कथामंजरी, कथासरित्सागर, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी व शुकबहात्तरी हे आपले प्रमुख समुच्चयकथाग्रंथ होत.

पंचतंत्र—अर्थशास्त्र किंवा नीतिशास्त्र यांत लागणारें शाहणपण व शासनशास्त्राचीं तत्वें हीं कल्पित नीतिकथा व न्यायसूत्रें यांच्या द्वारें शिकविण्याचा पंचतंत्राचा मूळ हेतू असावा. आरंभीं राजपुत्रांकरितां एक ग्रंथमालिका तयार करण्याचा कर्त्याचा उद्देश दिसतो; पण पुढें सर्व दर्जाच्या तरुणांकरितां म्हणून हें पुस्तक प्रचारांत आलें. मूळ प्रत जरी उपलब्ध नाहीं, तरी तिच्या पांच जुन्या प्रति सांपडल्या आहेत. या पांच प्रतीपैकीं " तंत्राख्यायिका " नांवाची काश्मिरी हस्तलिखित प्रत मूळ ग्रंथाशीं बरीचशी जुळती दिसते. यापैकीं एक प्रत इ. स. ५७० च्या सुमाराची पेहल्वी भाषेंतलि आहे. यानंतरचें भाषां-

तर सिरियन भाषेंतील आहे. " कालील आणि दिम्न " या नांवाचें अरबी भाषांतर ८ व्या शतकांत पुढें आलें. १० व्या किंवा ११ व्या शतकांत अरबींतून ग्रीक भाषेंत, नंतर इटालियन, लॅटिन, जर्मन आणि स्लाव्ह या भाषांतून पंचतंत्राचीं भाषांतरें निघालीं. १२ व्या शतकाच्या आरंभीं हिब्रू भाषांतर व या हिब्रूचीं इतर भाषांतरें होऊन सन १४८३ पासून जर्मन वाङ्मयावर त्याचा परिणाम होत गेला. जर्मन भाषांतरांचीं डॅनिश व आईसलँडिक भाषांतरें निघालीं व याप्रमाणें सर्व युरोपभर या भारतीय कथांचा फैलाव झाला.

मराठींतील पहिला पद्यग्रंथ जसा ज्ञानेश्वरी तसा पहिला गद्यग्रंथ ' पंचतंत्र ' हा कथाग्रंथ होय. मराठींत हा १३ व्या शतकाच्या आरंभीं आला. पंचतंत्राचा उपलब्ध भाग जरी छापलेला आहे, तरी तो पुष्कळ वाचकांस पहावयास मिळण्यासारखा नाहीं. यासाठीं तत्कालीन मराठी भाषेचा नमुना व गोष्टींचा मासला म्हणून पुढील गोष्ट येथें देतोः—

" पिंगलकु पुसे, दमनकु सांघे. म्हणे, कोणे एके नगरीं यज्ञदत्तु नामें ब्राह्मणु असे. तो दुर्बलु. तयातें ब्राम्हणीनें म्हणितलें, तुम्ही कांहीं उदीम नकरा आम्हीं अवघें भुकें मरत असों. तव तो चहुकडे हिंडो निघाला. वाटेस जातां येके अरण्यि पातला. तयासि तृषा लागली. म्हणौनि उदकाकारणें हिंडतां. तंव एकु अड देखिला. तणें झांकिला असे. तया आंत पाहे, तव देखिले. व्याघ्र, सर्पु, वान्नरु, सोनारू. ऐसे

चौघे तया अडामध्यें पडिले असती, ते तया यज्ञदत्तु ब्राम्हणें देखिलें. ऐहिं तो ब्राम्हणु देखिला. मग चौघेहि तयातें म्हणति, ' आमुतें या अडां-तुनि बाहेर कादि. ' तंव तो विचारी, म्हणें ' यांसि बाहिर काढितां पुण्य होईल ' म्हणौनि तेणें आधिं व्याघ्र काढिला. तेणें म्हणितलें, ' तूं माझा प्राणदाता; मिं मथुरेचे डोंगरिं असें; तेथें तूं आलिया, मिं तुझे उपकाराचा प्रत्युपकार करीन. परि या सोनारा तुं बाहिर काढुं नको. तंव तो सर्पु आणि वान्नरुहि काढिले. तंव ते म्हणति, ' तुं सोनारु बाहिर कढुं नको, आणि आमुतें अवघड वेळेसि स्मरावें' मग पाठिं तो सोनारुहि काढिला. तंव तो सोनारुहि म्हणें, ' मजपासिं तुंवां यावें; तुझें मिं उत्तीर्ण होईन. ' तंव तो ब्राम्हणु हिंडतु हिंडतु मथुरेसि गेला. तंव तेथें वान्नरु भेटला. तेणें त्य ब्राम्हणासि स्वागत केलें. बरावें फळें दिव्यें आणौनि दिधलीं. ते डोंगरें व्याघ्रहि भेटला. तेणें त्या ब्राम्हणासि सोनियाचें अलंकार दिधले. ते अलंकार घेउनि त्याच सोनारापाशीं गेला. तंव तो तया ब्राम्हणासि नोळखेचि. ब्राम्हणें खुण सांगितली, मग ओळखिलें. ब्राम्हणासि बैसों घातलें; आणि पुसे, काय आज ? तंव तया ब्राम्हणें अलंकार दाखविले. तंव ते अलंकार तयाच नगरीच्या राजकुंवराचे त्याच सोनारें घडिले होते. ते समस्त ओळखिले. मग मनिं विचारि, ' व्याघ्रें राजकुंवरुं मारिला. अलंकार ठेविले होते. ते या ब्राह्मणासि प्रत्योपकाराप्रमाणें दिधले. ' तंव तो सोनारु जाउनि राउळीं सांघे, म्हणे, ' जि, राजकुंवरु जेणें मारिला, तो चोरु मि दाखवीन. म्हणौनु तो ब्राम्हणु सोनारें राजदूतांपासि

दाखविला. म्हणें, ‘ एणें राजपुत्र मारिला आणि अलंकार घेउनि आला असे, तो ’ ब्राह्मणु राजदूतीं बहुत बडविला, आणि रायापासी नेला. तंव राये म्हणितलें, ‘ यासि उदैक सुळिं द्या. ’ म्हणौनि बंधन करौनि ठेविला, तंव त्या ब्राह्मणें रात्रिं सर्पु स्मरिला तंव तो तत्काळ आला म्हणे, ‘ काय आज्ञा ? ’ तंव तेया ब्राम्हणें अवघा वृत्तांत, सांघितला तंव तो सर्प म्हणे, ‘ मिं रायाचे राणिस डंखोन तुजवाचूनि नुतरे तुं हात लावताचि उतरैन. ’ ऐसे सांगौनु सर्पे ते राणि डंखिली तया सर्पाचें विष कांहीं केलिया नुतरे तंव तया ब्राम्हणें म्हणितलें, मि सतरीन. ’ मग तो ब्राम्हण रायें सोडिला तयाचा हात लागताचि सर्पु उतरला. मग रायें तया ब्राम्हणासि सुन्मानु केला. मग रायें लेणियांचे वृत्त पुशिलें. ब्राम्हणें अडापासूनि अवघें सांगितलें मग तो सोनारू गांवाबाहिरी घातला. आणि तया ब्राम्हणासि धन–गांव दिधलें. मग तेणें आपुलें कुटुंब आणविलें, सुखें असों लागला. म्हणौनि कोण्हाचा विश्वास न करावा ”

हितोपदेश-हा कथासमूह अधिक अर्वाचीन असून त्याचा कर्ता जो नारायण यानें पंचतंत्र व दुसरा एक ग्रंथ यावरून तयार केला आहे याचे चार अध्याय असून त्यांत अनुक्रमें मित्रलाभ, सुहृद-भेद, विग्रह आणि संधि असे चार विषय प्रतिपादिले आहेत यांतील लढाई करणारे प्राणी हंस व एक मोर आहे. या ग्रंथाचींही युरोपीय अनेक भाषांत भाषांतरें झालीं आहेत.

बृहत्कथा—हा ग्रंथ इ. स ३ ऱ्या किंवा कांहीं काल आधीं गुणाढ्य यानें रचिला. हा गुणाढ्य शातवाहन राजाचा मंत्री होता. गुणाढ्याचा हा ग्रंथ पैशाची भाषेंत आहे. यांत लोकांची आणि जैनांची रहाणी व शिल्पी वर्गाचें चरित्र हीं अतिशय स्पष्टपणें दाखविलीं आहेत.

बृहत्कथामंजरी—हीं इ. स. १०३७ च्या सुमारास क्षेमेंद्रानें लिहिली. क्षेमेंद्राचा उद्देश जरी मूळ ग्रंथाचा संक्षेप करण्याचा होता व कांहीं ठिकाणीं अर्थबोध होणार नाहीं इतका जरी त्यानें संक्षेप केला आहे. तरी शृंगारिक व धार्मिक भाग फार पाल्हाळ करून दिला आहे.

कथासरित्सागर—हा ग्रंथ १०६३ व १०८१ या कालांत सोमदेवानें रचिला आहे. हाही ग्रंथ बऱ्याच महत्वाचा आहे. या दोघाही कवींचा आधारग्रंथ एकच; पण सोमदेवाची भाषा बरीच प्रौढ असून, कुशल व जोरदार अशा उत्तमोत्तम भारतीय कवींमध्यें तो गणला जातो. यानें या ग्रंथांत ३५० नवीन गोष्टी घातल्या असून या कथा मुख्य कथाभागाहून जास्त मनोवेधक आहेत. हिंदुस्थान तील धार्मिक परिस्थिति व स्त्रियांचा दर्जा यासंबंधीं बरीचशी माहिती करून देणारा हा ग्रंथ आहे.

वेताळपंचविशी—हा भाग बृहत्कथेच्या काश्मिरी प्रतींत आहे, पण सोमदेव आणि क्षेमेंद्र यांचे वेताळपंचविंशतिकेवरचे पाठ आपणा

पुरते आहेत. यांतील गोष्टी सामान्य निवृत्तिपर आहेत. जादूविद्या यांत बरीचशी बोकाळलेली दिसते. जादूविद्या हस्तगत करण्याच्या कामीं विक्रमसेन राजाला मदत देणाऱ्या वेताळानें या गोष्टी सांगितल्या आहेत.

सिंहासनबत्तिशी—हा वेताळपंचविशीप्रमाणें पण मागाहून रचलेला असा राजा विक्रमासंबंधीं बत्तीस गोष्टींचा समूह आहे.

माधवानल—कामकंदला कथा—ही भारतीयांची कथावाङ्मयांतील एक आवडती कथा आहे. भट्ट विद्याधर याच्या आनंद नांवाच्या शिष्यानें एक ब्राम्हण व एक नर्तिका यांची ही प्रेमकथा लिहिली आहे. ही गद्यकथा करुणारसपूर्ण आहे.

शुकबहात्तरी—प्रभावती नांवाच्या एका दुराचारी स्त्रीला एका पोपटानें सांगितलेल्या ७२ गोष्टींचें हे पुस्तक अर्वाचीन असून त्यांतील बहुतेक गोष्टी बायकांविषयीं आहेत.

'भारतद्वात्रिंशिका' यांत भिक्षा मागणाऱ्या जातींच्या व शिवदासकृत 'कथार्णव' यांत चोरांच्या गोष्टी सांगितल्या आहेत. हरिभद्रकृत 'धूर्ताख्यान' यांत महाभारत आणि रामायण यांतील कथांची टर उडविली आहे.

वृत्तांतग्रंथामध्यें ऐतिहासिक पुरुषांच्या आख्यायिका सांगणारे ग्रंथही घेतले पाहिजेत. मेरुतुंगाचा 'प्रबंधचिंतामणि,' राजशेखराचा 'प्रबंधकोश' व बल्लाळाचा 'भोजप्रबंध' हीं पुस्तकें या वर्गांत येतील

चंपु—गद्य आणि पद्य भाग एकत्र जोडून एका ग्रंथांत समाविष्ट करण्याच्या या प्रकाराला चंपु म्हणतां येईल. अतीशय सुप्रसिद्ध चंपु

म्हणजे त्रिविक्रमभट्टाचा ' नलचंपु ' किंवा दमयंतीकथा होय. भोजराजाचा ' रामायणचंपु ' व अनंताचा ' भारतचंपु ' याच सदरांत दाखल केला पाहिजे. अकबराच्या कारकिर्दीत ' पारिजातहरणचंपु ' आणि ' मंदारमरंद ' चंपु हे लिहिले गेले. याच सुमारास नारायण भट्टानें ' स्वाहासुकारचंपु ' व १८ व्या शतकांत शंकरकवीनें ' शंकरचेतोविलासचंपु ' लिहिला. चेतोविलासचंपूंत चेतसिंहराजाचे पराक्रम वर्णिले आहेत.

कथावाङ्मयाचे हे उपलब्ध ग्रंथ होत; सीमाग्रंथ नव्हत. तसेंच हे केवळ शिष्टसंमत कथाग्रंथ होत, शिष्टेतरजनसंमत नव्हेत. त्याचप्रमाणें कोणताही काळ घेतला तरी त्यांत फक्त तोंडीं सांगण्यांत येणारें कथावाङ्मयही विपुल असतें. तें अमुद्रित अथवा पुस्तकरूपानें उपलब्ध नसलें तरी तेवढ्यानें त्याचें महत्व कमी होत नाहीं.

परंतु या सर्व कथावाङ्मयाचा हल्लींच्या मराठी किंवा देशी भाषेंतील इतर कथावाङ्मयाशीं जोडणारा दुवा कोठें आहे, हें आपण पाहूं या. आणि पाहूंच गेल्यास आमच्या समजुतीप्रमाणें तो आपणास मुद्रणकलेच्या उदयांत मिळेल. प्रतिभा आहे, कल्पकता आहे, परंतु त्यांचा उपयोग होण्यासारखी परिस्थिति आणि साधनें नाहींत, असा प्रकार मुद्रणारंभापूर्वीं आपणाकडे होता. मुद्रणकलेपूर्वी ललितवाङ्मयाच्या इतर शाखाप्रमाणें आमचें कथावाङ्मयही इतस्ततः विखुरलेलें असल्यामुळें त्याचें आडोलन अथवा छाननी करणेंही शक्य नव्हतें;

मग त्याचें एकीकरण अथवा प्रसिद्धीकरण करण्याची गोष्टच कशाला? अर्थात् जिनें प्राचीन व अर्वाचीन अशा ललितवाङ्मयाच्या इतर शाखांचा दुवा जुळून येण्याची संधि आणून दिली, त्या मुद्रणकलेसच आपल्या प्राचीन कथावाङ्मयाचा अर्वाचीन कथावाङ्मयाशीं दुवा जोडण्याचें श्रेय दिलें पाहिजे.

तथापि, हा दुवा जुळविण्याचें श्रेय घेण्यांत दुसराही एक वाटेकरी आहे आणि तो वाटेकरी म्हणजे व्यापक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हा होय. हा वाटेकरी पहिल्या इतकाच, किंबहुना त्यापेक्षांही अधिक उपकारक झाला. पहिल्यानें आमच्या हातीं साधनें दिलीं तर दुसऱ्यानें आम्हांत सामर्थ्य उत्पन्न केलें. पाहिल्यानें 'कसें करावें?' तर दुसऱ्यानें 'काय करावें?' हें आम्हस शिकविलें.

या एकापेक्षां एक अधिक उपकारक अशा शक्तींचा आपल्या कथावाङ्मयावर काय परिणाम झाला व त्याचीं कोणकोणतीं अथवा कसकशीं स्थित्यंतरें होत गेलीं हें आपण पुढील प्रकरणीं पाहूं.

# प्रकरण २ रें.

## प्रतिष्ठान तें पुणें.

प्राचीन काळीं ‘ प्रतिष्ठान ’ ऊर्फ पैठण हें महाराष्ट्राच्या विद्येचें व विशेषतः वाङ्मप्रवर्तनाचें मुख्य केंद्र मानलें जात होतें. शककर्त्या शालिवाहानाची ही राजधानी तिचा ऱ्हास होईपर्यंत ‘ दक्षिणकाशी ’ या बहुमानवाचक संज्ञेनें संबोधिली जात असे. ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, इत्यादि मराठी वाङ्मयाचे आद्य प्रवर्तक पैठण नगरीं जन्मलें व महाराष्ट्राच्या आवडत्या श्रीधरानें आपला देह याच पैटण त ठेविला. नामदेव, तुकाराम, रामदास, इत्यादि दुसरी श्रेणी पैठणाबाहेरची असली तरी त्यांचाही ओढा प्रतिष्ठानाकडे होता. सारांश आपल्या भरभराटीच्या काळीं पैठण महाराष्ट्रसंस्कृतीचें आगर होतें. परंतु काल-महिमा कांहीं विचित्र आहे ! देवगड ऊर्फ दौलताबादेच्या यादवांचें राज्य नष्ट झाल्यावर पैठणास हळू हळू उतरता काळ आला व एके वेळीं वैभवाच्या शिखरावर चढलेलें पैठण आतां आपणास धुळीस मिळालेलें दिसतें ! तेथील प्रासाद गेले, विद्वान पंडित गेले, श्रीमान आश्रित गेले व सुखी नागरिकही नामशेष झाले !

याच्या उलट अवघ्या तीनशें वर्षांत एका क्षुद्र खेड्यापासून तों पुढें साम्राज्यपदावर चढलेल्या पुण्याकडे पाहिलें म्हणजे आपणास असल्या गोष्टींचा हर्षविषाद मानावयास नको. पुण्यानें हें शिखर

गाठण्याचें श्रेय त्यास मिळालेल्या राजकीय वैभवाकडे जातें, हें निर्विवाद आहे; आणि राजकीय वैभव संपल्यावर आपल्या काळीं पुण्याचीही पैठणचीच अवस्था व्हावयाची ! परंतु इंग्रजांनीं तसें होऊं दिलें नाहीं. त्यांनींही पुण्यासच महाराष्ट्राची राजधानी बनविली.

परंतु सवाई माधवरावांच्या पुण्यांत, रावबाजींच्या पुण्यांत व इंग्रजांच्या पुण्यांत अंतर आहे. सवाई माधवरावांचें पुणें राजकारण, वैभव, भरभराट, इत्यादि गोष्टींची आठवण करून देतें, तर रावबाजींचें पुणें फंदफितूरी, ब्राम्हणभोजनें, ऐषआराम, नाचतमाशे, याच्यापलीकडे दुसऱ्या कोणत्याही चांगल्या गोष्टींची आठवण आपणास करून देत नाहीं. आणि इंग्रजांचें पुणें तर विद्या, उद्योग, आत्मजागृति इत्यादि अनेक चांगल्या गोष्टींची आठवण आपणास एकसमयाच्छेदेंकरून देते.

बाळाजींचे कारकिर्दींत टिफेन थेलर नांवाचा पहिल्यानेंच पुण्यास आलेला व तें पाहून भुलून गेलेला मिशनरी म्हणतोः—"काय तीं पुण्याचीं सुंदर घरें ! काय ते लोक सुखी ! काय ते त्यांच्या अंगावरचे अलंकार ! स्त्रिया तरी किती सुंदर ! मला तर त्या सुवर्णानें पिवळ्याधमक झालेल्या दिसत होत्या ! स्वस्ताई तरी किती सांगू ? मला पैशाला अंडी सहा मिळालीं ! माझे नोकरानें रुपयाला २५ शेर गहू आणिले ! भाज्यांची लयलूट तर पुसूंच नका ! मला पुणें केवळ स्वर्गतुल्य भासलें !"*

* सां. रा. गायकवाडकृत 'पुणें शहर वर्णन' पृ. १५

सवाईमाधवरावांच्या वेळीं तर पुणें फारच भरभराटीस आलें होतें. " पुण्यांत या वेळीं एक लाख उंबरठा होता. ज्या लोकांस पाणी आणण्यासाठीं मडकी मिळण्याची पंचाईत पडत असे त्या लोकांस आतां रुप्याच्या घागरी व हांडे हौदावर आणण्याची वेळ आली होती. कारण पैसा ठेवण्यास जागा नव्हती. सन १७८२ सालीं पुण्यांत मोठी कचेरी झाली. तशी आजपर्यंत कधींही झाली नव्हती. ही कचेरी होण्याचें कारण माधवराव नारायण यांचा विवाह. या विवाहासाठीं हिंदुस्थानांतील सर्व राजेरजवाडे यांस आमंत्रण दिलें होतें. या कचेरींत शाहू महाराज मुख्य स्थानीं तक्तावर बसले होते. तेथें पन्नास सोन्याच्या काठीचे भालदार उभे होते, व रुप्याच्या काठीच्या भालदारांची तर गणतीच नव्हती. या वेळीं पुण्यांत पंधरा लक्ष मनुष्यें जमलीं होतीं. हत्ती पंधराशें होते. घोडीं तर असंख्यात होतीं. देवस्थापना झाल्यापासून पुण्यांत बिऱ्हाडें सुद्धां दहा दिवस लाख घरास पंचपक्वान्नाचे शिधे चालू झाले आणि सरदारांचे सर्व हत्तीघोडे यांच्या चंदीचा खर्च सरकारांतून दिला. "+

आतां रावबाजींच्या वेळीं म्हणजे सुमारें सन १८०१ या सालीं पुणें कोणत्या स्थितींत हें होतें आपणास पुढील उताऱ्यावरून कळून येईल. या वेळचा पुण्याचा रहिवाशी बनलेला कर्नल वेल्स म्हणतो कीं " सहा लक्ष मनुष्यें व एक लक्ष ऐंशीं हजार घरें, येणेंकरून पुणें अगदीं गजबजून गेलें होतें. नदीपलीकडे उंच टेकड्यावर सायं-

---

+ ना. वि. जोशीकृत ' पुणें शहराचें वर्णन ' पृ. ५३

काळीं उभें राहिले असतां पर्वतीचें मैदान व रस्ते माणसांनीं कसे फुलून गेलेले दृष्टीस पडत व एकंदरींत हा सर्व देखावा मनोहर दिसे. पुण्यांतील बडे बडे मुत्सद्दी, कामगार वगैरे जे आपआपल्या अधिकारावर सर्व महाराष्ट्र देशांत पसरले होते, त्यांचेकडील लग्नकार्यादि मंगल समारंभ हमेश पुण्यांत होत असत, त्यामुळें नानाविध वाद्यांचा मधुरध्वनि त्रिकाल कानीं पडे. सायंकाळचे वेळीं सुगंधी पुष्पांचे हार, तुरे, गजरे येणें करून सर्व शहर कसें घमघमून जात असे ! "*

हें एका विदेशी गृहस्थानें बऱ्याच वर्षांपूर्वी केलेलें पुण्याचें वर्णन आहे. आतां एतद्देशीयांनीं केलेल्या वर्णनांत बाजीरावकालीन पुणें कसें दिसतें तें आपण पाहूं या.

रावबाजीकालीन पुण्याचें वर्णन रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या केकावलीच्या प्रस्तावनेंत फार चांगलें साधलें आहे. रामजोशाचा परिचय करून देतांना ते म्हणतात " ही वेळ बाजीराव रघुनाथ पेशवे यांच्या विलासाच्या आरंभीची असावी अशी अटकळ होते. त्याकाळीं रावबाजीच्या उत्तेजनानें पुणें शहरांत व त्या शहराचा वारा लागून जेथें तेथें शिमग्याचें चांदणें वाढत चाललें होतें. दिवसास ब्राम्हणभोजनाचा थाट, आणि दिव्यांत वात पडली नाहीं तों मंदिरांत चवघडे, सणया यांचा मंजूळ घोष; श्रीमंतांच्या व सरदार लोकांच्या वाड्यांत सरकारी ताफ्यांचे मुजरे; रात्रीस रस्त्यांत आणि बोळांत फिरणाऱ्या विलासी लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेणारे

---

* रा. रा. गायकवाडकृत 'पुणे शहर वर्णन ' पृ. २०

नुकतेच चिमणी, साळू, मैना यांच्या मंजूळ कंठांत होनाजी बाळानें घातलेले खडे सूर; आणि फौजेकडील शिलेदार, बारगीर, शिपाई, आणि शहरांतील सुखवस्तु शिंपी, माळी, सराफ, दुकानदार, यांस रिझविण्याकरितां बहिरु, मल्हारी, धोंडूबापू सगनभाऊ आणि रामा गोंधळी यांनीं सजविलेले डफतुणतुण्याचे तमाशे, आणि कलगीतुऱ्यांचीं भांडणें; हे सर्व थाट रावबाजीच्या उल्लासित मनोवृत्तीच्या प्रेरणेनें पुणें शहरांत जेथें तेथें गाजून राहिले होते. मग 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें त्या प्रेरणेचा अंमल सर्व पेशवाईंत पसरला नसेल असें संभवत नाहीं. त्या काळीं सर्व गुणीजनांचे आशेनें भरलेले डोळे पुणें शहराकडे लागून, त्या शहरानें जो कित्ता घातला होता, त्याची नक्कल जेथें तेथें होऊन कित्येक ठिकाणीं त्या नकलेवर ताण करणारे उमेदवारही निपजूं लागले."

हें रावबाजीकालीन पुण्याच्या बहिरंगसंबंधानें झालें. परंतु बहिरंगावरून, वस्तूची परीक्षा करणें बहुतकरून चुकीचें ठरतें. बाजीरावकालीन पुण्याचें वरील चित्रही असेंच फसविणारें आहे. रावबाजीच्या पुण्याच्या अंतरंगाविषयीं पुणेंशहर वर्णनकार म्हणतो कीं, "बाजीराव येईपर्यंत लोकांत कांहीं तरी शौर्य होतें. परंतु बाजीरावानें लोकांस अगदीं नादान करून विषयनिमग्न करून सोडलें होतें. पराक्रमहीन निर्लज्ज, दुर्गुणी, स्त्रैण, मूर्ख, अशक्त, उन्मत्त, कपटी, अविश्वासू, आळशी व पुष्कळ खाणारे असे केले. पराक्रम, विद्या, सावधान या गुणांचें मौल्य अगदीं गेलें. ऐषआरामाच्या बाबती वाढल्या. साखरभात

खाणारास मान व मौल्य आलें. या वेळच्या लोकांची स्थिति अशी होती कीं, सुग्रास खावें आणि रिकामटेकड्या गप्पा मारीत बसावें. माहिती म्हणजे ही कीं, इंग्रज हा कलकत्ता म्हणून एक बेट आहे त्यांतील राहणारा ! याहून विशेष माहिती म्हटली म्हणजे ब्राह्मण-भोजनास शेंकडा किती शेर तूप लागतें, शेंकडा उन्हाळ्यांत किती पायल्याचें पुरण लागतें, पावसाळ्यांत किती पायल्यांचें व हिंवाळ्यांत किती पायल्यांचें, याप्रमाणें कोशिंबिरी भाज्यासुद्धां सारखा बेत उतरण्याजोगा हिशेब तोंडानें सांगत. यांचें नेहमीचें संभाषण म्हटलें म्हणजे विशेषेंकरून जेवणाविषयीं व ग्रामण्याविषयीं असावयाचें. यांची विद्या दोन प्रकारची होती. एक कारकुनी व दुसरी याज्ञिकी. ”

परंतु राजबाजींचें व त्याच्या कारकिर्दीचें हें पहिलेंच उदाहरण नाहीं. तसें तें शेंवटचें असण्याचा संभव नाहीं. रावबाजीस विलासीपणाचा हा कित्ता संभाजी आणि दारा या फार दूरच्या नाहीं अशा राजपुत्रांनीं घालून दिला होता व तो त्यानें यथेच्छ गिरविला ! आणि याचा परिणाम जसा व्हावयाचा तसाच झाला !

एकोणिसाचें शतक अर्धे लोटलें तरी पुण्यांतील व पुणें शहर तर्गत महाराष्ट्र देशांत फारसा फरक झालेला दिसत नाहीं. कै. लोकहितवादी यांनीं तत्कालीन सरदार लोकांविषयीं मोठा मार्मिक अभिप्राय दिला आहे. ते म्हणतात “ इतके सरदार आहेत यांपैकीं एक जणास आपून पाहिले कीं हा गृहस्थ कोणत्या उपयोगी पडेल ? तर मला वाटतें कीं या पृथ्वीवर कोणतेंही काम त्यांचे लायक सांपडावयाचें

नाहीं. पंचवीस वर्षांपासून त्यांच्या वृद्धापकाळास प्रारंभ होतो. कितीकांस चाळिसाव्या वर्षीं धरावयास दुसरे लोक लागतात. स्वतः लिहिणें पुसणें तर कोणासही येत नाहीं. सर्वांस वकील व कारभारी पाहिजेत. ज्यांस वकील कारभारी नाहींत त्यांनीं दरबारांत जाण्याचे दिवशीं एखादा मजूरदार तरी बरोबर करून नेला पाहिजे. यजमानास बोलावयाचें माहीत नाहीं. कारकुनांनीं पिसें लावून, कावळा करतात तसा करून, एजंटास भेटवावा, हे अमके म्हणून सांगावें. परंतु खासे पाहिल म्हणजे नंदी किंवा शुद्ध नर्मदेंतले बाण ! उठण्याची वेळ झाली म्हणजे महाराजांस उठा म्हणोन देखील सांगितलें पाहिजे. कारकुनानें म्हणावें ‘ आज साहेब फार खुष होता. आपल्याशीं फार बोलला. इतकें कोणापाशीं बोलत नाहीं. ’ मग यजमानांनीं म्हणावें आमचा दिवाणजी हुशार आहे. घरांत व्यवस्था पाहिली तर दरबारापेक्षां अधिक. पण वाण्याची उचापत व सरकारचें कर्ज ! त्यास व्याज शेंकडा पंचवीस रुपये ! सरकारी कामदार व पदरचे कारकून दोघे मिळून यांना फसवितात. ह्यास उजाडल्या मावळल्याची खबर नाहीं व योग्यता नाहीं. व्यापाराच्या कामांत उपयोग नाहीं, विद्वान नाहींत, चाकरी करण्यास बळकट नाहींत. सरासरी जिवंत मात्र असतात. त्यांचे जिणें फार वाईट व लज्जेचें आहे. यांनीं आतां सरंजामाची आशा सोडावी व आपल्या सुधारणुकीस लागावें.

हें सरदार लोकांविषयीं झालें. विद्वज्जन व इतर सद्गृहस्थ यांची स्थितीही विशेष समाधानकारक दिसत नाहीं. या वेळीं शाळा,

लायब्ररी, म्युनिसिपालिटी, दवाखाना, वगैरे लोकोपयोगी संस्था सुरू झाल्या होत्या, तशा कांहीं सभाही भरूं लागल्या होत्या. पुण्यास या वेळीं ‘ कल्याणोन्नायक मंडळी ’ नांवाची एक मंडळी सभा भरवीत असे. सुप्रसिद्ध मोरशास्त्री साठे हे या सभेचे प्रमुख होते. ही सभा दर आदित्यवारीं जमे व त्यावेळीं शास्त्रीबुवा एखाद्या विषयावर सुश्राव्य भाषण करीत.

या सभेंतील विषय व त्यांची चर्चा आज आपणांस हसूंच लोटवील. ‘ पुण्याचें वर्णन ’ कार म्हणतो. “ ता. १६ डिसेंबर सन १८५६ रोजीं ही सभा भरली होती. त्या सभेंतील विषय ‘ उष्णाच्या योगानें पाण्याची वाफ आकाशांत जाऊन त्याचे मेघ होऊन पर्जन्य पडतो ’ हा असून तो शास्त्रीबुवा वेदशास्त्रपुराणें यावरून सिद्ध करीत असतां मोठमोठाले गृहस्थ व पंडित शंका काढीत कीं, पर्जन्य उष्णापासून पडत नाहीं. इंद्र देवता आहे व मेघ हे हत्ती आहेत. त्यांस इंद्रानें आज्ञा केली म्हणजे पाऊस पडतो. अशा शंका त्या वेळचे महापंडित काढीत होते. ”

आम्हांस या कशाचेंही आश्चर्य वाटत नाहीं. आम्हांस आश्चर्य या गोष्टीचें वाटतें कीं पुण्यांत बाजीराव व नानाफडणवीस यांसारखे राजकारणी पुरुष झाले, बापू गोखले व विठ्ठल शिवदेव यांच्यासारखे समशेरबहाद्दर झाले, रामशास्त्री प्रभुणे यांच्यासारखे निस्पृही न्यायधीश झाले व राघोबा व रावबाजी यांच्यासारखे विलासी राजे झाले परंतु

त्यास आज नामशेष झालेल्या प्रतिष्ठानाचें महत्व आणून देणारी व्यक्ति सबंध पेशवाईत पुण्यांत कशी निपजली नाहीं ?

पुणें या गोष्टींची व अशा व्यक्तीची जिज्ञासापूर्वक वाट पहात होतें, व कालांतरानें त्याची महत्त्वाकांक्षा सफल झालीही. परंतु ती चारपांचशें वर्षांतील दोनचार राज्यक्रांत्यांनंतर. सार्वत्रिक शिक्षणप्रसार व मुद्रणकलेच्या उदयानंतर. कारण ब्रिटिश अंमलाचा आरंभ झाला तेव्हां आमच्य देशांत या गोष्टींचा मागमूसहि नव्हता.

स्वार्थी हेतूच्या आरोपांतून जगांत कोणीही सुटत नाहीं. इंग्रजांनीं पेशवाईनंतर महाराष्ट्रांत नव्या पद्धतीचें शिक्षण देण्यास सुरुवात केली ती (१) सरकारला राज्यकारभार चालविण्यास नोकर लोकांची वाण पडूं नये म्हणून, ( २ ) हिंदी लोकांना पाश्चात्य संस्कृतीचें वळण लागून ते परावलंबी बनावे व आपल्या व्यापारी मालाला कायमचें गिऱ्हाईक मिळावे म्हणून ( ३ ) अथवा त्यांनीं धर्मांतर करून खिस्ती व्हावें म्हणून सुरू केली, असें कांहीं लोक समजतात. हीं कारणें खरीं असोत अथवा कल्पित; आम्हांस त्यांच्याशीं कर्तव्य नाहीं. आमचें लक्ष्य परिणामाकडे आहे. ते असें कीं, याच सार्वत्रिक शिक्षणाच्या प्रभावानें पुण्यास आमच्या काळचें प्रतिष्ठान बनविलें !

“ विद्या व दक्षिणा हीं परस्परांचें कार्य व कारण दोन्ही होऊं शकतात. कोणत्याही देशांत सुप्रतिष्ठित असलेल्या सरकाराला प्रजेच्या धर्मरक्षणाची म्हणून कांहीं तरी व्यवस्था करावीच लागते. यामुळें

सुधारलेल्या पाश्चात्य देशांतूनही सरकारच्या अनेक खात्यांपैकी धर्म-मंडळ हें एक खातें असतेंच. मराठी राज्यांत धर्ममंडळ म्हणजे खास सरकारी पुरोहित, उपपुरोहित अशा तऱ्हेचा अधिकारी वर्ग म्हणून नेमलेला नव्हता. परंतु दर वर्षीं निरनिराळ्या प्रसंगीं दक्षिणा वगैरे वांटल्या जात. शिवाय कोठें खिचडी, कोठें सदावर्त, कोठें रोजचा बांधून दिलेला धर्मादाय, अशा पद्धतीनें धार्मिक व विद्वान् लोकांचा योगक्षेम चालविला जात असे. या द्रव्याश्रयावर उपजीविका करणारे विद्वान् शास्त्रीपंडित घरीं शिष्य पढवून विद्येची परंपरा चालवीत. अशांचा परामर्ष घेण्याकरितां सरकारांतून जो पैसा खर्च होई तोच विद्यावृद्धीवर खर्च झाला असें समजण्यांत येत असे. अशा रीतीनें पेशवाई अखेरपर्यंत विद्येंतून दक्षिणा निमार्ण होत असे; परंतु पेशवाई नंतर याच दक्षिणेंतून विद्या निर्माण होण्यास सुरुवात झाली "+

या वेळीं आरंभीं इंग्रजी शिक्षणाबद्दल पुण्यांतील लोकांत साधारणपणें पुष्कळ वाईट ग्रह होते. परंतु जे लोक दूरदर्शी व चाणाक्ष होते त्यांच्या लवकरच लक्षांत आलें कीं, दिवसानुदिवस शास्त्राध्ययनाची योग्यता कमी कमीच होत जाऊन, इंग्रजी विद्येची प्रतिष्ठा अधिकाधिक होत जाणार. पुण्याच्या संस्कृत पाठशाळेंतील या वेळचे एक अध्यापक सुप्रसिद्ध मोरशास्त्री साठे हे, असें समजणारांपैकींच एक होते. त्यांनीं स्वतः उतार वय झालें असतांही इंग्रजी विद्येचा अभ्यास आरंभिला होता व ' या उप्पर खांद्यावर शालजोडी टाकून

---

+ केळकरकृत लो. टिळक यांचें चरित्र पृ. ६२-६३.

हिंडण्यांत प्रतिष्ठा राहणार नाहीं, तूं शाहणा असशील तर इंग्रजी शीक ' असें यांनींच आपले पट्टशिष्य जे कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनां उपदेशिलें असल्याचें सर्वप्रसिद्ध आहे. कृष्णशास्त्र्यांच्या हातून पुढें मराठी वाङ्मयाची जी बहुमोल कामगिरी झाली तीमुळें ते स्वतः तर मराठी वाङ्मयाच्या आद्यप्रवर्तकांच्या जागीं बसून लोकादरास पात्र झाले हे तर खरेंच; परंतु असें होण्यांत ज्यांचा उपदेश व प्रयत्न कारणीभूत झाला ते मोरशास्त्री साठेही स्मरणीय आहेत, यांत शंका नाहीं.

---

## प्रकरण ३ रें.

### कथावाङ्मयाचा अभ्युदय.

सन १८१८ पासून राजकीय उलाढालीपासून मुक्त झालेलें पुणें स. १८५० त पूर्ण शांततेचा व सुखसमाधानाचा उपभोग घेऊं लागलें होतें. सुमारें १८३७ मध्यें इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यानंतर सुधारलेल्या देशांतील विद्यालयें, वाचनालयें, सभा, मंडळ्या इत्यादि गोष्टी लवकरच या शहरांत अस्तित्वांत आल्या. नवीन राज्यपद्धतीच्या सहवासानें व या नवीन चळवळी उत्पन्न झाल्यापासून पुणें शहराच्या सामाजिक व्यवस्थेंतही बरेंच स्थित्यंतर होत चाललें; व त्यामुळें जुन्या व नव्या लोकांच्या पोषाखांत, रीतरिवाजांत व आचार-विचारांत हळू हळू पण स्पष्ट फरक दृष्टोत्पत्तीस पडूं लागला.

अशा शांततेच्या व सुखसमाधानाच्या काळीं सामान्य लोकांस लागणारीं जीं करमणुकीचीं निरनिराळीं साधनें असतात, त्यांतच कथावाङ्मयाचा समावेश केला जातो. परंतु असलें वाङ्मय तयार होण्याचा काळ जसा अद्यापि आला नव्हता, तसा त्याचा कर्ताही अद्यापि निर्माण व्हावयाचा होता. परंतु त्याचा काल येतांच कर्ताही पुढें सरसावला व त्यानें एकच काय—शेंकडो नवीन व मनोरंजक गोष्टींचें पेवच वाचकांपुढें फोडलें ! ह्या कथा म्हणजे ' अरबी भाषेंतील सुरस गोष्टी ' असून त्यांचा कर्ता कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे होत.

चिपळूणकरांचें घराणें मूळचे पावस या गांवचें. हें गांव रत्नागिरी जिल्ह्यांत आहे. सतरावे शतकाचे आरंभीं या घराण्यांतील एक पुरुष त्रिंबकक्षेत्रीं गेला. त्यास त्रिंबकेश्वराजवळील श्रीहर्ष किल्ल्याची फडणिशी मिळाली. ती सुटल्यावर त्या वंशांतले हरिपंत हे बाजीराव पेशव्यांचे बन्धू चिमाजी आप्पा यांचे शागिर्द झाले. इ. स. १८१८ त पेशवाई बुडून बाजीराव व चिमणाजी आप्पा ब्रह्मवर्तास गेले, तेव्हां हरिपंत पुण्यासच राहिले व एका अक्रूचें दुकानावर आपलें पोट भरूं लागले.* हेंच कृष्णशास्त्र्यांचे वडील होत. कृष्णशास्त्र्यांचा जन्म पुणें येथें स. १८२४ सालीं झाला. ह्यांच्या वडिलांनीं लहानपणीं ह्यांजकडून वेदाभ्यास करविला. १४ वर्षांचे झाल्यावर ह्यांना विश्रामबागेंतील मराठी शाळेंत घातलें. तेथें एक पाठशाळाही होती. नामांकित मोरशास्त्री साठे हे तिचे मुख्य अधिकारी

* करमरकरकृत ' महाराष्ट्राचे पंचप्राण ' पृ. ३३.

होते; व तींत अनेक शास्त्रें पढवीत असत. ह्या पाठशाळेंत कृष्णशास्त्री यांचा प्रवेश झाल्यावर त्यांच्या हुशारीबद्दल त्यांस विद्यावेतन मिळूं लागलें. शास्त्रीबुवा उपजत मोठे बुद्धिमान् असत. त्यांनीं अल्पकाळांत अलंकार, न्याय व तर्क या तीन शास्त्रांचा अभ्यास इतका उत्तम केला कीं, केवळ विनोदार्थ एकेवेळीं त्यांचा व मोरशास्त्री साठे ह्यांचा पूर्वपक्ष उत्तरपक्ष होऊन कृष्णशास्त्री यशस्वी झाले. तेव्हा मोरशास्त्री फार संतुष्ट होऊन त्यांनीं आपल्या अंगावरची शालजोडी कृष्णशास्त्री ह्यांच्या अंगावर घातली; आणि "इच्छेत्सर्वत्रविजयं शिष्यादिच्छेत्पराजयम्" ह्या वचनांतील समाधानाचा त्यांनीं पूर्ण उपभोग घेतला. तेव्हांपासून मोरशास्त्री त्यांना 'बृहस्पति' म्हणूं लागले. पुढें विश्रामबागेंतील वाड्यांत इंग्रजी शिकवूं लागले तेव्हां कृष्णशास्त्री यांनीं त्या भाषेचा सुमारें पांच वर्षे अभ्यास केला. नंतर त्यांनीं सरकारी नोकरी पतकरिली. ते अनुक्रमें भाषांतरकार, ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल व वर्तमानपत्रें आणि पुस्तकें यांचे रिपोर्टर होते. विशेषतः शेवटची कामगिरी त्यांनीं इतक्या उत्तम रीतीनें बजाविली कीं, त्यांच्या इतकें काम साहेब लोकांस देखील करतां आलें नसतें, असें सरकारनें म्हटलें. वादविवादांत तर त्यांच्यापुढें कोणाची मात्रा चालत नसे. मराठी भाषा त्यांच्यापुढें केवळ हात जोडून उभी होती. अर्वाचीन कविमालिकेंत हें एक मोठें रसिक व मर्मज्ञ कविरत्न चमकून गेलें. कृष्णशास्त्र्यांचा 'पद्यरत्नावली' हा ग्रंथ सर्वप्रसिद्ध असून तो विद्-

न्मान्य आहे. हे कवि व ग्रंथकार सन १८७८ च्या मे महिन्याच्या २० व्या तारखेस पुणें मुक्कामीं काळजाच्या रोगानें निवर्तले.×

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांस गद्यवाङ्मयाचे जनक म्हणण्यापेक्षां कथावाङ्मयाचे जनक म्हणणें अधिक शोभतें कृष्णशास्त्री निबंधकार होते, उत्कृष्ट कवि होते, विद्वान पंडित होते, तसेंच ते कथा-कादंबऱ्यांचे मार्मिक लेखक होते. असें नसतें तर ज्यांनीं, ' अनेक विद्यामूळतत्वसंग्रह ' ' अर्थशास्त्रपरिभाषा, ' ' पद्यरत्नावलि, ' ' साक्रेटिसाचें चरित्र ' व ' रासेलसचें चरित्र ' इत्यादि ग्रंथ लिहिले, ज्यांनीं आपल्या पूर्ववयांत तीन शास्त्रांचें अध्ययन करून आपल्या गुरूकडून आपणास ' बृहस्पति ' म्हणवून घेतलें, त्या कृष्णशास्त्र्यांस अरबी भाषेंतील सुरस गोष्टींचा मोह खात्रीनें पडला नसता कृष्ण-शास्त्र्यांच्या या महत्वपूर्ण कामगिरीचा पुष्कळ लोकांनीं विपर्यास केला आहे. आम्हांस तसें कांहींच वाटत नाहीं. कृष्णशास्त्र्यांची ही कृति यथायोग्य होती. त्यांनीं कथावाङ्मयाच्या जीर्णोद्धाराकरितांच जन्म घेतला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं त्यांचें शास्त्रपठण, त्यांची विद्वत्ता, त्यांचा मोठेपणा व त्यांचा मानमरातब वगैरे एकही बाबत त्यांस आपल्या आवडत्या विषयापासून पराङ्मुख करण्यास समर्थ नव्हती

अरबी भाषेंतील सुरस गोष्टीसारख्या मोठ्या ग्रंथाचें सबंध भाष तर कां होईना—पण तें सुबोध व सरळ मराठी भाषेंत

× चं. शि. गोऱ्हेकृत ' अर्वाचीन कविता. '

करणें, किती अवघड व कंटाळवाणें असूं शकेल याची कल्पना कवळ अशा कामास प्रवृत्त झालेल्या ग्रंथकारासच करतां येण्यासारखी आहे. कृष्णशास्त्र्यांनीं हें काम फारच उत्कृष्ट रीतीनें तडीस नेलें आहे. आणि एखादें काम आपल्या हातून तेव्हांच चांगलें होतें कीं, ज्या वेळीं तें आपणास मनापासून आवडत असतें. कर्त्यास आपल्या कार्याशीं तद्रूप व्हावें लागतें. असें न झालेलें अथवा मोलानें केलेलें काम कालांतरानें कवडीमोलच ठरतें ! हाच नियम ग्रंथलेखनास लागू आहे गोष्टी सांगण्याची व लिहिण्याची कल्पकता व पात्रता कृष्णशास्त्र्यांच्या अंगीं मूलतः नसती तर या गोष्टी आज ज्या सफाईदार रीतीनें लिहिल्या गेल्या आहेत त्या सफाईदार रीतीनें लिहिल्या गेल्या नसत्या. कृष्णशास्त्र्यांनीं ह्या गोष्टी जरी इंग्रजींतून अनुवादिल्या आहेत तरी वाचीत असत असें वाटतें कीं, त्या जणूं काय प्रथम मराठींतच लिहिल्या असाव्या कृष्णशास्त्र्यांनीं ह्या गोष्टी ज्या इतक्या उत्तम रीतीनें लिहिल्या त्या कांहीं एकाएकीं लिहिल्या नाहींत. या कामीं त्यांनीं लहानपणापासून आपला हात वळविला होता. कँडीसाहेबांनीं सन १८५० सालीं छापून प्रसिद्ध केलेल्या वाचनपाठमालेंतील पहिल्या भागांत कृष्णशास्त्र्यांच्या तीन गोष्टी सांपडतात पुढील गोष्ट त्यांपैकींच एक आहे.

## दोन रुपयांची योग्यता.

" पिंपळगांवीं नारोपंत म्हणून एक गृहस्थ रहात असे. तो खाऊन पिऊन चांगला सुखी होता; व त्याला रामा म्हणून एक मुलगा

होता. रामा तेरा वर्षांचा झाल्यावर नारोपंतानें, आपला मुलगा मोठा विद्वान् व्हावा या हेतूनें त्याचा खाण्यापिण्याचा वगैरे सर्व नीट बंदोबस्त करून, त्यास पुणें शहरीं एका मोठ्या शाळेंत चांगल्या भल्या विद्वान् पंतोजीच्या हाताखालीं विद्याभ्यास करावयास ठेविलें.

" रामा हा गुणानें फार चांगला होता. त्याचा गुरु त्यास जें जें सांगे तें तें तो जीव लावून शिके. त्यास खेळण्याचें किंवा दुसरें कांहीं दुर्व्यसन अगदीं नव्हतें. तरी रामा ज्या वर्गांत होता, त्याच वर्गांत कांहीं मुलें होतीं; त्यांस खाऊस किंवा त्यांस पाहिजे तो खर्च करण्यास घरून दरमहा दोन रुपये मिळत, ते पाहून त्यांसारखे आपणासही दरमहा दोन रुपये मिळत असावे असें रामास वाटून त्यानें आपल्या बापास एक पत्र लिहिलें. त्यांत मला दोन रुपये पाहिजेत म्हणून उघड तर लिहिलें नाहीं; परंतु माझ्या वर्गांतील सोबत्यास खासगत खर्चास दरमहा दोन दोन रुपये मिळतात, इतका मात्र मजकूर त्यानें आणिला होता.

" नारोपंत फार चाणाक्ष होता. तें पत्र पाहातांच त्यांतील अभिप्राय त्यास समजला. तरी त्यानें असा विचार केला कीं, नाहीं असें साफ म्हणून मुलास खट्टू करणें व त्याचें मन दुखविणें, हें नीट नव्हें तर आतां पोरपणामुळें दोन रुपये म्हणजे काय हें पुरें न समजून, अज्ञानानें तो ते मागत आहे; व त्याकरितां दरमहा दोन रुपायापासून खाऊ खाण्यापेक्षां दुसरे जे चांगले, थोर थोर उपयोग बहुत घडतात ते त्यास नीट समजून सांगावे, म्हणजे तो शाहाणा

होऊन, आपल्या आपणच दोन रुपये मागेनासा होईल. असा योग्य विचार करून नारोपंतानें रामास पुढील पत्र लिहिलें:-' अनेक आशिर्वाद विशेष, त्वां पाठविलेलें पत्र पाहून आम्हांस मोठा संतोष झाला. तुझ्या पत्राचा सर्व अभिप्राय समजून हें उत्तर लिहिलें आहे. त्यास त्वां चांगलें लक्ष्य देऊन वाचावें, म्हणजे तुला आमचा सर्व मानस कळेल.

" पाऊण शेर पीठ व पावशेर दूध असलें म्हणजे तेवढ्यानें एका बाप्याचें पोट चांगलें भरून त्यास प्रकृति न बिघडतां दिवसभर धंदा करण्याची शक्ति असते आणि तितक्या पिठास व तितक्या दुधास मिळून रोजचे दोन आणे लागतात, तर ह्याप्रमाणें दोन रुपायांत एका मनुष्याचें पोट सोळा दिवस चांगलें भरेल. "

" आपल्या ह्या देशांत मजूरदार गड्यास दोन आणे रोज मिळतात, व लावणी कापणीच्या वगैरे चणचणीच्या दिवसांत त्यास कांहीं जास्ती मिळतें. तें सर्व एकत्र धरून वर्षाची सरासरी करून पाहतां त्यास चार रुपये दरमहा पडतात. त्याचीं बायकामुलें कांहीं मोलमजूरी करून सुमारें एक रुपाया दरमहा काढतात, एकूण पांच रुपये झाले. तितक्यावर नवराबायको व तीन मुलें अशा पांच मनुष्यांस अन्नवस्त्र व राहण्यास जागा इतक्या गोष्टींची यथास्थित सोय होते आणि ह्याप्रमाणें दोन रुपये दरमहा असले म्हणजे दोन मनुष्यांचा चांगला निर्वाह होईल.

" ज्यांच्या पदरीं लहान लहान मुलेंलेंकरें फार व ज्यांच्या घरीं दारिद्र्य म्हटलें तर अठरा विश्वे, असे लोक ह्या आपल्या गांवांत बहुत

आहेत. आतां आपण जर दोन रुपये खर्चून त्यांतून दोहोंस दरमहा आठ आठ आण्याचे दाणे घेऊन दिले, तर ते लोक आपला मोठा उपकार मानतील व तेवढ्या दाण्यांनीं त्यांच्या मुलांबाळांस सकाळची भाकरी खायाला मिळेल. ह्याप्रमाणें आपण दोन रुपये खर्चल्यामुळें चार कुटुंबांतील माणसें रात्रंदिवस आपणांस दुवा देत जातील.

" हे प्रकार तुला सांगितले. इतक्या प्रकारांनीं दरमहा दोन रुपये परोपकाराकडे लावतां येतात. आतां दरमहा दोन रुपये खर्च करून स्वहित करून घेण्याचे एक दोन प्रकार तुला सांगतों. मला ठाऊक आहे कीं, तुला नकाशे व परदेशांतील पाखरांचीं व जनावरांचीं चित्रें ह्यांचा फार शौक आहे. आणि दरमहा दोन रुपये ह्याप्रमाणें रुपये जमविले, तर वर्षाच्या कांठीं तुझेजवळ चोवीस रुपये जमून तुला ते नकाशे व तीं चित्रें पुष्कळ घ्यावयास सांपडतील. तसाच तुला प्राचीन संस्कृत कविता वाचण्याचा भारी छंद आहे, व हल्लीं पुण्यांत पाठशाळेंतील छापखान्यांत तसलीं बहुत नाटकें व चंपू छापीत आहेत, तर दरमहाचे दरमहा दोन रुपये पुस्तकें घेण्याच्या कामास त्वां लाविले तर किती पुस्तकें तुझ्या संग्रहास पडतील बरें ? आणि तसेंच हीं चित्रें व पुस्तकें तुझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुझ्या व तुला ईश्वरीकृपेनें जर पुढें मुलेंबाळें झालीं तर, यांच्या व तुझ्या मित्रांच्या अशा किती लोकांच्या उपयोगी पडतील बरें ? आणि दरमहा जर त्या दोन रुपयांचा खाऊ खाल्ला, तर खाशील तेव्हां मात्र काय एक घटका, अर्धी

घटका, त्या पदार्थाची गोडी तुझ्या गळ्यांत आहे तेथपर्यंत मात्र तुला सुख होईल, आणि ती गेली म्हणजे पुन्हा कांहीं नाहीं.

" दोन रुपये दरमहा खर्च करून स्वहित किंवा परहित होण्याचे असे आणखी बहुत रस्ते आहेत. ते सर्व सांगण्यास शंभर पत्रें देखील पुरणार नाहींत. तुला दरमहा दोन रुपये देण्यास माझा असंतोष आहे असें तूं समजूं नको; परंतु त्यापासून असे चांगले उपयोग घडत असतां व्यर्थ खेळ घेण्यास व मेवामिठाई खाण्यास ते खर्चणें हें तुजसारख्या समजूतदारास योग्य आहे असें मला दिसत नाहीं. बहुत काय लिहिणें हे अशिर्वाद."

" ज्यांतील अर्थ फार उघड आणि हृदयंगम व जे त्यास थोरपणा देऊन, त्याचे मनोहरण होईशा गोड गोड शब्दांनीं लिहिलेलें, असें हें पत्र पाहून रामास फार आनंद झाला व आपणास दरमहा दोन रुपये खाऊस असावे असें जें त्याच्या डोक्यांत वेड शिरलें होतें, तें सर्व गेलें."

इंग्रजीवरूनच कां होईना, पण अगदीं अल्प वयांत अशी सरळ, सुंदर व स्वाभाविक गोष्ट लिहितां येणें, हें त्या वेळच्य मानानें पाहातां खरोखरीच आश्चर्यकारक असून, त्यावरून गोष्टी लिहिण्याची पात्रता शास्त्रीबुवांच्या ठिकाणीं मूलतः वास करीत असल्याचें स्पष्ट दिसून येतें. आज या गोष्टीविषयीं आपण विशेष कांहीं न वाटलें तरी, पंचतंत्र व त्याची मराठी भाषा, आणि

शास्त्रीबुवांची वरील गोष्ट व तिची मराठी भाषा, यांजकडे पाहिल्यास आपण कोठून कोठें आलों, हें पाहून आपणास निदान आश्चर्य व आनंद वाटल्याखेरीज राहत नाहीं. बरें झालें कीं, अरबी भाषेंतील गोष्टींचें सुरस भाषांतर करण्यास आपणास मराठीचा बृहस्पतीच लाभला; नाहीं तर इतक्या सुबक भाषांतरासाठीं आपणास कदाचित् आपल्या हल्लींच्या गोविंद नारायण दातारांचीच वाट पहात बसावें लागलें असतें अद्याप !

पुण्यानंतर पहिल्यानें आपणास मुंबईकडे वळलें पाहिजे. कारण पुण्यातील शास्त्रीबुवांचा हा प्रयत्न वास्तविक पाहिलें असतां केवळ प्रतिध्वनिरूप असून, याचा ध्वनि पहिल्यानें मुंबईस निघाला. कारण मुद्रण, शिक्षण वगैरे अर्वाचीनकालीन सुधारणेच्या बाबती पहिल्यानें मुंबईस सुरू झाल्यामुळें त्यांचा परिणाम पहिल्यानें मुंबईवर घडून नंतर तो चोहोंकडे फैलावणें, हेंच बरोबर होतें. पुण्याप्रमाणें मुंबईसही या वेळीं एक मनोरंजक गोष्टी लिहिणारा सुविख्यात गृहस्थ उदयास आला. या गृहस्थाचें नांव सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे हें होय

" मराठी भाषेचे आद्यकवि जसे ज्ञानेश्वर होते, तसे सदाशिव काशिनाथ छत्रे हे मराठी भाषेचे आद्य गद्य ग्रंथकार होत. कै. दादोबा पांडुरंग यांनीं त्यांस या सन्मान्य जागीं बसविलें आहे, त्या पक्षीं ते त्यास सर्वस्वी पात्र होते असें म्हणणें भाग आहे

बापूसाहेबांच्या पूर्वजांविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं. प्रसिद्ध गणितशास्त्रज्ञ कै. केरूनाना छत्रे यांचे बापूसाहेब हे चुलते

होते अशी माहिती मिळते; त्यावरून नानाचें व त्यांचें मूलस्थान एकच, असें मानण्यास प्रत्यवाद दिसत नाहीं. त्यांच्या बालपणाच्या शिक्षणासंबंधानें कांहीं माहिती मिळत नाहीं; तथापि त्या काळच्या प्रघाताप्रमाणें त्यांस संस्कृताचें बरेंच शिक्षण मिळालें असावें, असें मानण्यास हरकत नाहीं ते इ. स १८०८ च्या सुमारास मुंबईस आले, त्या वेळीं त्यांस इंग्रजी मुळींच येत नव्हतें, व या भाषेचें ज्ञान त्यांना विद्यालयांत मुळींच मिळालें नव्हतें, असें म्हणतात. या सुमारास इंग्रजी विद्यालयांची मुळीं स्थापनाच झाली नव्हती, यावरून वरील गोष्ट खरी ठरते. ते एका मिशनरीपाशीं इंग्रजीचीं चारपांच बुकें खासगी रीतीनें शिकले होते, अशी लोकवार्ता आहे. त्यांचें इंग्रजीचें ज्ञान फार गहन होतें, असें दिसत नाहीं. कारण ‘ चिल्ड्रन्स फ्रेन्ड ’ या इंग्रजी पुस्तकाचें मराठी भाषांतर करतांना, यांस बाळशास्त्री जांभेकर यांची मदत घ्यावी लागली होती, असें सांगतात. मात्र मराठी भाषेचे ते उत्तम मर्मज्ञ होते, असा त्यांचा सार्वत्रिक लौकिक आहे.

बापूसाहेबांच्या कालीं, इंग्रजी विद्येसंबंधानें लोकांचे फार दुराग्रह होते. अशा स्थितींत कोणी एतद्देशीय आंग्लभाषाभिज्ञ वजनदार गृहस्थ मदतीस घेतल्याशिवाय, शिक्षणप्रसाराचें काम तडीस जाणार नाहीं, असें सरकारी अंमलदारांच्या लक्षांत येऊन, ते तशा गृहस्थाच्या शोधांत होते. अशा वेळीं, ज्या मिशनरीपाशीं बापूसाहेब इंग्रजी शिकले होते, त्यानें आपल्या शिष्याची शिफारस त्या अधिकाऱ्यांकडे केली व त्यांस त्यांजकडे नेऊन भेटविलें.

त्यांचा ग्रह बापूसाहेबांसंबंधानें फार अनुकूल झाला व त्यांच्या शिफारशीनें त्यांस देशी शाळांचे तपासनिसाची मोठ्या मानाची व चांगल्या पगाराची जागा मिळाली. हें काम बापूसाहेबांस सन १८१४ च्या सुमारास मिळालें असावें, असा अंदाज आहे; व तें त्यांनीं १७ वर्षें केलें असें म्हणतात. या अवधींत त्यांनीं शिक्षणप्रसाराचें काम फार केलें अशी प्रसिद्धी आहे तत्कालीन लोकसमाजांत त्यांचें मोठें वजन होतें याबद्दल लेखी दाखला आहे. बापूसाहेबांनीं लोकांस उपदेश करून, इंग्रजी विद्येसंबंधाचे यांचे दुराग्रह नाहींसे केले व पुष्कळ गरीब मुलांस उत्तेजन देऊन त्यांस शिक्षणलाभ करून दिला. त्यापैकीं कित्येक विद्यार्थी पुढें चांगल्या नांवालौकिकास चढले. प्रसिद्ध बाळशास्त्री जांभेकर व भाऊ महाजन हे दोन विद्यार्थी पुढें कोणत्या योग्यतेस चढले हें सर्वविश्रुत आहेच.

बापूसाहेबांचीं वरील कृत्यें चांगलींच होतीं, परंतु ज्यावरून त्यांचें नांव महाराष्ट्रांत इतकें प्रसिद्ध आहे व पुढेंही अनंतकाल प्रसिद्ध राहील असें त्यांचें कृत्य म्हणजे ग्रंथलेखन हें होय. त्यांनीं केलेले सुप्रसिद्ध असे दोन ग्रंथ आहेत; ते ‘ बाळमित्र ’ व ‘ इसापनीति ’ हे होत. ह्या ग्रंथांचें मराठी भाषांतर करण्याची सूचना या वेळचे विद्याधिकारी यांनीं बापूसाहेबांस केली होती अशी दंतकथा आहे. त्या वेळीं बापूसाहेबांची मराठी भाषेंतील प्राविण्याविषयीं मोठी ख्याति होती. वरील पुस्तकाचा मूळ विषय मनोरंजक आणि बोधपर आहे. त्यांत भाषांतरकार पूर्ण रसिक, मार्मिक आणि उत्तम भाषावेत्ते, तेव्हां

' परस्परोभूषणभूष्यभावः ' या वाक्याप्रमाणें बापूसाहेबांनीं केलेलीं भाषांतरेंही सर्वोत्कृष्ट उतरलीं आहेत, हें काय सांगावयास पाहिजे ? त्यांस प्रगट होऊन आज शंभर वर्षें झालीं असतां, आणि इतक्या अवधींत विद्याप्रसार व ग्रंथरचना हीं कामें आजवर वाढत्या प्रमाणांत चालू असतां, त्यांच्या तोडीचीं दुसरीं पुस्तकें फार क्वचित् दाखवितां येतील असें वाटतें. सुबोध, सरळ आणि रम्य अशा भाषापद्धतीबद्दल तर त्यांचें अग्रस्थान आजपर्यंत ढळलें आहे, असें म्हणण्यास फारसा पुरावा पुढें करतां येणार नाहीं. पुन्हां पुन्हां वाचल्यानें या पुस्तकांचें मनोरमत्व कमी होत नाहीं, किंवा त्यांचा कंटाळा येत नाहीं. उलट वाचकांचा उत्साह व उल्लास कायम राहतो. निबंधमालाकारासारख्या मार्मिक ग्रंथकारानें बापूसाहेबांच्या भाषेची फार तारीफ केली आहे, इतकें सांगितलें असतां या बाबतींत कांहीं अधिक सांगण्याची आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. बापूसाहेब आपल्या वयाच्या ४४ व्या वर्षीं म्हणजे इ. स. १८३० या सालीं वारले.*

बापूसाहेबांच्या भाषेचा व अनुवादकुशलतेचा नमूना त्यांच्या बालमित्रांतील पुढील चुटक्यावरून चांगल्या रीतीनें कळून येण्यासारखा आहे.

## मैना.

मैना घ्या हो मैना. कोणाला मैना पाहिजेत ? अहा ! काय चांगल्या मैना आहेत ! असें बोलत एक मनुष्य यमनीचे दारावरून

* ज. र. आजगांवकर यांचा लोकमित्रांतील (आक्टोबर १९१०) लेखावरून.

चालला होता यमनी तें ऐकून दारीं गेली, आणि पहाते तों एक पांखरेंविक्या डोईवर मैनांचा पिंजरा घेऊन चालला आहे. त्या आंत उड्या मारीत आहेत, या काठीवरून या काठीवर बसताहेत आणि मधुर मधुर शद्ब करिताहेत; तेणेंकरून यमनी मोहित होऊन, केव्हां त्यांजवळ जाईन अशा उत्कंठेनें धांवली; थोडक्यांत चुकलें, नाहीं तर ती ओटीच्या कांठावरून पडलीच असती. ‘ मुली तुला मैना पाहिजेत ? ’ असें पांखरेंविक्यानें तिला पुसलें. ती म्हणाली ‘ पाहिजेत, पण थांब अंमळ, मी आंतून बाबाला पुसून येतें. ’ त्यानें बरें म्हणून पिंजरा ओसरीवर ठेविला. यमनी धांवत धांवत बापाकडे जाऊन म्हणते, ‘ बाबा ! बाबा ! लवकर ये ! ’

त्र्यंबकशेट—एवढी घाई कसची आहे यमने ?

यमनी—बाबा, ओटीवर एक पांखरेंविक्या आला आहे. त्याजवळ मैना पुष्कळ आहेत, आणि त्या फार चांगल्या आहेत.

त्र्यंबकशेट- मग, याचा तुला इतका हर्ष कसचा झाला ?

यमनी—बाबा, जर तूं सांगशील तर मी त्यांतली एक मैना विकत घेईन.

त्र्यंबकशेट—विकत घ्यायला तुझ्याजवळ पैसे आहेत काय ?

यमनी-हो, आहेत हे माझ्या पिशवींत.

त्र्यंबकशेट—पण त्या पाखराला चारा कोण घालील ?

यमनी- मी बाबा, मी तिला आपल्या हातानें चारीन.

त्र्यंबकशेट—होय, पण मला तुझें भय वाटतें

यमनी—कसचें बाबा ?

त्र्यंबकशेट—कीं तूं तिला उपाशीं किंवा तान्हेली एकादे दिवशीं मारशील.

यमनी - मी तिला उपाशीं किंवा तहानेनें मारीन ? तें मी कधीं होऊं देणार नाहीं. पहिल्यानें तिला खाऊं घातल्याशिवाय मी अन्नाला शिवणार नाहीं.

त्र्यंबकशेट—मुली तूं विसराळू आहेस, एकादे दिवशीं तरी तुला विसर पडेल, इत्यादि

गोष्ट मनोहर आहे. परंतु विस्तारभयास्तव ती पूर्ण करतां येत नाहीं. तथापि मैना घेतल्यावर कांहीं दिवसांनीं यमनीस तिचा खरोखरच कसा विसर पडला व यामुळें शेवटीं एके दिवशीं ती बिचारी आपल्या पिंजऱ्यांत चोंच वासून व पंख पसरून कशी मरून पडली याचें हृदयद्रावक वर्णन ज्यांनीं वाचलें नसेल त्यांनीं तें बाळमित्रांत अवश्य पहावें. अस्तु.

अशा प्रकारें प्राचीनतेचें पटल दूर फेकून नवीन युगांत प्रवेश केल्यास आमच्या कथावाङ्मयास आज सुमारें शंभर वर्षे झालीं, व अशा प्रकारें आमच्या कथावाङ्मयाचें धूरीणत्व छत्रे—चिपळूणकरां-कडे जातें.

रा. ब. गोपाळराव हरि देशमुख व रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांची कामगिरीही मराठी कथावाङ्मयास पोषकच होती; पण ती निराळ्या स्वरूपानें. लोकहितवादींच्या ' ऐतिहासिक गोष्टी ' वाखाखण्यासारख्या आहेत व दादोबा पांडुरंगांना आपलें लेखन कसें चित्ताकर्षक करतां येत असे हें आपण पाहिलेंच आहे.

---

## प्रकरण २ रें.

## गोष्टीची कादंबरी.

बाबत कोणतीही असो; तिची सुरुवात पायाशुद्ध पाहिजे आमच्या कथावाङ्मयास हें सुदैव लाभावयाचें होतें नवयुगांतील त्याचा उपक्रम पुण्यांत एका ' बृहस्पति ' कडून आणि मुंबईस तितक्याच योग्यतेच्या दुसऱ्या एका गृहस्थाकडून सुरू केला जाणें, त्याच्या भावी उत्कर्षाचें स्पष्ट चिन्ह होतें. यावेळीं त्यास दुसरेही अनेक शुभशकून होत होते. इंग्रजांचें राज्य सुस्थीर होऊं लागून त्यांच्यासारख्या भिन्न संस्कृतीच्या लोकांशीं आमचा परिचय अधिकाधिक दृढ होत चालला होता. लोकांत साक्षरता वाढूं लागली होती. मुद्रणकला आपली कला प्रकट करूं लागली होती. सुदीर्घ कालानंतर अखिल महाराष्ट्रास व विशेषतः पुण्यास शांततेचे दिवस पहि-

त्यानेंच प्राप्त झाले होते. लोक सुखी असून बहुजनसमाज अज्ञानांत होता. व्यवसायराहित्यामुळें लोकांस फुरसतही तितकीच होती.

नवयुगाच्या सुप्रभातीं अशा अनुकूल समयीं कृष्णशास्त्र्यासारखे व्युत्पन्न व बापूसाहेब छत्र्यासारखे प्रतिष्ठित गृहस्थ कथावाङ्मयाच्या जीर्णोद्धारार्थ निघालेले पाहून या वेळीं दुसरीही कित्येक शास्त्री व गृहस्थ मंडळी या कामीं उद्युक्त झाली. या श्रेणींत महादेवशास्त्री कोल्हटकर, लक्ष्मशास्त्री हळबे, वामनशास्त्री इस्लामपूरकर, पांडुरंगशास्त्री पारखी, शंकरशास्त्री पदे, गोविंदशास्त्री बापट वगैरे शास्त्रीमंडळींचा व बाबा गोखले, विनायक कोंडदेव ओक, रामचंद्र भिकाजी गुंजीकर, आनंदराव सखाराम बर्वे, नारायण सदाशिव रिजबुड, इत्यादि गृहस्थ मंडळींचा समावेश होतो. आणि अशा मंडळींनीं कंबरा बांधल्यावर रामजी गणोजी, बाळकृष्ण दिनकर वैद्य, गो. मो. कालेंकर, हरि बाबाजी, वगैरे लोक कां स्वस्थ बसणार आहेत ? वरील मंडळींनीं प्रतिष्ठित समाजाकरितां प्रतिष्ठित कथावङ्मयास प्रारंभ करतांच यांनींही अप्रतिष्ठित लोकांसाठीं अप्रतिष्ठित कथावाङ्मयास हात घातला.

आणि असें व्हावयास पाहिजेच होतें बहुजनसमाज हा निरनिराळ्या पायऱ्यांच्या लोकांनीं बनलेला असून, प्रत्येक पायरीच्या लोकांच्या जशा गरजा तशा आवडीही विशिष्ट असतात. अशा स्थितींत ज्या त्या वर्गासाठीं ज्या त्या वर्गाचें विशिष्ट कथावाङ्मय निर्माण होणें अपरिहार्य असतें. प्रत्येक व्यक्तीचीही हीच गोष्ट आहे; मग

अनेक पायऱ्यांच्या लोकांनीं बनलेल्या बहुजनसमाजाविषयीं ती तशी असेल, यांत नवल नाहीं. अप्रगल्भ वयांत प्रगल्भ वेष घेतल्यानें मनुष्याचें जसें हसूं येतें तसें तें त्याच्या इतर कृत्यांनींही येतें. म्हणूनच तो साहसा असें करीत नाहीं

आमच्या कथावाङ्मयानें एकदम उंच उडी घेणें त्यास शक्य नव्हतें आणि इष्टही नव्हतें. किंबहुना त्याच्या पहिल्या पुरस्कर्त्यांस नवीन कथावाङ्मय निर्माण करण्यापेक्षां लोकांच्या तोंडीं इतस्ततः विखुरलेलें कथावाङ्मय संशोधित व संकलित करण्याचें महत्वाचें काम करावयाचें होतें व तें त्यांनीं योग्य रीतीनें बजावलें. यांनीं अभ्दुताविषयीं यक्षगंधर्वांच्या आणि भुतासमंधा या, शौर्याविषयीं दरोडे व त्यांच्या निवारणाच्या, चातुर्याविषयीं भोजराज कालिदासाच्या आणि बीरबल बादशहाच्या, मुत्सद्देगिरीविषयीं नानाफडणवीसप्रभृति साडेतीन शहाण्यांच्या, विनोदाविषयीं कथेकऱ्यांच्या व मूर्खत्वप्रदर्शनासाठीं जांबईबुवांच्या, लोकांच्या तोंडा असलेल्या विविध गोष्टी एकत्र व उपलब्ध केल्या व कथावाङ्मयाचा पाया मजबूत केला. याच कथावाङ्मयांतून पुढें कित्येक कादंबऱ्या तयार झाल्या असतील ही गोष्ट निराळी; परंतु यापेक्षां श्रेष्ठ वाचनाची गोडी व पात्रता आम्हांत तेव्हां होतीच कोठें ?

रामचंद्र अनंत तुगलकृत ' जागती ज्योत ' ही गोष्ट कालानुक्रमांत पहिलें स्थान पटकावते. ही सन १८३८ त प्रसिद्ध झाली.

यानंतर सोळा वर्षे अगदीं सामसूम दिसतें. सोळा वर्षांनंतर म्हणजे सन १८५४ सालीं ' बाटसरांच्या गोष्टी ' प्रसिद्ध झाल्या, व रामजी गणोजींचें ' स्त्रीचरित्र 'ही याच वर्षी पुढें आलें. सन १८५६ त ' बैठक चावडी ' तयार झाली आणि बस्स–बर्थोल्डचें भाषांतर व रे. बाबा पदमनजी यांची ' यमुनापर्यटन–कादंबरी ' धरून सन १८५७ पर्यंत सुमारें पांच पुस्तकें आमचें कथावाङ्मयाचें सदर सुशोभित करतात पुढेंही बरींच वर्षे कथावाङ्मयाचें पाऊल असेंच मंद दिसतें आणि आपल्या इतिहासाच्या पहिल्या पाव शतकांत तें असूनही नसण्यांतच गणण्यांत येतें, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

परंतु काय असेल तें असो; सन १८५७ सालानंतर हें मान बदललें. आपणांत जी कांहीं सार्वत्रिक जागृति दिसूं लागली ती सारी सन १८५७ नंतर आणि आमच्या गोष्टींची कादंबरी होते तीही सन १८५७ नंतरच. तथापि यांत बुचकळ्यांत पडण्यासारखें कांहीं नाहीं. सन १८५७ चा सेनाविद्रोह हें जसें एक विघ्न होतें, तसाच तो एक चमत्कार होता. असें विघ्न आणि असा चमत्कार एकाएकीं घडून आल्यावर त्याचा प्रभाव निरनिराळ्या विषयावर निरनिराळ्या प्रकारानें घडून येणें साहजिक आहे. कथावाङ्मयावर याचा कांहीं अंशीं प्रतिकूल तर बव्हंशीं अनुकूल असा परिणाम झाला. प्रतिकूल परिणाम हा झाला का, त्याची पैदास दिरंगाईवर पडली आणि अनुकूल परिणामाविषयीं दुसरें कांहीं जरी सांगतां आलें नाहीं तरी एवढें

आम्हांस खात्रीनें म्हणतां येईल कीं, शांततास्थापनेनंतर असले प्रसंग कथावाङ्मय निष्पत्तीस पहिल्यानें कारणीभूत होतात मराठींतच काय, पण हिंदीं, बंगाली, इंग्रजी इत्यादि भाषांतहि या घटनेवर कथावाङ्मय निर्माण झालें आहे. किंबहुना या विषयावरील दुसऱ्या भाषेंतील पुस्तकें मराठीपेक्षां अधिक सुरस आहेत. ' झीनात-महाल ' सोडून मराठींत या घटनेवर 'हंबीरराव आणि पुतळाबाई' ही एकच काय ती गोष्ट आहे. परंतु हल्लींच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या कसोटीला ती उतरत नाहीं. म्हणजे तिच्या वाचनानें हल्लींच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या वाचकांची या विषयावरील कादंबरी-वाचनाची तहान भागत नाहीं अशा स्थितींत मराठी कादंबरीकार या घटनेवर उत्कृष्ट कादंबरी लिहिण्याच्या ऋणांतून मुक्त झाले आहेत असें जरी म्हणतां येणार नाहीं, तरी आपलें नाहीं आपल्या पूर्वींच्या लोकांचें लक्ष या विषयाकडे गेलें होतें, एवढीच समाधान मानावयास जागा आहे असो.

आमच्या गोष्टीची कांदबरी सन १८५६ त झाली; परंतु ती स. १८५७ सालच्या बंडाच्या वणव्यांत जळून गली ! रे. बाबा पदमनजी यांचें ' यमुना पर्यटन ' हें कांदबरीच्या धर्तीवर लिहिलेलें एक कल्पित कथानक आहे. तरी यांतला विषय त्यावेळीं लोकांत खरोखरी चाललेल्या सामाजिक सुधारणेसंबंधाचा आहे यांत विधवा-विवाहाच्या बंदीमुळें विधवांची कशी वाईट स्थिति होते आणि त्या योगानें समाजांत भयंकर अत्याचार होऊन समाज कसा बिघडत

आहे हें दाखविलें आहे. विषयप्रतिपादन शांतपणें पण वाचकांच्या मनांत ठसेल असें जोरानें केलें आहे; पण पर्यवसान ख्रिस्ती धर्मावर होत असल्यामुळें कीं काय न कळे—लेखक महाराष्ट्रीय असूनही त्यास ती मराठी वाचकांस लोकप्रिय करण्याच्या कामीं हार खावी लागली. अर्थात रेव्ह. बाबांची स. १८५६ तली ही कादंबरी, सन १८५७ तल्या वणव्यांत ती जळून गेल्याप्रमाणेंच आहे. याच्या उलट 'घाशीराम—कोतवाल' ची गोष्ट ध्या. कै. रा. ब. मो. का. विजयकरकृत, या ऐतिहासिक कल्पिलेल्या कादंबरीचा विषय यमुना-पर्यटन इतका जिव्हाळ्याचा नसतां व उलट त्यांत आमच्या लोकांची ठिकठिकाणीं टर उडविली असतांही 'यमुनापर्यटन' प्रमाणें सनातन धर्मावर प्रत्यक्ष हल्ला नसल्याकारणानें घाशीराम कोतवाल जरी सपशेल वांचला असें म्हणतां येणार नाहीं, तरी कांहीं काळ त्यानें निःसंशय टिकाव धरला. ज्या कादंबरीच्या प्रत्यक्ष नायकाला दगड-वृष्टीनें मृत्यु येतो, त्याच्या गोष्टीला थोडीबहुत दुखापत होणें आश्चर्यकारक नाहीं!

आतां कालमानानुरूप केवळ मनोरंजन करण्यापलीकडे विशेष उडी न घेतल्यामुळें याच काळांतील दुसऱ्या एक दोन कादंबऱ्या किती महत्त्व पावल्या आहेत त्या पहा. त्यापैकीं एकीचा तर मुळींच पत्ता नाहीं; पण हल्लीं दहावी आवृत्ति पाहिली आहे! त्या कादंबऱ्या म्हणजे बाबा गोखलेकृत 'राजा मदन' व लक्ष्मणशास्त्री हळबेकृत 'मुक्तामाला' ह्या होत. कै. म. गो. रानडे यांनीं सरकारी आज्ञेनें

इ. स. १८६४ पर्यंतच्या मुंबई इलाख्यांत प्रसिद्ध झालेल्या मराठी वाङ्मयाची पाहणी केली, तिच्यांत रेव्ह. बाबांच्या यमुनेस रावबहादूर सपशेल विसरले असून, वरील तीन्ही पुस्तकांचा मात्र त्यांनीं गौरव-पूर्वक उल्लेख केला आहे *

मुक्तमाला' लोकादरास पात्र झालेली पाहतांच 'रत्नप्रभा' (१८६६), 'मंजुघोषा' (१८६८), 'वसंतमाला' (१८६८), 'विश्वासराव' (१८७०), 'विचित्रपुरी' (१८७०), 'पुष्पमाला' (१८७२), 'विदग्धस्त्रीचरित्र' (१८७२), 'मधुसूदन व रूप-सुंदरी' (१८७२), 'कस्तूरिका व दीपसेन' (१८७६), व 'मित्रचंद्र' (१८८०) इत्यादि अद्भुतलीला दर्शविणाऱ्या सुमारें पांचपंचवीस बहिर्णींची जोड तिला अवघ्या पंधरावीस वर्षांत मिळाली आणि सन १९१६ अखेर तिच्या बहिर्णींची ती संख्या ११३ वर गेली.

---

* Under novels, three works deserve mention. Ghashiram Kotwal by late Rao Bah dur Moroba Kanoba, Muktamala by Laxman Shastri Halve and Raja Madan by Baba Gokgale Of the original Muktamala and Raja madan are the best

" Growth of Marathi literature " in Miscellenous Writtings by M G. Ranade page 17.

गोष्टीची कादंबरी.

ग्र. क्र. ३२८६...

बाबा गोखले यांचा ‘ राजा मदन ’ कोठें गडप झाला हें समजत नाहीं; परंतु तो आपल्या जनकाच्या लौकिकाप्रमाणें आणि नांवाप्रमाणेंही मोठा विलासी असला पाहिजे हें खास.

यापैकीं मुक्तामालेसंबंधानें कै. रानड्यांप्रमाणें निबंधमालाकारांनींही फार चांगला अभिप्राय दिला आहे. बाकीच्या कादंबऱ्याही कमी मनोरंजक होत्या असें नाहीं. परंतु हळबेशास्त्र्यांची वर्णनशैली व साधी पण प्रौढ शद्बरचना वगैरे बाबतींमुळें मुक्तामाला अधिक वाखाणली गेली. मुक्तामालेप्रमाणें ज्या अद्भुत कादंबऱ्या मराठी वाचकांस विशेष आवडतात त्या रिसबुडकृत ‘ मंजुघोषा ’ व ‘ विश्वासराव ’, जोरवेकरकृत ‘विचित्रपुरी’ व पारखीकृत ‘ मित्रचंद्र ’ ह्या होत. ह्या कादंबऱ्या अझूनही तितक्याच लोकप्रिय आहेत. अशिक्षितांत, अल्पशिक्षितांत व स्त्रीसमाजांत या पुस्तकांची चहा आहे. हीं व अशीं पुस्तकें पैदा होण्याचा काल जरी मागें पडला, तरी त्यांचें वाचन मागें पडलें असें म्हणतां येणार नाहीं. हीं पुस्तकें आजही लोकप्रिय आहेत व दीर्घकालपर्यंत तीं तशीं राहतील असें निदान हल्लींच्या अनुभवावरून तरी आम्हांस वाटतें.

मंजुघोषा, मित्रचंद्र व त्याच प्रकारच्या इतर कादंबऱ्या बहुतेक एका ठशाच्या आहेत. त्यांचीं संविधानकें कल्पनासृष्टींतून घेतलेलीं आहेत. आपल्यासारख्या आजकालच्या जगांत वागणाऱ्या माणसांना त्यांतल्या गोष्टींचा अनुभव कधींच येणें शक्य नाहीं. कथानकांतील

नायक, नायिका व त्यांचा परिवार यांच्या वागण्यासवरण्याची तऱ्हा, त्यांच्यावर आलेले प्रसंग इत्यादिकांकडे लक्ष्य दिलें म्हणजे असें वाटतें कीं, रहात असतील हीं माणसें अरबी भाषेंतील गोष्टींतल्या मनुष्यांच्या प्रदेशाजवळ कोठेंतरी. परंतु त्यांची बुद्धिमत्ता व तसेंच त्यांचें कलाकौशल्य, त्यांचीं कांचेचीं हंड्याझुंबरें, मूनलाइट इत्यादिकांची त्यांच्या बंगल्यांत रेलचेल पाहून, हे प्राणी एकोणि-णिसाव्या शतकांतलेच असावेत असेंही पण एकदां वाटतें अशी असंद्धता जबरी या सर्व पुस्तकांतून दिसून येते तरी ज्यावेळीं तीं लिहिलीं गेलीं त्यावेळीं सात्विक करमणुकीला दुसरें साधन नसल्या-मुळें त्यांनाच त्याकाळीं फार महत्व आलें होतें आणि याच कारणामुळें तीं अद्यापीही टिकाव धरून राहिलीं आहेत.

दुसरी श्रेणी सात्विक करमणुकीची. हीं पुस्तकें प्रसिद्ध करीत असतां आमची तिसरी श्रेणी यावेळीं काय करीत होती हें आपणांस पाहिलें पाहिजे. रामजो गणोजींचे स्त्रीचारित्र प्रसिद्ध झाल्यावर कल्या-णकर, चिंचणकर, गोंधळेकर, कानिटकर, गोडबोले, वगैरे गोष्टी लिहिणारे फर्डे लेखक कांहीं स्वस्थ बसणारे नव्हते आणि त्यांच्या चाहत्यांनीं त्यांस स्वस्थ बसूंही दिलें नसतें. त्यांनींही मराठी भाषें-तील बोधपर, मनोरंजक, अद्भुत, विलक्षण, सुरस, चमत्कारिक, लुच्चेगिरी आणि ठकबाजीच्या वगैरे अनेक प्रकारच्या शेंकडो गोष्टी उजेडांत आणल्या, त्यांचीं नावें, त्यांचे विषय, त्यांचें विवेचन वगैरे पहावें तों सर्वच कांहीं नमुनेदार दृष्टीस पडतें. 'अरे, पण मीच

गुलजार चंद्री ', ' गोमा गणेश पितळी दरवाजा ', ' चमेली कुत्रीचें कौतुक अथवा सुवर्णाचा लोटा ' टिमाजी माकडाचें चातुर्य अथवा माझी बहीण तुझी बायको ' ' भिजेन पण नाटक पाहीन ', ' लाडाव-लेली रंगी ', ' विद्वान् पोपट, पोपट पण पोपट, मौल्यावान् पोपट ', ' विलासी मोहना अथवा बाई आली पणांत बुवा बसले कोनांत ' वगैरे नुस्तीं नांवें वाचून जर आपणास हंसू येतें तर प्रत्यक्ष पुस्तकांचें वाचन किती मनोरंजक असूं शकेल हें कल्पनेनेंच ताडावें. तथापि नमुन्यासाठीं म्हणून पुढील एकच गोष्ट येथें देतों:—

## गळतें काय ? मुरब्बा !

" कांहीं वर्षांमागें नारायणराव म्हणून कोणी एक गृहस्थ साताऱ्यास रहात असे. तो मोठ्या उदार मनाचा असे. परंतु गरीबी-मुळें त्याला ज्याप्रमाणें वाटे त्याप्रमाणें वर्तणूक त्याला हातून होत नसे, म्हणूक तो रात्रंदिवस तळमळे. तरी त्याचा कांहीं एक इलाज चालत नसे. तथापि तो आपलेकडून होईल तितकें करून आपल्या शक्ती-प्रमाणें आल्यागेल्याचा समाचार घेत असे.

संसारांत स्त्री मनाप्रमाणें वागणारी असलीं पाहिजे; म्हणजे कसेही बरेवाईट दिवस आले तरी अब्रूनें राहण्यास सहसा पंचाईत पडत नाहीं. नारायणरावाची स्त्री यमुनाबाई हीही आपले पती माणेंच त्याला जें आवडेल त्या रीतीनें वागून आनंदानें आपला काळ घाल-वीत असे, म्हणून त्या उभयतांमध्यें कधींही तंटा बखेडा न होतां

सदोदित तीं मिळूनमिसळून वागत असे. कोणी कसाही प्रवासी असो; गांवांत आलेला आहे असें एकदां समजलें म्हणजे नारायणराव हस्तेंपरहस्तें होईल तितकें करून त्याचा समाचार घेत असे.

सखारामपंत म्हणून कोणी एक भिक्षुक राजापूरचा राहणारा भिक्षुकीच्या संबंधानें साताऱ्यास गेला होता. आल्यागेल्याचा समावेश नारायणरावांकडे ही गोष्ट सखारामभटास ठाऊक होती म्हणून यानें नारायणरावांचा शोध करून तो त्यांच्या घरीं उतरला तो तेथें गेला या समयीं अगदीं तिसरा प्रहर झाला होता, यामुळें तो क्षुधेनें आणि तृषेनें अगदीं व्याकुळ झालेला होता.

तो ओटीवर येऊन बसला हें यमुनाबाईनें पाहिल्यानंतर ती घरांतून बाहेर आली. नारायणराव त्या समयीं कांहीं कामाकरितां बाहेर गेला होता यमुनाबाई ओटीवर आल्याबरोबर सखारामभटानें तिला म्हटलें कीं, ' बाई, मी कालपासून उपाशीं आहे, आपलें नांव ऐकून येथें आलों आहे. माझेजवळ तांदूळ आहेत, तितके आपण शिजवून घालाल तर पहा, मजवर आपले मोठे उपकार होतील.

सखारामभटाचें हें भाषण ऐकून यमुनाबाईस वाटलें कीं, ब्राह्मण भिडस्त आहे असा प्रसंग याला कधीं आलेला नसेल म्हणून हा असें बोलतो आहे. मग ती त्याला म्हणाली, भटजी ! मला तुमचे तांदूळ नकोत. तुमची स्नानसंध्या होते आहे तोंपर्यंत मी तयारी करितें. तुम्ही उठा आतां. जा, ती तिकडे विहीर आहे, चला आं-

घोळ करा, असें सांगून त्याला स्नानाकरितां विहिरीवर पाठवून आपण घरांत गेली.

नारायणरावाची एक म्हैस होती; तिचीं शिंगें अतिशयित लांब लांब असून तीं जशी आपण वांव करितो, त्या वांवेप्रमाणें पसरलेलीं होतीं. सखारामभट स्नान करून आल्यानंतर संध्या करीत बसला असतां त्याची नजर त्या म्हशीच्या शिंगावर गेली. मग त्याला मोठें नवल वाटून तो यमुनाबाईस म्हणाला की ' बाई, तुम्हांस एक गोष्ट विचारणार आहे; पण आपण जर मला संतोषानें विचारण्याकरितां परवानगी द्याल तर विचारीन. '

त्यावेळीं यमुनाबाईस वाटलें कीं, हा या समयीं दुसरें तें काय विचारणार आहे ? तोंडी लावण्याची, कालवणाची वगैरे कशी काय तजवीज केली आहे म्हणून विचारील, अशी तिची समजूत होऊन तिनें त्याला म्हटलें कीं, ' भटजी तुमच्या मनांत जें काय विचारावयाचें असेल तें मनांत कांहीं एक अंदेशा न आणतां विचारा बरें.

सखाराम—दुसरें कांहीं नाहीं. विचारायचें म्हणून इतकेंच कीं, म्हैस घरीं बाळगली आहे वाटतें ?

यमुना—होय. कोणी येतो जातो अशा वेळेस तुमच्यासारखा. ताक तरी येथें फुकट देतो आहे कोण ? वस्ती पडली शहरची. तशांतून कोणाकडे गेलंच कोडग्यासारखें वागायाला एखादे दिवशीं, तर नवल परीच कदाचित् कोणी देईल वाटीभर म्हणा; पण तशान काय

आमचा निभाव लागतो. आल्यागेल्याचें घर म्हणा घटकाभर तुम्ही पाहुण्य वाचून एक देखील दिवस जातो आहे असं नाहीं. एक दोन आहेतच.

सखाराम—घेतलीत तरी केवढ्याला ही ?

यमुना वीस कीं एकवीस रुपायांना घेतली आहे असें वाटतं. कोणी आठवण धरून ठेवली आहे ! आज म्हटलं म्हणजे सात आठ वर्षं झालीं या गोष्टीला.

सखाराम—दूध तरी देते काय वेळेस मण आदमण ? इकडल्या म्हशी म्हटल्या म्हणजे फारच दुधाळ असतात म्हणून ऐकतों.

यमुना—मण आदमण दूध देणारी म्हैस जर तशीच गुजराथी घेतली तर या साताऱ्यामध्यें तिला रुपये दोनशें पडतात. एवढी महाग घेववते का बरं आमच्यासारख्या गरिबाला.

सखाराम—ही किती देते तर मग ? ही गांवठी घेतली असें दिसतें यावरून.

यमुना—गांवठी तर हो ! आमची गरीबाची म्हटली म्हणजे उडी किती ! फार म्हटलं तर पंचवीस, तीस म्हणजे पराकाष्ठा झाली. त्यांतून शेर दोन शेर देतेही वेळेला. अगदींच म्हणजे थोडकं देते असं नाहीं. इकडून तिकडून गुजारा होतो आमचा.

सखाराम—मग ही अशी कां घेतलीत ? इतकें दूध देणारी दुसरी लहान शिंगाची मिळाली असती, जर तशीच नीट परीक्षा

करून घेतली असती तर. ही तरी कांहीं वाईट आहे असें मी ह्मणत नाहीं; परंतु विचारावयाचें म्हणून इतकेंच कीं, जर ही आहे याच ठिकाणीं सदोदित बांधीत नसल्यास तर मग माझें विशेष बोलणें नाहीं. परंतु आहे याच ठिकाणीं जर बांधीत असल्यास तर मग मात्र मोठा विचार केला पाहिजे. कारण न जाणो ! ही आहे अशी याच ठिकाणीं जर मेली तर हिचीं हीं पसरलेलीं लांब लांब शिंगें तुमच्या या लहान दरवाज्यांतून जातील तरी कशीं ? याच विचारांत मी मघापासून पडलों आहें. कारण दरवाजा पडला अरुंद आणि ठेंगणा आणि तुमच्या या म्हशीचीं शिंगें पडलीं अफाट. तेव्हां कसें होईल म्हणून विचारतों.

सखारामभटाच्या मुखांतून याप्रमाणें अक्षरें निघालीं मात्र. मग काय विचारता ? तिच्या पायांचा जाळ मस्तकीं गेला. तिनें त्या रागाच्या झपाट्यामध्यें त्याला म्हटलें कीं, ‘ अरे मेल्या चांडाळा ! शिजवून घालते त्याचा उपकार फेडतोस काय हा ! हे घे तांदूळ, घाल बोडक्यावर आपल्या ! आणि हो चालता येथून. बसूं नकोस एथें. विघ्नसंतोषी कोठला. मेला आला आहे तरी कोठून कोण जाणें. दांडगा गुलाम ! ’

याप्रमाणें बोलून तिनें ते कडास आलेले तांदूळ तसेंच त्याच्या पदरांत घातले. बाईस राग आलेला पाहून सखारामभट अगदीं ओशाळून गेला. त्यानें आपल्या धोत्राची झोळी करून, त्यांत ते तांदूळ घेतले, आणि तसाच उपाशीं जाऊं लागला. तेव्हां त्यांतील पाणी

खालीं गळूं लागलें. त्या समयीं तें पाहून रस्त्यांत त्याला एकानें विचारलें कीं ' महाराज, गळतें काय ? त्यावर ' मुखरस ' असें सखारामानें उत्तर दिलें.

हें त्याचें भाषण ऐकून त्या गृहस्थास मोठेंच नवल वाटलें. त्यानें भटजीस पुन्हां विचारलें कीं ' महाराज आपले बोलण्याचा भावार्थ मी समजलों नाहीं. तेव्हां त्यानें त्याला झालेली सर्व हकीकत सांगितली. तें ऐकून त्या गृहस्थास वाटलें कीं, हा उपाशीं आहे. मग तो त्यास म्हणाला कीं तुम्हीं आतां आमच्या घरीं चलावें, आणि भोजन करून मग जेथें जावयाचें असेल तेथें जावें. बरें आहे म्हणून तो त्याचें घरीं गेला. पुढें भोजन झाल्यानंतर तो त्यास विचारूं लागला, तेव्हां तो गृहस्थ भटजीस म्हणाला कीं मुखरस विसरूं नका; नाहीं तर पुन्हां असले प्रसंग येतील *

* गो. वि. कानिटकर कृत ' अद्भुत चमत्कार संग्रह ' ( १८७८ ).

# प्रकरण ५ वें.

## एक पाऊल पुढें.

सन १८७५ ते सन १८८५ पर्यंतचा काल म्हणजे कांहीं फार नाहीं अवघीं दहा वर्षें. परंतु मराठी विदग्ध वाङ्मयाच्या इतिहासांत हींच दहा वर्षें विलक्षण क्रांतिकारक व म्हणूनच विशेष संस्मरणीय होत. हा अल्प काल महाराष्ट्र व महाराष्ट्रीयांच्या प्रत्येक बाबतीसंबंधानें महत्त्वाचा आहे, तसा तो मराठी विदग्ध वाङ्मया-संबंधानेंही आहे. या वेळीं बंडाळी मोडून देशांत सर्वत्र शांतता नांदत होती. विश्वविद्यालयें स्थापन झाल्यास दोन तपें होऊन गेलीं होतीं व शेंपन्नास महाराष्ट्रीय पदवीधर म्हणून चमकूं लागले होते. वृत्तपत्रें व मासिक पुस्तकें यांचा प्रचार वाढत्या प्रमाणावर होऊं लागला होता. शिक्षण, पुनर्विवाह, परदेशगमन, अंत्यजोद्धार वगैरे गोष्टींचा पाया पडून गेला होता. प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज, शारदासदन वगैरे मतविशिष्ट व कार्यविशिष्ट संस्था अस्तित्वांत आल्या होत्या; एवंच महाराष्ट्र या वेळीं संक्रमणावस्थेच्या पहिल्या प्रसंगाशीं तोंड देत असून, वेळ फार आणीबाणीची होती.

नूतन संस्कारामुळें आणि नव्या शिक्षणामुळें महाराष्ट्रांतील रीतरिवाज सहजच पण नकळत बदलत होते. ता. १८ सप्टेंबर सन १८७१ च्या ज्ञानप्रकाशांत एका गृहस्थानें खालीलप्रमाणें पन्नास

वर्षांत पुण्यांतील रीतरिवाजांत पडलेल्या फरकाचें वर्णन केलें आहे. " धर्मश्रद्धेस पंख फुटून ती उडूं लागली आहे अंगरखे जाऊन अबई, पाटलोणी, कोट निघाले इष्टकऱ्या, बुटें, पायांत चढविल्या-वांचून आतां मनुष्य शोभतच नाहीं. जुनीं पागोटीं जाऊन गोंडेदार लोकरीच्या खलाशी टोप्या घातलेले लोक चहूंकडे दिसतात. पूर्वीं क्वचित् थंडीच्या दिवसांत कोणी डोईस रुमाल बांधीत. आतां कंफ-र्टर बांधू लागले आहेत. बनातीच्या मगजीच्या गोंडे लावलेल्या बंड्या जाऊन शर्टें निघालीं. मखमली किनखापी खोगिरें रद्द होऊन ढुंगणापुरतें कातडें तट्टावर घालून कित्येक लोक बसतात. पूर्वीं उन्हा-ळ्यांत पाण्यांत वाळा घालून गार करून पीत. आत सोडावाटर लेमनेटच्या बुचांचे फटफट आवाज जिकडेतिकडे ऐकूं येतात. पूर्वीं शंकराचार्य एकच होते, आतां घरोघर झाले आहेत ! पूर्वीं देवडीवर पाहऱ्याला माणसें ठेवीत, हल्लीं बांड्या शेंपटीचीं कुत्रींच कोठें कोठें आढळतात ! हल्लीं कलाल श्रीमंत होत चालले आहेत ! धर्मपंथही निराळे स्थापन होत आहेत.' इ. परंतु अशा आणीबाणीच्या वेळीं जी गोष्ट घडून यावयास पाहिजे होती, तीही सुदैवानें घडून आली. ती गोष्ट म्हणजे कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेचा अवतार ही होय. ज्या विविध कार्याकरितां निबंधमालेनें अवतार धारण केला होता, त्या सर्व कार्यांत विचारजागृतीचें व मराठी गद्यवाङ्मयासंबंधानें तिचें कार्य परमश्रेष्ठ आहे.

वडिलाप्रमाणें त्यांनीं प्रत्यक्ष कथावाङ्मयास जरी हात घातला नाहीं, तरी त्यास पोषक अशी पुष्कळ व महत्वाची कामगिरी विष्णु-

शास्त्र्यांच्या हातून झाली आहे. निबंधमालेंत भाषादूषण, भाषापद्धति, भाषांतर, लेखनशुद्धि, वाचन, विद्वत्व आणि कवित्व, ग्रंथावर टीका, वगैरे विषयावर त्यांचें बहुश्रुत व भारदस्त असे स्वतंत्र लेख तर येतच. परंतु याशिवाय 'विनोद व महदाख्यायिका' न वाचें एक सुंदर सदर निबंधमालेंत येत असे. या सदरांत त्यांनीं कित्येक मौजेच्या आख्यायिका व विनोदपूर्ण दंतकथा निवेदल्या आहेत, ज्यांत त्याचें एतद्विषयक कौशल्य उत्कृष्टपणें दिसून येते.

परंतु या सव गोष्टी यानीं केलेल्या विचारजागृतीपुढें कांहींच नव्हत. या आत्मजागृतीचा परिणाम पुढील पिढ्यांवर तर निःसंशय आलाच; परंतु त्यांच्या समकालीनांसही तिनें आपला प्रभाव दाखविल्याशिवाय सोडलें नाहीं. त्यांचा चरित्रकार म्हणतो "ज्याप्रमाणें पवित्र शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ईश्वरानें प्रचंड आकाश उत्पन्न केल्यानंतर सृष्टि-निर्माणाचें चौथे दिवशीं संध्याकाळीं लहान लहान अगण्य ताऱ्यांचे समुदायांत प्रथमच द्वितीयेचे अत्यंत लहान परंतु रमणीय चंद्रकलेला एकाएकीं उत्पन्न केलें, त्या वेळीं तो प्रसंग जसा अति रम्य व आनंद-मय वाटला असेल त्याप्रमाणें आपला देश, आपला धर्म, आपला इति-हास, आपल्या जुन्या विद्या, आपलें कलाकौशल्य वगैरे गोष्टींविषयीं ज्या अनेक भ्रांतिमूलक व अहितकारक अशा कल्पना आपले लोकांत पसरल्या होत्या, त्यांचें निरसन करण्याकरितां निबंधमालेचा नूतन उदय झालेला पाहून तो दिवस मराठीं रसज्ञ वाचकांस अत्यंत रमणीय व आल्हादकारक वाटला असेल, यांत नवल नाहीं ! *

* ल. कृ. चिपळूणकरकृत विष्णुशास्त्री

सन १८७५ ते सन १८८५ पर्यंत निबंधमालेप्रमाणें कथा-वाङ्मयास पोषक अशी जी दुसरी महत्वाची गोष्ट झाली ती अर्वाचीन नाट्यकलेचा उदय ही होय नाट्यवाङ्मय व कथावाङ्मय अन्योन्याश्रयीं नसलें तरी तें एकमेकांस पोषक तरी खास होतें. मराठी वाङ्मयांत दोघांचीं पाऊलें बरोबरच पुढें पडलीं आहेत. कारण या कालांतील कित्येक एकाएका विद्वानास दोहोंची कामगिरी पतकरावी लागली आहे व ही कामगिरी त्यांनीं मासिक पुस्तकें काढून अथवा स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध करून पार पाडावयास सुरवात केली.

उदाहरणार्थ, शंकर मोरो रानडे आणि आनंदराव सखाराम बर्वे हे जसे नाटककारांत तसेंच कादंबरीकारांतही मोडतात. बर्व्यांचा ' हिंमतबहादूर ' जितका उत्तम आहे, तितकीच त्यांची ' ठगाची जबानी ' सुबक आहे. शंकर मोरो रानडे यांनीं जितकी नाट्यवाङ्मयाची तितकीच कथावाङ्मयाची सेवा केली आहे. डाक्टर वैद्य प्रहसनासारख्या फार्सापासून तों उत्तमोत्तम नाटकावर त्यांनी जशी मेहनत घेतली तशी ती ' मथुरा ' ' शीलादित्य ' इत्यादि कादंबऱ्यावरही घेतली. ग. बा मुजुमदार म्हणतात ' मथुरा ' ही कादंबरी ज्या वेळीं प्रसिद्ध होत होती त्यावेळीं ती वाचण्याविषयीं लोकांची उत्सुकता ज्या मानानें अधिक, त्या मानानें नाट्यकथार्णव वेळच्या वेळीं प्रसिद्ध होण्याचें लांबणीवर अधिक पडत असे, त्यामुळें रानडे किती आळशी आहेत, म्हणून लोकांची त्यांच्याबद्दल नाखुषी अधिक वाटत असे इतका त्या कादंबरीनें लोकांस चटका लावून दिला होता × "

---

× ग. बा ' मुजुमदारकृत महाराष्ट्रीय नाटककार ' पृष्ठ १०३

आनंदराव बर्व्यानांही मराठी भाषा फार उत्तम रितीनें सजवितां येत असे. 'ठगाची जबानी' हा ग्रंथ वाचीत असतां तो इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर आहे, या गोष्टीची वारंवार विस्मृति पडते असे त्यांचे चरित्रकार रा. देव हे त्या पुस्तकाविषयीं अगदीं बरोबर म्हणतात.

कृष्णशास्त्री चिपळूणकर, बापूसाहेब छत्रे, हरि कृष्ण दामले वगैरे आद्य मराठी कथालेखकांनी घातलेला अर्वाचीन मराठी कथावाङ्मयाचा पाया मजबूत व पद्धतशीर करण्याचें काम दुसऱ्या पिढींतील ज्या लोकांनीं उत्तम रितीनें बजाविलें, त्यांत अनेक श्रेणींचे लोक आहेत. आणि प्रत्येक श्रेणींत पदवीधर व पदवीधरेतर असे दोन्ही प्रकारचे लोक आहेत. रानडे–बर्वे प्रभृति पदवीधर झाले. परंतु कथावाङ्मयाची या मंडळी इतकीच भरीव कामगिरी करणारे अनेक लेखक या वेळीं मराठी कथावाङ्मय समृद्ध करीत होते. किंबहुना या वेळींही कथा वाङ्मयाची पहिली हांक जर कोणास स्पष्ट ऐकूं गेली असेल तर ती पदवीधरेतरांसच आणि तिला हुंकार दिला असेल तर तो पदवीधरेतरांनींच.

याच हुंकारांतून नाट्यकथार्णवानंतर 'ऐतिहासिक नाटकमाला' (१८८०), 'ऐतिहासिक नाट्यकथावळी' (१८८४), 'कादंबरीकलाप' (१८८४) इत्यादि केवळ कथावाङ्मयाचा परिपोष करणारीं मासिक पुस्तकें जन्मास आलीं आणि त्यांतून अनेक उत्तमोत्तम गोष्टी कादंबऱ्या व नाटकें प्रसिद्ध होऊं लागलीं.

विनायक कोंडदेव ओक, नागेश विनायक बापट, विष्णु जनार्दन पटवर्धन, महादेव व्यंकटेश रहाळकर, गोविंद शंकर बापट, धनुर्धारी, इत्यादिकांच्या कादंबऱ्या पुस्तकरूपानें एकदम पुढें येऊं लागल्या तर रामचंद्र भिकाजी गुंजीकर, याचीं पुस्तकें विविधज्ञानविस्तारांतून, बजाबा रामचंद्र प्रधान व विष्णु मोरेश्वर महाजनी यांची मार्जा ज्ञानसंग्रहांतून, गोविंद बल्लाळ देवल व श्रीनिवास भिकाजी सरदेसाई यांचीं कादंबरीकलापांतून व बळवंतरावजी पाटील यांचीं 'पुण्यग्रामरहस्य,' इत्यादि पुस्तकें ऐतिहासिक नाट्यकथावलींतून प्रसिद्ध होऊं लागली. अनंत वामन बर्वे आणि कृष्णाजी नारायण आठल्ये यांचे प्रयत्नही याच वेळेपासून सुरुवात झालेलें त्यांच्या अनुक्रमें 'रंभा' व 'पुष्पगुच्छ' या मासिकांवरून दिसून येतें.

कसेंही असो; या कालांत आमच्या कथावाङ्मयानें एक पाऊल पुढें टाकलें होतें हे खास. या वेळीं गोविंद शंकर बापट यांची हरि त्रिंबकाची जोडी बालवाचकांत, श्रीनिवास भिकाजी सरदेसाई यांची 'कुवलयपूरचीराणी कुमुद्वती'ही मित्रचंद्र-मंजुघोषेच्या वाचकांत, बर्वेकृत 'ठगाची जबानी' उद्दीपक कथावाङ्मयाच्या वाचकांत आणि बापटकृत 'पानिपतची मोहीम' शिष्टवाचकांत अग्रेसर होती. बापटांची पानिपतची मोहीम; व श्रीमंत बाजीराव बल्लाळ विष्णु जनार्दन पटवर्धन यांचा 'जुना वाडा' व 'हंबिरराव आणि पुतळाबाई, आणि गुंजीकरकृत 'माचनगड' हीं पुस्तकें आपणांत ऐतिहासिक कादंबऱ्यांची आवड उत्पन्न करीत होतीं तर ओकांचा

' शिरस्तेदार ', पाटीलांचें ' पुण्यग्रामरहस्य ' व रहाळकरांची ' नारायणराव आणि गोदावरी ' हीं पुस्तकें वस्तुस्थितिनिदर्शक ऊर्फ सामाजिक कादंबऱ्यांची मशागत करीत होत्या.

या सर्व पुस्तकांची आमच्या या छोटेखानी पुस्तकांत यथोचित माहिती देणें शक्य नाहीं. तथापि तसें कहींच न केल्यास कथावाङ्मयानें आपलें पाऊल पुढें कसें टाकलें होतें, हें आम्हांस दाखवितां येणार नाहीं.

ऐतिहासिक कादंबऱ्याविषयीं पहिल्यानें गुंजीकरांची ' मोचनगड ' ही कादंबरी घेऊं या. हिच्यांतील पुढील एका छोट्या अवतरणांतच या कादंबरीचा आपणास परिचय होऊन, तिच्या कर्त्याच्या यथोचित भाषासरणीच व वर्णनशैलीचा प्रभाव दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून रहात नाहीं. श्रीछत्रपतींनीं ' मोचनगड ' सर केला, त्या वेळचें गुंजीकरांनीं केलेलें वर्णन खरोखरच मनोवेधक आहे. ते लिहितातः-—

" इकडे ही गडबड चालली आहे, तों दुसरीं शेंदोनशें मनुष्यें दोरीच्या शिडीवरून गडावर चढलीं आणि त्याच संधीस आधीं आलेल्या लोकांनीं दरवाजा उघडून टाकला. झालें. मग या लोकांत कांहीं पाणी राहिलें नाहीं. सर्वजण निराश होऊन जेथच्या तेथें पडून राहिले. पहाटेची सुमारें दोन घटका रात्र राहिली आहे, अशा वेळेस किल्ल्यांतील सर्व चौक्या, पहारे शत्रूला स्वाधीन झाले. ठाणेदार, रांगडे आणि दुसरे जिवंत राहिलेले

अधिकारी हस्तगत झाले. त्या वेळीं किल्ल्यावर मराठ्यांचा राजा शिवाजी महाराज यांचा विजयध्वज फरारलेला दिसूं लागला. हजिरीचा कर्णा झाला, आणि जयसूचक पांच तोफा उडाल्या. असें होतांच जिकडून तिकडून लोक जमूं लागले. इतका वेळपर्यंत शत्रु कोण हें किल्लेदारास स्पष्ट समजलें नव्हतें. सूर्योदयाचे सुमाराला, शिवाजी महाराजांची स्वारी खालून वर चढूं लागली. पुढें करणा, शिंग वगैरे वाद्यें वाजताहेत; त्यां मागें मांडचोळणा घालून, काचा भिडविलेला आणि पागोटें आणि अर्धा अंगरखा घातलेले, ढाल, तरवार, बंदूक आणि क्वचित् तिरकामटा घेतलेले. असे तीन चारशें मावळे आणि हेटकरी लोक चालले आहेत; त्यांमागून, चोळणा घालून, कंबरबंद बांधून, रूदार अंगरखा घातलेले व पागो ट्याचे वेढे डोकीवरून हनुवटीखालून घेऊन कानावरून मोठ्या बंदोबस्तानें गुंडाळलेले आणि ढाल, तरवार, बंदुक आणि भाला घेतलेले, शेंदीडशें मोठमोठ्या मिशांचे शिलेदार व बारगीर, छानदार दक्षिणी घोड्यावरून चालले आहेत, त्यांचे बरोबर त्यांचे सुभेदार, जुमलेदार चालले आहेत. त्यामागें नेताजी पालकर आणि कांहीं पठाणासहित राघो बल्लाळ, त्यामागें शिवाजी महाराज सुंदर सफेत घोड्यावर बसले आहेत; चेहरा सुरेख, मध्यम गौरवर्ण, अंग सडपातळ, बांधा मध्यम उंच, नाक सरळ, मिशा मध्यम मोठ्या आणि लहानशी दाढी, कपाळ विशाल, नेत्र तीव्र सतेज, मुद्रा प्रफुल्लित असून गंभीर, मस्तकावर लहानच पण मौल्यवान् मंदील बांधला

आहे, व त्यावर पाठीमागें मोत्यांचा तुरा लटकत आहे, पायामध्यें रेशमी त्रिजार, मराठी तऱ्हेचे छानदार जोडे. गोंडेदार रेशमी कंबरबंद; अंगांत रूदार बंडी, वर चिलखत आणि त्यावर दुसरी बंडी, आणि त्या सर्वांवर उंची मलमलीचा कशीदेदार पायघोळ अंगरखा; कंबरेला लाल शेला, त्यामध्यें एक कट्यार, पाठीवर सुंदर ढाल, डाव्या हातांत घोड्याची लगाम, उजव्या हातांत भवानी तलवार, महाराजांच्या डाव्या बाजूला आपल्या घोड्यावर मोरोपंत पिंगळे, त्यामागें पुन्हा दुसरे स्वार, त्यामागें बुणगे लोक याप्रमाणें स्वारी मोठ्या थाटानें खाडखाड, खाडखाड चालली असतां वाद्य सुरू झाले आणि वाद्य बंद होतांच घोड्यांच्या खिंकाळण्यानें आकाश क्षणभर गजबजून गेलें. स्वारी आल्याबरोबर बंदोबस्ताकरितां नेमलेले शिवाय करून बाकीचें सर्व सैन्य बाजीराव फसलकर सामोरे घेऊन आला आणि जयजयकार होऊन सलामीची तोफ झाली. नंतर स्वारी बंदोबस्त पाहत पाहत वाड्यामध्यें गेली. तेथें मोठी बिछायत मांडून, महाराजांना वर नेऊन बसविलें आणि पुन्हां जयजयकार केला; महाराजांनीं सर्व बंदोबस्ताची पुन्हां हकीकत विचारली, आणि यापुढें एकंदर व्यवस्था मराठे सरकारच्या हुकमानें होत जावी म्हणून परगण्यानिहाय लागलींच ताकीदपत्रें होऊन जिकडे तिकडे रवाना झाली. त्यामध्यें लिहिलें कीं ' परमेश्वराचे कृपेनें यवनां या ताब्यांतून हा मुलूख मराठे सरकारच्या स्वाधीन झाला. या उपर जिकडे तिकडे उत्तम व्यवस्था राहून प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष दिलें जाईल, धर्मांचें

रक्षण होईल, कोणच्याही प्रकारें प्रजेवर जुलूम होणार नाहीं. याकरितां हें आज्ञापत्र मान्य करून, पुरातन काळापासून चालत आले असतील ते सरकारचे हक्क वेळच्यावेळीं पोंचते करावे. ' इत्यादि.

आतां आपण सामाजिक कादंबऱ्यांकडे वळूं या. आपल्या वस्तुस्थितिनिदर्शक कादंबऱ्यांचा उगम अशा प्रकारच्या लहान लहान गोष्टींपासूनच झाला आहे. तथापि अर्वाचीनकालीन सभ्य समाजास रुचेलशी स्वतंत्र व स्वाभाविक गोष्ट पहिल्यानें विनायक कोंडदेव ओक यांनीं लिहिली. ' शिरस्तेदार ' हें या गोष्टीचें नांव असून लाच खाल्ल्यानें होणाऱ्या दुष्परिणामाचें सुंदर शब्दचित्र एका शिरस्तेदाराच्या तोंडून परिणामकारक रीतीनें वठविलें आहे. ओकांचा ' शिरस्तेदार ' आपल्या दिनचर्येचें पुढीलप्रमाणें मौजेचें वर्णन करतो. तो म्हणतो.

' ह्या वेळीं मी जरी शिरस्तेदार नव्हतों, तरीं मला कांहीं कमी नव्हतें. प्रातःकाळीं आठ वाजतां उठावें; नऊ वाजत तोंपर्यंत शौचमुखमार्जन आटोपून, त्या दिवसाचीं जीं गिऱ्हाइकें हातांत गठड्या घेऊन तयार असतील, त्यांच्या गांठी घ्याव्या; त्यांच्याशीं कानगोष्टी करून वसूलबाकी करून टाकावी; दहा वाजतां स्नान करावें; आणि अकरा वाजतां कचेरीस जाऊन कामास लागावें. तेथें खऱ्याखोट्या गोष्टी सुनावून, आपणास ज्या कलावर खटला न्यायव्याचा असेल, त्या कलाचा भरपूर पुरावा साहेबास दाखवून आपलें कार्य साधावें; खिसे भरून घरीं यावें; इतक्यांत साडेचार वाजत; तेव्हां

कसल्या तरी उंची लाडवांचा फराळ करावा; नंतर पुन्हां गरजू लोकांस दर्शनें द्यावीं; त्यांनीं आणलेले भेटीचे पदार्थ घ्यावे; उद्यां काय काय पापें कशा कशीं करावयाचीं तीं ठरवून ठेवावीं; इष्टमित्रांच्या भेटीस जावें; तिकडून येऊन जेवावें, तों रात्रीचे अकरा वाजत. त्यानंतर छामछूम ! त्यापुढें धामधूम !! आणि त्या उपरांत निद्रा !!! म्हणजे इतक्या कृत्यास बारावर दोन वाजत. हा आमचा नित्यक्रम. अशीं सुमारें दोन वर्षे लोटल्यावर, आमच्या शिरस्तेदार साहेबस साहेबांच्या शिफारशीवरून दुसऱ्या जिल्ह्यांत चिटणिशीची जागा मिळाली. ते तिकडे गेले. तेव्हां यांचे जागेवर माझी नेमणूक झाली. अशा प्रकारें मी एकदां शिरस्तेदारी पावलों. तेव्हा मी कृतकृत्य झालों असें मला वाटलें.

शिरस्तेदारी कशी गाजवावी आणि साहेबांची मेहरबानी कशी संपादावी, ही विद्या मी आपल्या शिरस्तेदार गुरूजीपाशीं उत्तम रीतीनें पढलों होतों. तेणेंकरून तें काम चालविण्यास व स्वहित साधून घेण्यास मला तिळभर देखील अडचण पडली नाहीं. हें काम मिळण्यापूर्वीं मला नांवापुढें नुसतें ‘ राव ’ जोडून हाक मारीत असत. परंतु शिरस्तेदार झाल्याबरोबर मी ‘ रावसाहेब ’ बनलों. मला पूर्वीं म्हणजे कारकून असतां, पांचचार कोस पायीं जाण्यास कांहीं वाटत नसे; पण ही दिवाणगिरी मिळतांच दोन पावलें कचेरीस जाण्यासुद्धां मला घोड्यांची गाडी लागूं लागली. पूर्वीं भातभाकर वरण चाले; पण मग तूपसाखरेशिवाय घास जाईना. साधीं धोतरें नेसाव-

यास आवडेनात, म्हणून नागपुरी रेशमी धोतरजोडे फाडूं लागलों कोणी नमस्कार केला तर हात उचलेना. शद्व तोळामासा विकूं लागला. असा मी एक वेगळा चमत्कारिक प्राणी बनून राहिलों. खरोखर, पैशाच्या योगानें मनुष्याच्या स्वभावांत हा एवढा जो फरक होतो, तो अत्यंत उपहासास्पद होय परंतु तो बहुतकरून कोणा-लाही चुकविता येत नाहीं. जसे दीप आणि प्रकाश हे एकमेकापासून कधीं वेगळे व्हावयाचे नाहींत. तसा धन आणि मदांधपणा ह्यांचा कांहीं अंशीं संबंध आहे, असें एका चतुर कवीनें म्हटलें आहे. अफूवें सेवन केल्याबर तिचा अंमल न येऊं देणें, हें मनुष्यास दुष्कर नव्हे काय ? " इ

आतां गोष्ट न म्हणतां जिला सामाजिक कादंबरी म्हणतां येईल अशा एखाद्या पुस्तकाकडे आपण वळूं या. रहाळकरांची 'नारायणराव आणि गोदावरी ' आणि पाटिलांचें ' पुण्यग्रामरहस्य ' हीं दोन्हीं पुस्तकें सामाजिक कादंबऱ्यांच्या कसोटीला उतरण्या-सारखीं आहेत. रहाळकरांचें पुस्तक सर्वसाधारण स्वरूपाचें आहे तर पाटलांचें पुस्तक केवळ तत्कालीन ' पुण्यग्रामरहस्य ' आहे कर्त्यानें या पुस्तकास ऐतिहासिक कादंबरी म्हटलें आहे परंतु ऐतिहासिक कादंबऱ्यांत टाकण्यासारखें त्यांत कांहीं नाही. जें आहे तें केवळ तत्कालीन वस्तुस्थितिनिदर्शक आहे. आणि पुण्यग्रामाचें रहस्यच तें ! तें अगदीं रुक्ष कसें असेल ? दहा प्रकरणच्या या पुस्तकांतील प्रत्येक प्रकरण रहस्यमय व मनोरंजक आहे. यांतील थोडासा मासला पुढें दिला आहे. त्यावरून इतर रहस्यांचा उलगडा होईल

' बुधवार पेठेंतील एका लहानशा देवालयांत एक गृहस्थ बसला होता हें देवालय एका घरांत एके बाजूस असल्यारणानें तेथें दर्शनाकरितां गर्दी होण्याचा संभव मुळींच नव्हता त्या गृहस्थापुढें एक खल होता; जवळ कांहीं पुड्या होत्या, त्यांतून हा एके हातानें थोडें थोडें चूर्ण टाकी व दुसऱ्या हातांत एक वत्ता घेऊन तें सर्व कुटीत बसला होता; त्याचे एके बाजूस पांच चार जुन्या व फाटक्या तुटक्या पोथ्या पडल्या होत्या भिंतीवर दहा वीस लग्नकुंडल्या व पांच सात वेडेवांकडे संस्कृत श्लोक लिहिलेले कागद चौफेर खालीं वर डकविले होते.

वरील गृहस्थ औषधें कुटीत ब-ले आहेत; इतक्यांत त्यांचा एक शिष्य आला व अ त डोकावून म्हणतो.

" शास्त्रीबुवा, येऊं का ! "

शास्त्री—कोण रामा ?

रामा—होय, मी.

शास्त्री—तूं आलास का—( भरभर आटपूं लागतात ) तूं—बरें—ये—दम धर ( एके बाजूस उचलून ठेवतात ) येईनास कां—नाहीं तर मीच येतो—बाहेर सभामंडपांत बैस.

रामा सभामंडपांत आसनमांडी घालून बसला व आपला पाठ काढून घोकीत बसला. रामे, रामयो, रामेषु, सप्तमी रामे.

शास्त्री—रामयो, हो !

रामा–रामयो हो, रामेषु–

शास्त्री–असं; आतां कसें आले ? असें ठांसून म्हणावें, आतां पुरें कर. रुपावळी आपल्या घरीं पाठ करावी. आतां श्लोक म्हण.

रामा–( आपल्या दप्तरांतून पोथी काढतो व म्हणतो )

स्थित:स्थितामुच्चलित:प्रयातां । निषेदुषी मानसबंधधीरः ॥

शास्त्री–पुरे झालें; आर्धा श्लोक आज घे; उद्या आर्धा सांगूं.

रामा–पदें पाडूं का ?

शास्त्री–हा मूर्खा ! इतक्या लवकर पदें पाडून तुला कुठें पळून तर जावयाचें नाहीं ना ? हेंच तर वाईट. अरे हें बघ, आज मी तुला ह्या श्लोकाचा अर्थ समजावून देतों. म्हणजे मग उद्यां तुला आपोआपच पदें पाडतां येतील. तूं गुराख्याच्या गायी पाहिल्या आहेस कीं नाहीं ?

रामा–हो, पुष्कळ.

शास्त्री–त्यांत कांहीं चांगल्या असतात, कांहीं वाईट असतात व कांहीं ओढाळ असतात. ह्या श्लोकांत ओढाळ गायीचें वर्णन आहे.

रामा–ओढाळ गायीचा आणि दिलीपाचा काय संबंध शास्त्री-बुवा ?

शास्त्री–हा वेड्या ! दिलीप कोण समजतोस तूं ?

रामा–दिलीप कोण होता ?

शास्त्री–कोण म्हणजे ? गुराखी !

रामा—काय तो राजा नव्हता काय?

शास्त्री—अरे राजा मग झाला. आपल्या इकडे नाहीं का गुराख्याला धरून नेऊन राजा करीत? तसाच दिलीपास धरून नेऊन राजा केला होता. आतां समजलास?

रामा—असें काय? तरीच म्हटलें राजाला गाय काय करावयाची होती.

शास्त्री—आतां ऐक अर्थ. ह्या दिलीपानें एक गाय विकत घेतली. आणि ती घेऊन तो घरीं यावयाला निघाला. गाय होती ओढाळ; तेव्हां ती स्थित:स्थिताम् म्हणजे ठिकठिकाणीं थबके; ती थबकून उभी राहिली म्हणजे दिलीपे तिला उचलि, म्हणजे उचली! पण मग तः म्हणजे ती, प्रयातां म्हणजे धूम ठोकी, पळावयास लागे! फिरून दिलीपानें तिला धरून आणलें कीं ती निषेदुषी—म्हणजे तेथेंच बसे; ह्यानें धीर धरून कितीही "तिच्या आसनावरून म्हणजे ती जेथें बसली तेथून तिला उठविण्याचा प्रयत्न केला तथापि तिनें जागे वरून हालूंच नये! आहे की नाहीं मौज?"

शास्त्रीबुवांच्या या नमुनेदार अध्यापनपद्धतीबरहुकूम रामाचें पाऊल वेदाध्ययनांत कितपत पुढें पडलें असेल हें समजण्यास जरी आमच्याजवळ आज साधन नाहीं तरी आमच्या गोष्टीची कादंबरी होऊन याच काळांत तिनें आपलें एक पाऊल पुढें टाकलें होतें हें खास.

# प्रकरण ६ वें.

## मनोज्ञ मन्वंतराचा पाया

सन १८७५ पूर्वीच्या महाराष्ट्राकडे पाहून, नंतर याच महा राष्ट्राकडे आपण सन १८८५ नंतर पाहिलें तर आपणास त्याच्यांत महत्वाचें अंतर दिसून येतें. महाराष्ट्र सर्वतोपरी खडबडून जागा झालेला आपणास सन १८८५ नंतरच दिसतो. पूर्वीची ती अंध श्रद्धा, तें गतानुगतिकत्व तो दुरभिमान लयास जाऊन त्याच्या जागीं आत्मविश्वास, जीवितकर्तव्य, स्वार्थत्याग, इत्यादि कल्याणप्रद गुणांचा विकास महाराष्ट्रांत झालेला आपणास सन १८८५ नंतरच उत्तम रीतीनें दिसून येतो या वेळीं महाराष्ट्रांत एकच गोष्ट प्राधान्येंकरून दिसून येते आणि ती गोष्ट म्हणजे देशस्थितीविषयीं व लोकस्थिती-विषयींचा विचार ही होय. या विचारांत कित्येक तो शिकविणारे होते तर कित्येक तो अंमलांत आणणारे होते ते कसे जरी असले तरी त्यांच्या प्रयत्नांचा परिणाम महाराष्ट्रावर मंगलकारक झाला हें खास

महाराष्ट्रीयांच्या जागृतीच्या या सुप्रभातकालीं म्हणजे विष्णु-शास्त्र्यांच्या समयीं, महाराष्ट्राच्या नशीबाचे योग असेच कांहीं बलवत्तर आले होते. " ज्या वातावरणांत वाढल्यानें शास्त्रीबोवांच्या मनांत स्वातंत्र्याची स्फूर्ति झाली, त्याच वातावरणांत त्यांच्या खालो-खालच्या पिढींतील तरुण मुलें वाढत होतीं; मग त्यांच्याही अंगीं

स्वातंत्र्याची स्फूर्ति झाली असल्यास नवल काय ? व खरोखरच या सुमारास डेक्कन कॉलेजांत वास्तव्य करून राहणाऱ्या कांहीं विद्यार्थ्यांच्या मनांत हीच स्फूर्ति उत्पन्न झाली होती असें प्रत्ययासही आलें. कारण या सुमारास टिळक, आगरकर, वगैरे विद्यार्थिदशेंत असत.च. जगांत आपण पुढें काय करावें याविषयीं मोठ्या उत्सुकतेनें व गंभीरपणें विचार करीत होते. +

आपल्या तुरुंगवासवर्णनाच्या पुस्तकांत आगरकर लिहतात- ' मी एम् ए करितां व टिळक एल. एल. बी. करितां अभ्यास करण्यासाठीं कॉलेजांत राहिलों असतां सरकारी नोकरी न पत्करितां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला, त्या दिवसापासून आम्हीं जें जें बोललों चाललों याची तरुगांत पुनः पुनः आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे. अस्तु.

अनुकुल काल येतांच केसरीनें आपल्या गंभीर गर्जनेस सुरुवात केली व तिचा ध्वनि महाराष्ट्राच्या कोन्याकोपऱ्यापर्यंत जाऊन आदळूं लागला. थोडक्याच कालांत महाराष्ट्राच्या दशदिशा तिनें घुमघुमून सोडल्या आणि या एका ध्वनीचा प्रतिध्वनि महाराष्ट्रांतर्गत सर्व प्रदेशांत उमटूं लागल्यासारखें दिसूं लागलें.

केसरीची ही गर्जना एकच होती पण मौज ही कीं, या एका गर्जनेंत तीन निरनिराळ्या ध्वनींचा सुंदर मिलाफ झाला होता.

---

+ केळकरकृत लो. टिळक यांचें चरित्र पृ. १००

तसेंच या एका गर्जनेतील प्रत्येक ध्वनि पृथकपणें स्पष्ट ऐकावयास येत असतांही आपल्या संकीर्ण घोषणास तो बाधक झालेला दिसत नाहीं. चिपळूणकर—आगरकर—टिळक या त्रिमूर्तिनिर्मित केसरीची ही गर्जना निरनिराळ्या मनोवृत्तींच्या माणसावर निरनिराळ्या रतीनें परिणाम करूं लागली. कोणास तिच्यातून विष्णुशास्त्र्यांचा, कोणास आगरकरांचा, तर कोणास टिळकांचा ध्वनि विशेष स्पष्टपणें ऐकावयास येऊं लागला. विष्णुशास्त्र्यांचा ध्वनि कित्येकांस आपल्या प्राचीन गौरवाचें स्मरण करून देत होता, आगरकरांचा ध्वनि कित्येकांपुढें आपल्या समाजस्थितीचें भेसूर चित्र आखीत होता व टिळकांचा ध्वनि देशस्थितीच्या विपन्नावस्थेचें स्वरूप कित्येकांच्या नजरेस विशेष ठळकपणें आणीत होता

ज्या कित्येक कर्तृत्ववान् विशेष माणसांवर या परिस्थितीचे व या आघाताचे परिणाम झाले त्यांत अनेक-प्रकारचे लोक आहेत. कोणी धर्मसुधारक आहेत, कोणी समाजसुधारक आहेत. कोणी शिक्षणसुधारक आहेत तर कोणी देशस्थिति सुधारक आहेत. ज्यास जो मार्ग इष्ट वाटला तो त्या मार्गानें ह्या सुधारणांचा लाभ करून देण्याचा प्रयत्न करूं लागला.

देशहिताच्या प्रत्येक बाबतीस या वेळीं वरीलप्रमाणें निराळें वळण लागत चाललें असतां आमच्या कथावाङ्मयाची मजल यावेळीं कोठपर्यंत आली होती हें आपण पाहिलेंच पाहिजे आणि खरेंच पाहूं गेल्यास यांचें पाऊल पुण्यांत या वेळीं फार मंदगतीनें पडत

असताना दिसतें. शंकर मोरो रानडे वडोद्यास व बळवंत रावजी पाटील हे हैद्राबादेस निघून गेले होते. वासुदेव बाळकृष्ण केळकर, देवल, अनंत वामन बर्वे, खरेशास्त्री, धनुर्धारी, किरात वगैरे नामांकित व कुशल लेखक विशेषेंकरून नाट्यवाङ्मयाचीं सेवा करूं लागले होते आणि 'केसरी' व 'सुधारक' लोकांच्या अज्ञानावर फटक्यांवर फटके उडवीत होते. त्रि. कों. ओक, ना. वि. बापट, आ. स. बर्वे, इत्यादि मंडळी मागें पडली होती व सामान्य ग्रंथकारांचें अप्रतिष्ठित कथावाङ्मय लोकांस आवडेनासें झालें होतें. एवंच कथावाङ्मयाच्या पुनरुज्जीवनाची वेळ पुन्हा एकदां येऊन ठेपली होती. नाहीं म्हणावयास महात्मेकृत 'वेषधारीपंजाबी' (१८८६) लिमयेकृत 'वेणू' (१८८६), पंडितकृत 'सुशील यमुना' (१८८७), रेव्ह. टिळककृत 'तान विधवा' (१८८८, कुळकर्णीकृत 'पाडव्याला भेट' (१८८८), सोमणकृत 'मंजुळा' १८८५) इत्यादि पांच सात वस्तुस्थितिनिदर्शक चांगल्या कादंबऱ्या या दोन तीन वर्षांत पुढें आल्या होत्या व शंकर बापूजी मुजुमदार यांचें 'कादंबरी कलाप' (१८८७), 'नाट्यकथार्णव' व 'ऐतिहासिक नाट्यकथावली' या मासिकांची जागा कांहीं अंशानें भरून काढण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु मागणीप्रमाणें पाहूं गेल्यास कथावाङ्मयाचा हा पुरवठा फारच तुटपुंजा होता. एवढ्यानें महाराष्ट्राच्या वाढत्या आकांक्षा पूर्ण होण्यासारख्या नव्हत्या तसेंच कथावाङ्मयाची लागलेली गोडीही विसरून जाणें त्यास शक्य नव्हतें.

बुद्धिवान् व मर्मज्ञ कादंबरीकारास पुढें सरसावण्यास ही संधि फार नामी होती व ही उणीव भरून काढण्यास कोण पुढें येतो, या गोष्टीची अखिल महाराष्ट्र जणूं उत्कंठापूर्वक वाट पहात होतें. अशाच प्रतिभावान् कादंबरीकारास जन्म देण्याचा महाराष्ट्राचा नवस कोण फेडतो, याचा सर्वांसच अचंबा वाटून राहिला होता कारण समाजाच्या गरजा सूक्ष्म रीतीनें अवलोकून व तसेंच महाराष्ट्राची परंपरा ध्यानांत ठेवून घाव मर्मी पडावयास पाहिजे होता. परंतु कथावाङ्मयाचें नशीब खरोखरीच बलवत्तर कीं. कै. हरि नारायय आपटे यांच्या हातें त्याचा पुनरुद्धार होऊन त्यास या कुचंबळणींतून मुक्त होण्याचा योग लवकरच यावयाचा होता. व तुटूं पाहणारा हा दुवा अकल्पित रीतीनें जोडला जावयाचा होता

सुमारें पंधरा वर्षांपूर्वी कै ज. वि. ओक यांच्या 'लोकशिक्षण' मासिकांत सुप्रसिद्ध इतिहास संशोधक रा. रा. वि. का. राजवाडे यांनीं महाराष्ट्रांतील बुद्धिमान्, प्रतिभावान् व कर्ते लोकांची मोजदाद केली त्यावेळीं त्यांना ' बुद्धिमान् कादंबरीकार ' ही पदवी एकट्या हरिभाऊंसच बहाल करतां आली. हरिभाऊ आपटे यांचें चरित्र व त्यांच्या आठवणी अनुक्रमें आंबेकर व देशपांडे या दोघां विद्वानांनीं लिहून मराठी वाङ्मयाची बहुमोल कामगिरी केली आहे. त्यांच्या-विषयींचें वाङ्मय अझूनही बाहेर पडत आहे व अझूनही त्यांचें एखादद्दुसरें लहानमोठें चरित्र प्रसिद्ध होण्याचा संभव आहे अशा स्थितींत हरिभाऊविषयींची विशेष माहिती मिळवूं इच्छिणारांस

वरील उत्कृष्ट पुस्तकाच्या वाचनाची शिफारस करून, आमच्यापुरती यांच्याविषयीं पुढीलप्रमाणें माहिती देतों. ही माहिती रा. अ. बेकरांच्या चरित्रावरूनच; पण संक्षेपानें दिली आहे हें सांगणें अवश्य आहे

## हरि नारायण आपटे—

"या बुद्धिमान् कादंबरीकाराचा जन्म वऱ्हाडांत त्यांच्या आजोळीं ता. ८ मार्च सन १८६४ रोजीं झाला. हरिभाऊंचे वडील नारायण चिमणाजी हे तरुणपणींच नोकरींत शिरून लवकरच चांगल्या हुद्याच्या जागीं चढले. हरिभाऊंचे चुलते महादेव चिमणाजी आपटे यांचें नांव नामांकित वकील म्हणून सुप्रसिद्धच आहे. हरिभाऊंना चवथें वर्ष लागतें न लागतें तोंच त्यांच्या मातुश्री इहलोक सोडून गेल्यामुळें त्यांचा सांभाळ करण्याचा बोजा त्यांच्या चुलताचुलतीनें घेतल्यास नवल काय? परंतु पुढें हरिभाऊंच्या काकी सौ. पार्वतीबाई या हरिभाऊंवर अपत्यनिर्विशेष प्रेम करीत हें न पाहवल्यामुळेंच कीं काय, दुष्ट काळानें या बाईला इहलोकांतून ओढून नेलें. महादेव चिमणाजींचें कुटुंब निवर्तल्यानंतर त्यांनीं आपल्या वडील भावाप्रमाणें यथाक्रम नवीन संसार थाटावयाच्या तजविजीस लागावयाचें; पण पुनर्विवाहपंथाचे ते एक प्रमुख पुरस्कर्ते असल्यामुळें तसें करणें त्यांना उचित वाटलें नाहीं. आण्णासाहेबांनीं दुसरें लग्न केलें नाहीं इतकेंच; पण त्यांना आपला आयुष्यक्रम शुचिर्भूत रीतीनें चालवितां आला नाहीं. 'मधली स्थिति' या कादंबरींत ज्या दोन दुष्परिणामी दुर्व्यसनांचें वर्णन

हरिभाऊंनीं दिलें आहे, त्यांचा घाला आण्णासाहेबावर याच वेळीं पडला आणि थोडक्याच दिवसांत त्यांचें घर कुटुंबवत्सलास राहण्याला सर्वस्वी नालायक बनलें. अर्थात् आपला सर्व परिवार मुंबईहून हालवून पुण्यास बिऱ्हाड थाटावें असा विचार हरिभाऊंच्या वडिलांना ठरवावा लागला.

हरिभाऊ पुण्यास आले तेव्हां त्यांचें वय १४ वर्षांचें होतें पुण्यास आल्यावर ते हायस्कूलमध्यें इंग्रजी ४ थ्या इयत्तेंत शिकूं लागले. याच वेळेला हरिभाऊंची लेखनप्रवृत्ति हळूहळू वाढत जाऊन ती किरकोळ कवनें व लेख या स्वरूपांत प्रगट होऊं लागली. घरांतील किरकोळ प्रसंगावर कविता कराव्या, भांडणाची वगैरे हकीकत लिहावी, इंग्रजी कवितेंतील बारिक चुटक्यांचें कविताबद्ध भाषांतर करावें, हा त्यांचा क्रम वृद्धिंगतच होत चालला होता. पुढें जी आपल्या कादंबऱ्यांत त्यांनीं अनेक प्रकारच्या स्वभावाचीं, मनोव्यापाराचीं मनोज्ञ चित्रें रेखाटलीं आहेत, त्यापैकीं कांहीं निवडक नमुने ते या वेळीं आपल्या मित्रमंडळीस साविर्भाव करून दाखवीत.

हरिभाऊ पुण्यास आल्यावर सुमारें दोन वर्षांनीं 'न्यू इंग्लिश स्कूल' स्थापन झालें. या शाळेंतील अगदीं आरंभीच्या विद्यार्थ्यांपैकीं ते एक होते. हरिभाऊ व त्यांचे मित्र हायस्कूल सोडून न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गेले ते त्या सर्वांना विष्णुशास्त्र्यांबद्दल अत्यंत आदर वाटत होता म्हणूनच गेले, हें उघड आहे. न्यू इंग्लिश स्कूल निघण्यापूर्वी शास्त्रीबुवा हायस्कूलमध्यें शिक्षक होते, त्यामुळें त्यांच्याशीं या विद्यार्थ्यांचा

आधींच परिचय जडलेला होता. शिवाय त्यावेळीं शास्त्रीबुवांच्या निबंधमालेनें सर्व समाजांत खळबळ उडवून सोडली होती. मराठी लेखनकलेंत एक प्रकारची जाज्वल्यता व तेजस्विता आणण्याचें काम प्रथम शास्त्रीबुवांनींच केलें होतें. अशा गृहस्थाचा हरिभाऊसारख्या बुद्धिमान् व प्रतिभासंपन्न तरुणावर विशेष परिणाम व्हावा व आपल्यापुढें विष्णुशास्त्र्यांचा आदर्श ठेवण्याची त्यांच्या ठिकाणीं इच्छा व्हावी हें स्वाभाविक होतें. विचारास थोडी प्रगल्भता आल्यावर हरिभाऊ रा. सा. रानडे यांचे कट्टे अनुयायी बनले पण आरंभीं त्यांच्या मनावर जर कोणाची विशेष छाप बसली असेल तर ती विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचीच होय.

हरिभाऊंची प्रवेशपरीक्षा सन १८८३ सालीं पास झाली व त्यांच्या आयुष्यांतील परीक्षा पास झाल्याचा हा एवढाच प्रसंग होय. हरिभाऊंनीं एल. एल. बी. व्हावें, निदान वकीलीची परीक्षा तरी द्यावी अशी त्यांच्या चुलत्याची व इतर आप्तेष्टांची फार इच्छा होती. पण जें कधींच घडावयाचें नव्हतें तें कसें घडून येणार ? अण्णासाहेबांच्या इच्छेप्रमाणें हरिभाऊंना वकील होतां आलें नाहीं; पण पुढें त्यांनीं जी समाजाची वकीली करून त्यांत स्थित्यंतर घडवून आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला, तो पाहतां ते केवळ पैशाकरितां भाडोत्री वकील झाले नाहींत, हें सुदैवच समजलें पाहिजे.

हरिभाऊंच्या हातून जे सर्व प्रयत्न विशी एकविशींत झाले त्यांत सर्वांत श्रेष्ठ व त्यांच्या अकालपरिपक्वतेची स्पष्ट जाणीव करून देणारा

हरिभाऊंनीं दिलें आहे, त्यांचा घाला आण्णासाहेबावर याच वेळीं पडला आणि थोडक्याच दिवसांत त्यांचें घर कुटुंबवत्सलांस राहण्याला सर्वस्वी नालायक बनलें. अर्थात् आपला सर्व परिवार मुंबईहून हालवून पुण्यास बिऱ्हाड थाटावें असा विचार हरिभाऊंच्या वडिलांना ठरवावा लागला.

हरिभाऊ पुण्यास आले तेव्हा त्यांचें वय १४ वर्षांचें होतें. पुण्यास आल्यावर ते हायस्कूलमध्यें इंग्रजी ४ थ्या इयत्तेंत शिकूं लागले. याच वेळेला हरिभाऊंची लेखनप्रवृत्ति हळूहळू वाढत जाऊन ती किरकोळ कवनें व लेख या स्वरूपांत प्रगट होऊं लागली. घरांतील किरकोळ प्रसंगावर कविता कराव्या, भांडणाची वगैरे हकीकत लिहावी, इंग्रजी कवितेंतील बारिक चुटक्यांचें कविताबद्ध भाषांतर करावें, हा त्यांचा क्रम वृद्धिंगतच होत चालला होता. पुढें जी आपल्या कादंबऱ्यांत त्यांनीं अनेक प्रकारच्या स्वभावाचीं, मनोव्यापाराचीं मनोज्ञ चित्रें रेखाटलीं आहेत, त्यापैकीं काहीं निवडक नमुने ते या वेळीं आपल्या मित्रमंडळीस साविर्भाव करून दाखवीत.

हरिभाऊ पुण्यास आल्यावर सुमारें दोन वर्षांनीं 'न्यू इंग्लिश स्कूल' स्थापन झालें. या शाळेंतील अगदीं आरंभीच्या विद्यार्थ्यांपैकीं ते एक होते. हरिभाऊ व त्यांचे मित्र हायस्कूल सोडून न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गेले, ते त्या सर्वांना विष्णुशास्त्र्यांबद्दल अत्यंत आदर वाटत होता म्हणूनच गेले, हें उघड आहे. न्यू इंग्लिश स्कूल निघण्यापूर्वीं शास्त्रीबुवा हायस्कूलमध्यें शिक्षक होते. त्यामुळें त्यांच्याशीं या विद्यार्थ्यांचा

आधींच परिचय जडलेला होता. शिवाय त्यावेळीं शास्त्रीबुवांच्या निबंधमालेनें सर्व समाजांत खळबळ उडवून सोडली होती. मराठी लेखनकलेंत एक प्रकारची जाज्वल्यता व तेजस्विता आणण्याचें काम प्रथम शास्त्रीबुवांनींच केलें होतें. अशा गृहस्थाचा हरिभाऊसारख्या बुद्धिमान् व प्रतिभासंपन्न तरुणावर विशेष परिणाम व्हावा व आपल्यापुढें विष्णुशास्त्र्यांचा आदर्श ठेवण्याची त्यांच्या ठिकाणीं इच्छा व्हावी हें स्वाभाविक होतें. विचारास थोडी प्रगल्भता आल्यावर हरिभाऊ रा. सा. रानडे यांचे कट्टे अनुयायी बनले पण आरंभीं त्यांच्या मनावर जर कोणाची विशेष छाप बसली असेल तर ती विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचीच होय.

हरिभाऊंची प्रवेशपरीक्षा सन १८८३ सालीं पास झाली व त्यांच्या आयुष्यांतील परीक्षा पास झाल्याचा हा एवढाच प्रसंग होय. हरिभाऊंनीं एल. एल. बी. व्हावें, निदान वकीलीची परीक्षा तरी द्यावी अशी त्यांच्या चुलत्याची व इतर आप्तेष्टांची फार इच्छा होती. पण जें कधींच घडावयाचें नव्हतें तें कसें घडून येणार ? अण्णासाहेबांच्या इच्छेप्रमाणें हरिभाऊंना वकील होतां आलें नाहीं; पण पुढें त्यांनीं जी समाजाची वकीली करून त्यांत स्थित्यंतर घडवून आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला, तो पाहतां ते केवळ पैशाकरितां भाडोत्री वकील झाले नाहींत, हें सुदैवच समजलें पाहिजे.

हरिभाऊंच्या हातून जे सर्व प्रयत्न विशी एकविशींत झाले त्यांत सर्वांत श्रेष्ठ व त्यांच्या अकालपरिपक्वतेची स्पष्ट जाणीव करून देणारा

त्यांचा प्रयत्न म्हटला म्हणजे त्यांची ‘ मधली स्थिति ’ ( १८८८ ) ही कादंबरी होय. रेनाल्डसची ‘ ओल्ड लंडन ’ या नांवाची एक कादंबरी आहे. तिलाच मराठी पेहराव चढवून ती महाराष्ट्र वाचकांपुढें ठेवावी असा हरिभाऊंचा प्रथम मनोदय होता. त्याप्रमाणें या पुस्तकाचें पहिलें प्रकरण भाषांतरमय आहे. पण परक्याच्या कल्पनाशक्तीवर चरितार्थ चालविणें भूषणावह नाहीं असें वाटूनच कीं काय, हरिभाऊंनीं तो नाद सोडून दिला व या पुस्तकाच्या दुसऱ्याच प्रकरणापासून त्यांनीं स्वतंत्र रीतीनें ग्रंथरचना करण्यास सुरुवात केली. ग्रंथाचीं कांहीं प्रकरणें तयार झाल्यावर त्यांनीं तीं आपल्या कांहीं मित्रांना दाखविलीं. तीं पाहून त्यांचे स्नेही चकित होऊन गेले. मराठी भाषेंतील एका नवीन पण, मनोज्ञ मन्वंतराचा हा पायाच होय, असें त्यांना वाटलें. पण हें पुस्तक छापून कसें निघावें ही विवंचना सर्वांपुढें येऊन उभी राहिली. शेवटीं त्यांच्या एका स्नेह्यानें पुणें वैभवाचे मालक प. वा. शंकरराव केळकर यांना त्याबद्दल विचारलें. रा. केळकर हे जुन्या मताचे कट्टे अभिमानी होते. या पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय सुधारकी मताचा आहे हें समजूनही त्यांनीं हें पुस्तक पुणें वैभवांत छापण्याचें कबूल केलें, ही एकच गोष्ट हरिभाऊंच्या रचनासौष्ठवाची साक्ष पटविते.

आपल्या हातून नियमित रीतीनें काम होऊन, आपला लेखन-व्यवसाय अव्याहत चालावा, यासाठीं आपलें एक स्वतंत्र पत्र असणें जरूर आहे, असें वयाच्या पंचविशीनंतर हरिभाऊंना वाटूं लागलें व

सन १८९० आक्टोबर अखेर त्यांनीं 'करमणूक' पत्र सुरू केलें. 'करमणूक' सुरू होतांच त्यावर वाचकांच्या उड्या पडूं लागल्या. व त्यांत प्रसिद्ध होणाऱ्या गोष्टी, चुटके, कादंबऱ्या यांनीं महाराष्ट्रांतील स्त्रीपुरुष वाचकांना चटका लावून सोडला. करमणुकीनें वाचनाकडे ज्यांची प्रवृत्ति झाली अशा शेंकडो स्त्रिया आज महाराष्ट्रांत सांपडतील. शेंकडो शाळांनीं जें कार्य कदाचित् झालें नसतें तें करमणुकीनें वर्षानुवर्ष बिनबोभाट कसें केलें हें सर्वविश्रुत आहे. करमणुकीनें स्त्रीवाचकच काय पण, स्त्रीलेखकही निर्माण केले. ही तिची कामगिरी महाराष्ट्रवाङ्मयाच्या व स्त्रीशिक्षणाच्या इतिहासांत निःसंशय संस्मरणीय होऊन राहील.

'करमणूक' काढण्याचा जो उद्देश हरिभाऊंनीं पहिल्याच अंकांत प्रदर्शित केला आहे, तो पाहिला म्हणजे या उद्देशांत दर्शविलेल्या प्रतिज्ञेची त्यांनीं आपल्या पुस्तकांत कशी पूर्ती केली हें समजून येईल. हरिभाऊ आपल्या या उद्देशांत म्हणतातः—“केसरीसुधारक एखाद्या कठोर पित्याप्रमाणें कठोर शद्बानें सांगणार व समाजाचें अप्रशस्त वर्तन झाल्यास वेळीं वाक्प्रतोदाचे तडाखे लगावणार. तीच गोष्ट हें पत्र प्रेमळ मातेप्रमाणें गोडगोड शद्बांनीं व चांगल्या चांगल्या गोष्टींनीं अप्रशस्त वर्तनाबद्दल मायेचें शासन करणार. एवढें मात्र लक्षांत ठेवावें कीं, हें पत्र आचरट आईप्रमाणें फाजिल लाड करणार नाहीं. ज्यास पुढल्या माडीपासून चुलीपर्यंत व दिवाणखान्यांतील टेबलापासून फणीकरंड्याच्या पेटीपर्यंत कोणाच्याही हातीं पडलें तरी

हवे त्यानें त्याच्या देखत निःशंकपणें वाचण्यास हरकत नाहीं असें पत्र पाहिजे असेल तर त्यांनीं अवश्य करमणुकीचे वर्गणीदार व्हावें."

हरिभाऊंच्या आयुष्याच्या शेंवटच्या तीस वर्षांचे म्हणजे करमणुकीच्या जन्मापासून तों अखेरपर्यंतच्या काळाचे दहा दहा वर्षांचे तीन भाग पाडले तर त्यांत प्रत्येक भागांत त्यांनीं खालीलप्रमाणें ग्रंथरचना केलेली आढळतेः——

सन १८९० पासून सन १९०० पर्यंत

पण लक्षांत कोण घेतो ! ( १८९०–९३ ), सगुणाबाईंची व गोविंदरावांचीं पत्रें ( १८९१–९४ ), यशवंतराव खरे ( १८९२–९५ ), मी ( १८९३–९५ ), जग हें असें आहे (१८९७–९९), काळ तर मोठा कठिण आला ( गोष्ट ) ( १८९९ ), म्हैसूरचा वाघ ( अपूर्ण ) ( १८९०–९१ ), उषःकाल ( १८९५–९७ ) व केवळ स्वराज्यासाठीं ( १८९८–९९ ).

सन १९०० पासून सन १९१० पर्यंत.

भयंकर दिव्य (१९९१–०३), आजच (अपूर्ण) १९०४–०६), रूपनगरची राजकन्या ( १९००–०२ ), चंद्रगुप्त (१९०२–०४) गड आला पण सिंह गेला ( १९०३ ), सूर्योदय ( १९०५–०६ ), मध्यान्ह ( अपूर्ण ) ( १९०६–०८ ) व सूर्यग्रहण ( अपूर्ण ) ( १९०८–०९ ).

## सन १९१० पासून सन १९१९ पर्यंत.

मायेचा बाजार (१९१०–१२), कर्मयोग (अपूर्ण) (१९१३–१७), कालकूट (अपूर्ण) (१९०९–११), व वज्रघात (१९१३–१५).

'मधली स्थिति', पण लक्षांत कोण घेतो! व हरिभाऊंच्या इतर सामाजिक कादंबऱ्या यांतील पात्रें अगदीं रोजच्या व्यवहारांतील आहेत. स्त्रीशिक्षण, सासुरवासा, बालविवाहनिषेध, शरीराची पूर्ण वाढ होण्यापूर्वी यौवनसुखानुभवाचा प्रतिबंध इत्यादि सर्व अपेक्षित सुधारणांचें बी रुजविण्याचा उपक्रम हरिभाऊंनीं आपल्या सामाजिक कादंबऱ्यांत केला आहे. 'मी' या कादंबरींत या सर्व आपत्ती दूर करण्याकरिता एका खऱ्या समाजसुधारकाकरवीं उपाय सुचविण्यात आला आहे 'कर्मयोग' हा 'मी' या कादंबरीत ग्रथित झालेल्या तत्त्वांचाच पुढचा विकास होय 'यशवंतराव खरे' व 'आजच' या दोन कादंबऱ्या समाजसुधारणेस प्रतिकूल असलेल्या व राजकीय सुधारणेवरच सर्वस्वीं भार ठेवणाऱ्या अशा आहेत. पण त्यांच्या कथानकास कोठेंच पूर्णता आलेली नाहीं. 'जग हें असें आहे' या कादंबरींत सापत्नसंबंधामुळें होणारे दुष्परिणाम वर्णिले आहेत. 'भयंकर दिव्य' यांत सोनेरी टोळीचीं दुष्ट कृत्यें वर्णन केलेलीं आहेत. 'मायेचा बाचार' या कादंबरींत दुष्ट पतीमुळें स्त्रियांच्या होणाऱ्या दुःस्थितीचें कटु चित्र रेखाटलें आहे.

या सर्व कादंबऱ्यांत एकंदर तीन पिढ्यांचा इतिहास आहे. गणपतरावाचा मुलगा चंद्रशेखर हा कर्मयोगाचा नायक आहे. ' मी ' या कादंबरींत ताईचा मठ " भयंकर दिव्यांत, " " आजच ". मध्यें व " कर्मयोगां"तही अधिष्ठित झालेला दिसतो. ' यशवंतरावां'-तील व 'भयंकर दिव्यां'तील पात्रें ' आजच' मध्यें व 'कर्मयोगांत ' ही आलेलीं आहेत. वर दिलेल्या कादंबऱ्यांपैकीं ' गणपतराव, ' ' आजच ' व ' कर्मयोग ' या अपूर्ण आहेत.

हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्या पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—१ म्हैसूरचा वाघ ' ( आधारचित ), २ ' उष:काल ' यांत शिवाजीचा उदयकाळ वर्णन केला आहे. ३ ' सूर्योदय ' यांत अफजुलखानाच्या वधाचें कथानक वर्णन केलें आहे. ४ ' सूर्यग्रहण ' या कादंबरींत शिवाजी अवरंगजेबाच्या कैदेंत पडला आहे, त्या काळची स्थिति आलेली आहे. ५ ' गड आला पण सिंह गेला ' यांत तानाजी मालुसरे यानें सिंहगड सर केल्याची हकीकत आहे. ६ ' मध्यान्ह ' ही सवाई माधवरावांच्या काळजी आहे. ७ ' चंद्रगुप्त ' व ८ ' कालकूट ' या कादंबरींत पृथ्वीराज चव्हाणाची कथा आहे. ९ ' वज्राघात ' यांत विजयनगरच्या विनाशकालाची परिस्थिति वर्णन केली आहे व १० ' रूपनगरची राजकन्या ' ही होय. या कादंबऱ्यांपैकीं ' सूर्यग्रहण, ' ' मध्यान्ह ' व ' कालकूट ' या अपूर्ण स्थितींतच आहेत.

कथानकाचें संविधानक ठरवून त्याची सुसंगत रीतीनें रचना करणें, त्यांतील पात्रांचा कथानकांतील प्रसंगानुरूप उठाव करणें,

स्थलवर्णनाची हुबेहुब मांडणी करणें, पात्रांच्या स्वभावांचें यथार्थ दिग्दर्शन करणें, कथानकांतील निरनिराळ्या घटकांचा परिपोष यथाक्रम व यथाप्रमाण होईल अशी तरतूद करणें वगैरे संबंधांत हरिभाऊंचा हातखंडा असे. कल्पनेनें निर्मित अशा कृत्रिम सृष्टीची स्वाभाविक सृष्टीप्रमाणें बेमालुम बनावट करणें हा जो उत्कृष्ट कादंबरीकाराचा गुण तो हरिभाऊंना सहजसाध्य होता. त्यांच्या कादंबऱ्या वाचणाराला, कादंबऱ्यांत वर्णन केलेले प्रसंग प्रत्यक्ष आपल्या डोळ्यापुढें घडत आहेत, असा भास झाल्याशिवाय रहात नाहीं.

'मायेचा बाजार' या कादंबरींत पद्मेवर त्यांनीं जे संकटाचे एकामागून एक भयंकर प्रसंग आणून त्यांतच तिची अखेर केली, तो प्रकार वाचून एका वाचकानें त्यांना एक पत्र पाठवून त्यांची चांगलीच खरडपट्टी काढली होती.

'या स्त्रीचा तूं इतका छळ केलास तेव्हां तूं असा पाषाणहृदयी आहेस तरी कोण ? तिला थोडा तरी सुखाचा अनुभव येऊं दिला असतास तर त्यांत तुझ्या बापाचें कांहीं गेलें असतें का !' असें या गृहस्थानें हरिभाऊंना पाठविलेल्या पत्रांत म्हटलें होतें. आपण निर्माण केलेली ही कल्पनासृष्टि आहे याचाही या वाचकाला विसर पडला, हें पाहून हरिभाऊंना आपल्या लेखनकलेचें कौतुक वाटल असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाही. 'भयंकर दिव्य' या कादंबरींत 'वार्धक्यकुठार' नांवाची औषधाची जाहिरात कथानकाच्या संदर्भानें त्यांनीं आणली आहे. ती पाहून एक दोन

माणसांकडून त्यांना हें औषध पाठविण्याविषयीं पत्रेंही आलीं! 'पण लक्षांत कोण घेतो!' ही कादंबरी पुस्तकरूपानें प्रसिद्ध होईपर्यंत ती खरोखरच यमुना नांवाच्या एका स्त्रीनें लिहिली असें समजणारे कित्यके वाचक होते. आणि त्याप्रमाणें हरिभाऊंकडे कित्येक पत्रेंही आलीं. नाशिकच्या एका विद्वान् शास्त्र्यानें हरिभाऊंची 'चंद्रगुप्त' ही कादंबरी वाचली व हरिभाऊंना लिहिलें कीं, 'मुद्राराक्षस नाटक' मी कित्येक वेळां वाचलें व विद्यार्थ्यांनाही शिकविलें, पण आर्यचाणक्याच्या भूमिकेचें खरें रहस्य आपली कादंबरी वाचून माझ्या लक्षांत आलें!"

हरिभाऊंच्या लेखनव्यवसायाचा काल म्हणजे पन्नास वर्षांपूर्वींचा महाराष्ट्राचा काल होय. हा एका दृष्टीनें विशेष नाजुक होता. इंग्रजी राज्याच्या वैभवानें आपल्या लोकांच्या डोळ्यावर जो धूर आला होता तो अद्यापि अवशिष्ट होता. एवढा थोरला प्रचंड देश एकछत्री करून त्यांत इंग्रजांनीं अखंड शांतता स्थापन केली, या विचारानें लोकांचीं मनें वेडावून गेल्यासारखीं झालीं होतीं. त्यांच्यामधील आत्मविश्वास पूर्णपणें नष्ट झाला होता. त्याचें पुनरुज्जीवन करून आपणही उद्योग केला तर आपला भविष्यकाल आपणास उज्वल करतां येईल, अशी लोकांमध्यें जाणीव उत्पन्न करणें या वेळीं जरूर होतें. ही जाणीव उत्पन्न करण्यास निरनिराळ्या प्रकारांनीं पात्र असलेले जे अनेक नर-रत्न या वेळीं जन्मास आले त्यांतच हरिभाऊंची गणना करणें कसें जरूर आहे, हें त्यांच्या ग्रंथाचें ज्यांनीं परिशीलन केलें आहे त्यांना वेगळें सांगावयास नको.

हरिभाऊंचा दांडगा विद्याव्यासंग, त्यांची उज्वल प्रतिभाशक्ति व मोठमोठे उदात्त विचारही अगदीं सोप्या भाषेंत व्यक्त करण्याची त्यांची हातोटी या गुणत्रयीमुळें त्यांचीं पुस्तकें इतकीं लोकप्रिय झालीं. लोकजागृति करण्याच्या इतर शाखांत एकाला दोन किंवा दोहोंला तीन अशीं थोर माणसें सांपडतील, पण हरिभाऊंनीं लोकजागृतीची जी विवक्षित शाखा अगदीं अल्प वयापासून स्वीकारली व जिची कायावाचामनेंकरून त्यांनीं आजन्म जोपासना केली त्या शाखेंत मात्र त्यांना एकही जोडीदार मिळाला नाहीं. या शाखेंत ते 'एकमेवाद्वितीयच' होऊन गेले.

आतां हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचा आपण प्रत्यक्ष थोडासा मासला पाहूं. "पुष्कळदां असें होतें कीं जी गोष्ट नित्य डोळ्यापुढें घडत असून ती आपल्या विशेष लक्षांत येत नाहीं, तीच ती सभोंवतालच्या परिस्थितींतून वेगळी निवडून काढून एकटी 'विरलगत' अशी करून स्वतंत्र रीतीनें पुढें मांडली असतां तिच्याकडे समाजाचें अधिक लक्ष वेधतें. कारण रोजच्या व्यवहारांत चोहोंकडे सारखी प्रसृत झालेली दृष्टि, अशा रीतीनें एकच प्रसंग पुढें मांडला म्हणजे त्या एका गोष्टीवर केंद्रीभूत होऊन त्या गोष्टीचें महत्त्व आपल्या लक्षांत येतें. विदग्ध वाङ्मयाचें खरें कार्य हेंच आहे. विनायकराव व अनंतराव या हरिभाऊंच्या 'मधल्या स्थितींतील' प्रमुख पात्रासारखे शेंकडो नराधम आपल्या सुशील पत्नीचा त्याग करून, हलकट व नीच स्त्रियांच्या मागें लागत असतील; अशा नीच पुरुषांशीं आपला

व्यवहारांत कदाचित् नित्य संबंधही येत असेल; त्यांनीं क्रूरपणें आपल्या गृहिणींचा छळ केल्याच्याही गोष्टी एखादे वेळीं आपल्या कानांवर येत असतील; पण संसाराच्या दगदगींत चित्त सदा व्यापृत असल्यामुळें असल्य गोष्टींचा मनावर परिणाम होण्यास वेळ मिळत नाहीं. परंतु असें चित्र एकाद्या कादंबरींत पुढें मांडलें म्हणजे चित्त आश्चर्यचकित होऊन खरोखरीच असें होत असेल काय ?—असा प्रश्न मनात उभा राहतो. या कादंबरीचा असा परिणाम तत्कालीन समाजावर निःसंशय झाला. त्या वेळची ही समाजस्थिति हरिभाऊंनीं या कादंबरींत इतकी कळकळीनें व परिणामकारक रीतीनें मांडली आहे कीं ही कादंबरी प्रसिद्ध होतांच समाजांत चोहोंकडे मोठी खळबळ उडाली; व हा इतका प्रतिभावान् लेखक तरी कोण, हें जाणण्याची प्रत्येकास उत्कंठा लागली ''×

अनंतराव आपल्या वेश्येचीं आर्जवें व मनधरणी करीत आहे, ती त्याला झिडकारीत आहे; असा प्रसंग वर्णन करून हरिभाऊंनीं जे उद्गार काढले आहेत ते इतके हृदयद्रावक आहेत व त्यामध्यें तत्कालीन समाजस्थितीचें हुबेहुब चित्र आहे कीं तो सबंध भाग येथें उतरून घेतल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

" अहारे निर्लज्जा, धन्य आहे तुझी ! पहा हिरकणीला टाकून खापरखुंटीला आलिंगन देण्याचा प्रकार...... पहा घरची चांगली

× ना. ना. देशपांडेकृत ' हरिभाऊ आपटे यांच्या आठवणी व कादंबऱ्या पृ. ५०.

सोन्यासारखी बायको टाकून या दीडदमडीच्या कैकाडणीच्या लाथा खाण्यासाठीं कसा धडपडतो आहे. या ठिकाणीं हा गरीब, मनमिळाऊ व प्रेमळ दिसणारा गृहस्थ आपल्या घरीं म्हणजे अगदीं नुसता ' रावणमहाराज ' असे, व या बटकीच्या पायींच त्यानें तिची धूळधाण उडवून दिली होती........या अवदसेच्या पाया पडणारा हा गृहस्थ आपल्या अतिशय सुस्वरूप अशा अग्नीला साक्षी ठेवून सर्व लोकांसमक्ष ठरलेल्या बायकोला नानातऱ्हेचे शब्द बोलून मारहाणही करीत असे आणि ही तर जगांतली अगदीं नेहमींची एक रीतच पडली आहे कीं, खऱ्या बायकोनें एक शब्द काढला तरी तो विषाप्रमाणें झोंबतो, परंतु अशा बटकींनीं लत्ताप्रहार केला तरी तो सोसावासा वाटतो. खऱ्या बायकोनें एक पैसा मागितला, तरी तो देणें अगदीं जिवावर येतें. परंतु अशा वेश्यांनीं घरादाराचा अपहार केला तरी कांहीं वाटत नाहीं. शिव ! शिव ! नारायणा, तूं पुरुषांच्या मनांत अशी प्रेरणा तरी कशी करतोस ? ज्या वेळीं पुरुष आपल्या खऱ्या पत्नीला सोडून दुसरीकडे पाहणार नाहींत, अशी कधींही या जगावर वेळ येणार नाहीं काय ? पुरुष आपल्या बायकोला योग्य मान व स्वातंत्र्य देईल, तिच्यावर खरी खरी भक्ती ठेवील तिच्या सेवेंत नेहमीं दक्ष असेल, तिला दास्यांतून तो मोकळी करील, अशी वेळ या जगावर येऊन, जिकडे तिकडे समता व नीति यांचा पगडा व्हावा, असा तुझ्या घरचा नेमानेमच नाहीं काय ? घरीं एक कवडीही इकडे तिकडे गेली तर अकांडतांडव करणारा गृहस्थ वेश्यांच्या पायीं लाखों रुपये उधळतो, पण घरची दादही घेत नाहीं,

अशा गोष्टी आपण थोड्या ऐकतों काय ? बायकोचें ऐकलें तर आपणास बाईलबुद्ध्या म्हणतील, अशी ज्याला भीति वाटते, तोच वेश्येच्या घरीं जाऊन, तिच्या सांगण्याप्रमाणें ऐकून, आपल्या घरादाराची माती करून टाकतो........वर सांगितलेल्या गृहस्थाची पत्नी म्हणजे स्वरूपानें काय किंवा गुणानें काय, पांच हजारांत सांपडावयाची नाहीं, अशी होती. अहाहा ! तिची आपल्या पतीवरची जी काय निस्सीम भक्ती होती तिला तर तोडच नव्हती. या अवदसेचें मन वळविण्याकरितां जी खटपट हा करीत होता व जितकी प्रीति दाखवीत होता, त्याच्या एकशतांश जरी त्यानें आपल्या धर्मपत्नीस दाखविली असती, तर तिनें अतिशय आनंद मानला असता. हा नेहमीं सुरापान करीत असे व त्याच्या धुंदींत तिच्या अंगावर हात टाकीत असे, तरी देखील तिनें " ह्यांत तें मेलं काय जास्ती आहे ! " किंवा ' हें काय असं . उगीच मारायला मी तें काय केलं आहे ? " एवढेंच म्हणावें; परंतु एवढ्यावरूनच संतापून जाऊन हे तिरसिंगराव तिला आणखी मारीत असत. एखाद्या दिवशीं यानें जर कुठें हंसतमुखानें तिच्याकडे पाहिलें तर तिला किती वरें धन्य होत असे !........वाचकहो, आम्ही सांगतों ही एकच गोष्ट असेल असें तुम्हीं समजूं नका. अशा गोष्टा आज आमच्या या पुण्यांत काय, किंवा कुठेंही काय शेंकडों सांपडतील व तुमच्याही दृष्टीस पडल्या असतील, आम्हीं म्हणजे जास्त सांगावयास पाहिजे असें नाहीं. आणखी मजा ही कीं अशा गोष्टी अशि-

क्षित लोकांच्या हातून होतात असें नाहीं; चांगल्या सुशिक्षित लोकांत देखील होतात "*

# प्रकरण ७ वें.

## पायाचें दृढीकरण

आपल्या मराठी कथावाङ्मयांत इष्ट अशा नूतन व मनोज्ञ मन्वंतराचा पाया एकदां पडावयासच पाहिजे होता तो पडल्यावर आणि तोही ह. ना. आपटे यांच्यासारख्यांनीं पाडल्यावर त्याच्या दृढीकरणाच्या कामीं हातभार लावणारे दूर नव्हते. त्यापैकीं बऱ्याच जणनीं या पूर्वीच हात वळविण्यास सुरुवात केली होती व बरेच जण हात वळवीत होते. बरेच जण अनुकूल स्थितींत होते, तर बरेच जण प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत होते. कांहीं लोक योग्य दिशेनें मार्ग आक्रमीत होते तर कांहीं जणांची कांहीं काळ दिशाभूल झाली होती. कांहीं जण आपल्या पुढील कार्याविषयीं निःसंशय होते तर कांहीं जण तोंपर्यंत संभ्रम चांचपडत होते. कांहीं जणांची तयारी पूर्ण होती तर कांहीं जण अपूर्ण तयारीनें कामास हात घालीत होते. आणि कांहीं जण दीर्घायु होते तर कांहीं जण मराठी कथावाङ्मयाच्या दुर्दैवानें अल्पायु होते !

* मधली स्थिति प्रकरण १८ पृ. १३६

असें जरी होतें तरी ललितवाङ्मयाच्या इतर शाखाप्रमाणें मराठी कथावाङ्मयक्षितिजावर कित्येक दैदिप्यमान तारे खात्रीनें चमकून गेले व त्यांचे अल्पस्वल्प व कळत न कळत झालेले प्रयत्नही कथा-वाङ्मयास कल्याणकारक झाल्यावाचून राहिले नाहींत ही गोष्ट सन १८९० नंतर आपण जों जों पुढें यावें तों तों आपणास स्पष्टपणें दिसून येते.

सार्वत्रिक पचनीं पडणाऱ्या सात्त्विक कथावाङ्मयाची हरिभाऊंनीं लावून दिलेली ही गोडी अखिल महाराष्ट्रांत थोडक्याच दिवसांत इतकी पसरली कीं. तिचा पुरवठा करण्यास एकटे हरिभाऊ—मग त्यांचा लेखनव्यवसाय कितीही दांडगा असो—खात्रीनें पुरे पडले नसते तो करण्यास निरनिराळ्या श्रेणीचे अनेक लेखक पुढें यावयास पाहिजे होते व ते तसे आल्यामुळेंच हरिभाऊंनीं सुरू केलेल्या मन्वंतराचा पाया कालेंकरून दृढ झाला. ज्या परिस्थितीनें ह. ना. आपटे यांच्या-सारख्या कादंबरीकारास जन्म दिला तिनें दुसऱ्याही कित्येक कादं बरीकारास जन्म दिला नसेल हें संभवत नाहीं. यांच्या काळीं 'आपटे' उपनामधारी कादंबरीकारांत ते एकटेच काय ते चमकत होते; पण आमच्या काळीं दुसरे दोन 'आपटे' पुढें येऊन आम्हांस आपट्यांची ? कादंबरी कोणी मागितली असतां कोणत्या आपट्यांची ? 'हरि नारायण', 'नारायण हरि,' कीं 'वासुदेव गोविंद ? असा प्रश्न ती मागणारास विचारावा लागतो आणि ज्याअर्थी एका 'आपटे' उपनामधाऱ्यांत या काळीं एकाचे तीन आपटे झालेले आपण पाहतों

त्याअर्थी मराठी कथावाङ्मयाच्या इतिहासाच्या शतकार्धाइतक्या अवधींत कादंबरीकर्तृत्वाचा मक्ता एकट्या आपट्याकडे सदैव चिकटून राहणें केव्हांही संभवत नाहीं.

ह. ना. आपटे कादंबरीलेखनांत आपल्या समकालनिाविरहित नव्हते. शोधूं घेल्यास त्यांची बरोबरी करूं शकणारे कांहीं जण आपणास खात्रीनें मिळतील. परंतु सर्वांसच हरिभाऊंची अनुकूलता कोठून असणार ? अथवा मराठी कथावाङ्मयाच्या सुदैवानें सर्वांचेंच लक्ष त्याच्याकडे हरिभाऊ इतकेंच वेधलेलें कोठून असणार ? असें नसतें तर बाळकृष्ण संतुराम गडकरी व विनायक त्रिंबक मोडक यांच्यासारखे लेखक हरिभाऊ इतकेच पुढें आल्यावाचून राहिले नसते; शिवराम महादेव पराजपे यांनीं 'गोविंदाची गोष्ट,' चिंतामण विनायक वैद्य यांनीं 'दुदैवी रंगू', श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं 'दुटप्पी कीं दुहेरी, चिंतामण गंगाधर भानु यांनीं 'शृंगेरीची लक्ष्मी' व गोविंद चिमणाजी भाटे यांनीं 'प्रेम कीं लौकिक' ही कादंबरी या पूर्वींच आपल्या हातीं दिली असती, आणि सीताराम केशव दामले यांनीं आपला हात कादंबरीलेखनापासून इतक्या लवकर आखडला नसता.

असें जरी झालें नाहीं, तरी देखील मराठी कथावाङ्मयाचें पाऊल पुढें पडल्यावांचून रहावयाचें नव्हतें. किंबहुना हरिभाऊंकडून पडलेल्या या नवीन मन्वंतराचा पाया त्यांच्याच हयातींत कसा दृढ

झाला होता, ही गोष्ट खुद्द हरिभाऊंच्या दृष्टोत्पत्तीस आल्याखेरीज राहिली नसेल. मात्र इतकें खरें कीं, हरिभाऊंनीं शोधून काढलेला कथावाङ्मयाचा हा राजमार्ग तज्ज्ञास इतका रमणीय वाटला कीं, पुढें तत्संबंधीचे जुने वोळ ओस पडत जाऊन जो तो याच रस्त्यावर गर्दी करूं लागला.

हरिभाऊंचे प्रयत्न फार सुवेळीं होते सांस्कृतिक दृष्ट्या विचार केल्यास महाराष्ट्रियांनीं या वेळीं आपलें पाऊल प्रत्येक बाबतींत झपाट्यानें उचलावयास सुरुवात केलेली दिसते इतर बाबतींत महत्वाच्या असणाऱ्या प्रत्येक मराठी नगरानें या वेळीं साक्षरतेच्या बाबतींतही पुष्कळच अघाडी मारली होती. नगर मोठें असून तेथें एखादा छापखाना, एखादें वर्तमानपत्र अथवा मासिक पुस्तक नाहीं, असें वहुधा होईनासें झालें होतें. यावेळीं जेथें 'केसरी' तेथें 'सुधारक' व जेथें 'सुधारक' तेथें 'करमणूक' व जेथें 'करमणूक' तेथें करमणूककालीन कथावाङ्मय प्रचलित असलेलें दिसून येऊं लागलें

मराठी वाङ्मयाभिवृद्धीच्या दृष्टीनें मुंबई, बडोदें, कोल्हापूर, वाई, सातारा, नागपूर व उमरावती इत्यादि शहरें पुणें शहराइतकींच महत्वाचा आहेत. या प्रत्येक शहरांत यावेळीं एक एक दोन दोन नेते तेथील कथावाङ्मयाची कामगिरी करीत होते. पुण्यास नाइट क्लब,' मुंबईस 'मनोरंजनग्रंथमाला,' वाईस 'कादंबरीकल्पद्रुम' व 'मकरंद,' बडोद्यास 'ग्रंथसंपादक आणि प्रसारक मंडळी' इत्यादि मासिकें व ग्रंथमाला मराठी कथावाङ्मयाचा पाया मजबूत

करीत असतांना दिसून येतात कृष्णाजी नारायण आठल्ये यांचें ' केरळकोकिळ 'ही याच मध्यकालांतील एक महत्वाचें मासिक असून त्यांत येणाऱ्या कविता, चुटके, लोकोत्तर चमत्कार इत्यादि गोष्टी कथावाङ्मयासच पोषक होत होत्या. विशेषतः त्याच्या पुस्तक-परीक्षणानें तर कांहीं काळ अखिल महाराष्ट्रास चटका लावून सोडला होता. बेळगांव जिल्ह्यांतील एवढेसें खानापूर; पण तेथील ' लोकमित्रा'नें सन १८९१ पासून बऱ्याच कथावाङ्मय वाचकांची मैत्री संपादन केली होती.

मराठी कथावाङ्मयाचे पुण्याचे पुरस्कर्ते जसे हरिभाऊ तसे मुंबईचे या वेळचे पुरस्कर्ते श्रीयुत नाथमाधव व प. वा. काशिनाथ रघुनाथ मित्र हे होत. ' करमणूक ' काढून जी कामगिरी हरि-भाऊंनीं केली तीच ' मनोरंजन ' काढून श्रीयुत मित्रांनीं केली. मासिक मनोरंजनापूर्वीं मराठी भाषेंत मनोरंजक मासिक पुस्तक मुळींच नव्हतें असें नाहीं. ' मनोरंजन आणि निबंधचंद्रिका ' हें प्रसिद्ध मासिक तर हरिभाऊ आपल्यासारख्या पहिल्या प्रतीच्या लेखकाच्या संपादकत्वाखालीं चाललेलें होतें. परंतु वाचकांच्या मनास चटका लावून सोडणारें व पुढील अंक हातीं कधीं येतो अशी उत्कंठा वाटावयास लावणारें महाराष्ट्रांतलें पहिलें मासिक मनोरंजनच होय, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. सुंदर छपाई, उत्कृष्ट चित्रें, कुशल लेखकांचें साहाय्य आणि विषयांची निवड करण्याचें संपादकीय चातुर्य इत्यादि गोष्टींमुळें मनोरंजनाची लोकप्रियता इतकी वाढली

कीं, जेथें हरिभाऊंचें ‘ करमणूक ’ तेथें मित्रांचें ‘ मनोरंजन ’ पहावयास मिळाल्याखेरीज राहीनासें झालें आणि खपाच्या बाबतींत तर त्यानें करमणुकीस मागें टाकलें.

काशिनाथपंतांची घरची स्थिति अत्यंत गरीबीची होती; पण आपल्या मनोरंजनावर त्यांनीं द्रव्य आणि कीर्ति हीं इतक्या मोठ्या प्रमाणांत संपादन केली कीं, एखाद्यानें जर गेल्या पन्नास वर्षांत होऊन गेलेल्या मराठी कथावाङ्मयाच्या पुरस्कर्त्यांची एक यादी तयार केली तर तिच्यांत मित्रांचें नांव पहिल्याच दोनचार नांवांत सांपडल्याखेरीज रहावयाचें नाहीं.

अभिजात कादंबरीकर्तृत्वाचा कित्ता जसा हरिभाऊंनीं करमणुकीच्या द्वारें घालून दिला, तसा अभिजात गोष्टी लिहिण्यासंबंधाचा कित्ता श्रीयुत मित्रांनीं आपल्या मनोरंजनाकरवीं घडविला कादंबरीची लेखनशैली व लहान गोष्टींची लेखनशैली यांत बरेंच अंतर आहे. हें मराठींत जर कोणी लोकांच्यापुढें प्रथम मांडलें असेल तर तें मनोरंजनानें. लहान गोष्टींत कादंबरीचा पाल्हाळ वर्ज करावयाचा असतो व लेखकानें स्वतः होऊन हकीकत सांगण्यापेक्षा पात्रांच्या तोंडून ती निवेदावयाची असते. तसेंच भाषायोजनेसंबंधाचेंही आहे कादंबरीची भाषा लांबलचक, संयुक्त वाक्यमिश्रित, तर गोष्टी लिहिणाऱ्या लेखकाची भाषा आटपसर व त्रोटक वाक्यांनीं युक्त अशी असावी लागते. मनोरंजनांतील गोष्टींत गोष्टी लिहिण्याचा हा कायदा यशस्वी रीतीनें पाळला जात असे. काशिनाथपंतांच्या मृत्यूनंतर

त्यांच्याविषयींच्या मित्रअंकांत सोडलेल्या तिलांजलींत त्यांचे रसिक ग्रामबंधु रा. रा. ज. र. आजगांवकर यांनीं मित्राविषयीं पुढीलप्रमाणें अन्वर्थक उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "व्यक्तिशः मला मासिक मनोरंजनाचें सामाजिक धोरण कित्येक वेळां जरी थोडेसें आक्षेपास्पद वाटलें, तरी त्या मासिकानें महाराष्ट्रांतील सर्व दर्जाच्या लोकांस जी वाचनाभिरुचि लावली व विदग्धवाङ्मयांत जी श्रेष्ठ प्रतीची भर टाकली त्याबद्दल त्यांची ( मित्रांची ) मी केव्हांही मुक्त-कंठानें स्तुतीच करीन व माझ्या एका ग्रामबंधूच्या या स्तुत्य काम-गिरीविषयीं निरंतर अभिमानच बाळगीन."

परंतु मासिक पुस्तक काढून स्वस्थ बसणारे अथवा ते चाल-विण्यापलीकडे हिं अधिक न करणारांपैकीं मित्र नव्हते. मासिका-बरोबरच 'मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी' नामक एक कथाग्रंथ-माला सुरू करून, तिच्यांतून दुसऱ्या अनेक लायक व योग्य उत्तेजनाची वाट पाहणाऱ्या विद्वानांचीं पुस्तकें त्यांनीं भराभर पुढें आणण्यास सुरवात केली. या मालेंत त्यांनीं आपल्या 'धाकट्या सूनबाई,' 'प्रियंवदा,' 'मृणालिनी'* 'रमा आणि माधव,' ( कनेवऊ ) 'लीला' व 'ही रामाची अयोध्या' इत्यादि कादं-बऱ्या प्रसिद्ध केल्याच; पण त्याशिवाय वासुदेव गोविंद आपटेकृत 'दुःखा अंतीं सुख,' 'नवयुग' ( युगांतर ), 'माणिक

* फुलां असलेल्या पुस्तकांस डे. व्ह. ट्रा. सोसायटीकडून बक्षिस मिळालें आहे.

बाग '* 'मूर्तिमंत देशाभिमान' व 'विलक्षण भोळेपणा'; विठ्ठल सीताराम गुर्जरकृत 'जीवन संध्या' (रजपुत जीवन संध्या), 'जुलिया-दलिया,' 'ललिता,' 'संसार असार' व 'सेलिया-बेगम;' कृष्णाजी केशव गोखलेकृत 'आजपासून पन्नास वर्षांनीं;' शंकर रामचंद्र हातवळणेकृत 'गृहशिक्षण' व 'सुशिक्षित स्त्री;' बाळकृष्ण रामचंद्र कुळकर्णीकृत 'परिणामीं हेंच' व 'सरस्वति;' विठ्ठल जिवाजी नाडकर्णीकृत 'नरेंद्रनाथ;' विनायक रामचंद्र जोशीकृत 'केवळ स्वार्थापायीं;'* शांतारामकृत 'राजा तोडरमल'; शांताराम रघुनाथ नाईककृत 'बकुलमाला', सहस्त्रबुद्धेकृत 'अमृत पुलीन'; शारदाश्रमवासीकृत 'सुधा;' गणेश विष्णु साठ्येकृत 'नवराची परीक्षा'* व सौ. काशीबाई हेर्लेकरकृत 'संसार तल्या गोष्टी' इत्यादि पांचपंचवीस लोकप्रिय कादंबऱ्या व गोष्टी प्रसिद्ध करून मित्रांनीं कथावाङ्मयाची दुहेरी सेवा केली. याशिवाय मालेची बापूराव करंदीकरकृत 'भद्रंभद्र;' श्रीपाद कृष्ण कोल्हटकरकृत 'सुदाम्याचे पोहे;' भालचंद्रकृत 'वेड्यांचें इस्पितळ' इत्यादि विनोदी पुस्तकें व हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकरकृत 'रावबहादूरपदवीत्या'* यासारखीं हास्यरसप्रधान नाटकें निराळींच. एवंच या कालांतील मराठी कथावाङ्मयाचा पाया दृढ करणाऱ्या पहिल्या श्रेणीच्या मंडळींत एक स्थान पण वा काशिनाथ रघुनाथ मित्र यांना अवश्य द्यावें लागतें.

---

* फुल असलेल्या पुस्तकास डे. व्ह. ट्रा. सोसायटीकडून बक्षिस मिळालें आहे.

१०१
३२०८

आतां व्यासंगाच्या दृष्टीनें पाहूं गेल्यास ज्यांची तुलना हरिभाऊ आपटे यांच्याबरोबरच करणें योग्य होईल, असा या कालांतील दुसरा महत्वाचा कथावाङ्मयप्रवर्तक म्हणजे नाथमाधव हे होत. श्रीयुत नाथमाधवांनीं आपलें सर्व आयुष्य जणूं काय कथावाङ्मयोद्धारार्थच खर्च करण्याचें ठरविल्यासारखें दिसतें. मुंबईस यावेळीं एकीकडे मित्र व त्यांच्या मंडळींचे, तर दुसरीकडे श्रीयुत नाथमाधवांचे प्रयत्न चालले होते. त्यांची 'सायंकाळची करमणूक' सन १९०५ सालीं पुढें आलेली दिसते व त्यानंतर 'प्रेम आणि सूड,' 'जग हें असेंच,' 'ग्रहदशेचा फेरा,' 'रायक्लब अथवा सोनेरी टोळी,' 'विहंगवृंद' 'वीरधवल' व 'सावळ्या तांडेल'* हेमचंद्र–रोहिणी,' 'दैवाचे खेळ,' देशमुखवाडी 'विमलेची ग्रहदशा' 'सुहासिनी,' 'सापत्नभाव' व 'डॉक्टर कादंबरी' इत्यादि निरनिराळ्या प्रकारच्या कादंबऱ्या त्यांच्याकडून पहिल्याच धडाक्यांत तयार झालेल्या दिसतात. त्यानंतर मध्यंतरीं कांहीं काल त्यांनीं थोडीशी विश्रांति घेतल्यासारखा दिसते; पण ती पुन्हां उत्तमोत्तम ऐतिहासिक कादंबऱ्यांचा 'श्रीगणेशा' करण्याकरिताच कीं काय, असें वाटतें.

कसेंही असो; मराठी कथावाङ्मयाच्या विविध सदरांत श्रीयुत नाथमाधव हे उत्कृष्ट भर घालीत आहेत, यांत संशय नाहीं. मुंबईचीं

---

* फुली असलेल्या 'पुस्तकांस डे. व्ह.' ट्रा. सोसायटीकडून बक्षीस मिळालें आहे.

कथानकें रेखाटण्यांत त्यांची बरोबरी दुसरे एक दोन ग्रंथकारच करूं शकतील. त्यांच्या ' रायक्लब 'च्या वाचनाची गोडी महाराष्ट्रियेतरांतही पाहून आम्हांस कौतुक वाटलें. त्यांच्या अलीकडील स्वराज्याविषयक कादंबऱ्या तर त्यांना ऐतिहासिक कादंबरीकारांच्या पहिल्या श्रेणींत बसवितात. ' नटसम्राट ' व ' स्वयंसेवक ' याही अगदीं अलीकडच्या कादंबऱ्या आहेत.

राहण्याचें ठिकाण मुंबई नसेल, तरी ज्याचे प्रयत्न मुंबईसच फलद्रुप झाले असा या वेळचा तिसरा महत्वाचा कथावाङ्मयप्रवर्तक म्हणजे तो रत्नागिरीचे श्रीयुत गोविंद नारायण दातार हे होत. श्रीयुत दातारांच्या हातून मराठी वाङ्मयविषयक जी विविध कामगिरी झाली आहे, तिच्यांत त्यांच्या कादंबरीलेखनास अग्रस्थान द्यावें लागतें. ' रंगनाथी योगवासिष्ठ ', ' मुहूर्तमार्तंड ', ' शिवछत्रपति ' (१९०५). ' मनश्चंद्रबोध कथारस ' (१९०५), ' पद्मपुराण ' इत्यादि विविध प्रकारची ग्रंथरचना त्यांचें नांव मराठी वाङ्मयांत अखंड चालवील यांत तिळप्राय संशय नाहीं. परंतु ज्यांच्या योगानें त्यांचें नांव सामान्य वाचकांसही परिचित झालें आहे असे त्यांचे ग्रंथ म्हणजे ते ' अधःपतन ' ' इंद्रभुवनगुहा ',* ' कालिकामूर्ति ', ' बंधुद्वेष ' ' मानसिक यातना ' व ' विलासमंदिर ', ' रहस्यभेद ', शापविमोचन ', ' शालिवाहनशक ' व ' प्रवालद्वीप ' हे होत

* फुली असलेल्या पुस्तकास डे. व्ह. ट्रा सोसायटीकडून बक्षिस मिळालें आहे.

निवड बरोबर न केल्यामुळें म्हणा किंवा भाषांतरदोषामुळें दातारांच्या प्रयत्नापूर्वी महाराष्ट्रियांस रेनाल्डच्या कादंबऱ्यांचा परिचय चांगलासा झाला नव्हता. या व अशा कादंबऱ्यांचा परिचय कादंबरीकलापाच्या द्वारें करून देण्याचा प्रयत्न शं. वा. मुजुमदार व श्री. मि. सरदेसाई यानीं केला होता. परंतु त्यांचा 'त्रिवेणीप्रमाथ' पुढें येतच महाराष्ट्रियांस रेनाल्डच्या कादंबऱ्यांचा बाऊ वाटावयास लागला व फार तर रेनाल्डच्या कादंबऱ्यांच्या आधारें लिहिलेलीं किरकोळ कथानकें विकृत स्वरूपांत कोठें कोठें दिसून येऊं लागलीं. रेनाल्डच्या कादंबऱ्यांचीं भाषांतरें व रूपांतरें पुष्कळांनीं केलीं; परंतु दातारांची सफाई कोणासही साधली नाहीं. दातारांचीं पुस्तकें रूपांतरित असूनही तीं मुळाइतकींच गोड लागतात. श्रीमंत अथवा सुखवस्तु कुटुंबांतील तरुण स्त्रीपुरुषांत दातारांच्या या कादंबऱ्यांची फार चहा आहे. अशा पुस्तकांच्या अभावीं या वर्गाच्या कादंबरी वाचनाची होणारी हडसाळ उत्कृष्ट रीतीनें दूर केल्याबद्दल श्रीयुत दातारांची तारीफ करावी तितकी थोडीच आहे,

* * * *

आतां इतरत्र काय चाललें आहे, इतर ठिकाणच्या कथावाङ्मयाची मजल कोठपर्यंत आली आहे हें थोडेसें पाहूं व नंतर मग पुन्हां पुण्यामुंबईकडे वळूं. पुण्यामुंबईनंतर खरें पाहूं गेल्यास आमच्या या गोष्टीच्या कादंबरींत वाईसाताराकरांचाच अनुक्रम येतो. वाईकरांच्या दलाचे प्रमुख अनंत केशव चितळे व नरहर नारायण पटव.

वर्धन हे होत. यांनीं अनुक्रमें ' कादंबरीकल्पद्रुम ' (सन १९०?) व ' मकरंद ' ( १९११ ) हीं केवळ कथावाङ्मयास वाहिलेलीं मासिकें काढून मराठी कथावाङ्मयाची दीर्घकाल व एकनिष्ठ सेवा केली आहे.

दत्तात्रय गणेश आगाशेकृत ' तेजचंद्र× ' व 'सांसारिक गूढ'; नारायण हरि आपटेकृत ' पिशाच्चसाधन ', दासकृत ' मालती ' व ' ततमुद्रा '; केशवकृत ' महामाया '; कृ गो. केळकरकृत 'शांता'; नारायण रामचंद्र गोखलेकृत ' इंदिरा '; चितळेकृत ' रामेश्वराचें भाक्तन ', राधाराणी ' व ' वीरेंद्रसिंह '; दामोदर रामचंद्र चिपळूणकरकृत ' दर्पदर्पण '; श्री ना ताडपत्रीकरकृत ' कालाची वक्र गति ' व ' प्रणयपत्रिका '; केशव कृष्ण दांडेकरकृत ' दिवाळखोरची पेढी ' व ' महाराणा जयदेव पवार '; दामोदरकृत ' कार्यकारणभाव ', ' कुकर्मपरिपाक ', ' लीलावती ', ' मायाविनी ' व ' रंक आणि राव '; समर्थशिष्यकृत ' कर्मयोगीप्रमदा ' ' श्वेतकेतू ', ' कुलोद्धार ' व ' प्रासादिक चिदानंद '; हर्षेकृत मोहिनी ' व बेबंदपुरींतील एक महिना '; भगवानदासकृत ' मयाची माया '; पटवर्धनकृत, ' जीवितयात्रा ' ' राणी चंद्रावती ' व ' इलासुंदरी '; ब्रम्हानंद सरस्वतिकृत ' विलासिनी'; वासुदेवकृत ' गणेश मिल ' व ' संन्यासी ', आणि बापू नरसिंह भावेकृत प्रतिज्ञापूर्ति ' व 'संसार'

---

× फुली असलेल्या पुस्तकास हे व्ह. ट्रा. सोसायटीकडून बक्षिस मिळालें आहे

इत्यादि सुमारें ४० कादंबऱ्या या वाईकर मंडळींनीं पुढें आणिल्या आहेत आणि त्याही अवघ्या पंधराबीस वर्षांत. यापैकीं बरींच पुस्तकें लोकप्रिय असून, कांहीं कादंबऱ्या तर त्यांचें समग्र वाचन झाल्यावांचून खालीं ठेववत नाहींत, इतक्या उत्तम आहेत. चितळे-कृत ' वीरेंद्रसिंह अथवा कटोराभर रक्त ' ही छोटी कादंबरी तरुण मंडळींस इतकी आवडते कीं, ती लहाणपणीं एकदां आमच्या मित्र-मंडळींत एका बैठकींत सबंध वाचून टाकल्याची आम्हांस चांगलें आठवतें.

वाईहून सातारा शहर लांब नाहीं. अवघ्या वीस मैलांच्या अंतरावर. परंतु यालाही वाईइतकेंच महत्त्व आलें आहे. कथावाङ्मयाचें येथील ठाणें एकाच पण बलवान् ठाणेदारानें असें संभाळलें आहे कीं, त्यास तोड नाहीं. श्रीयुत नारायण हरि आपटे हे वाई सातारकरांचे प्रमुख होत. नानासाहेबांचा बाणेदार स्वभाव, त्यांचें उच्च ध्येय, त्यांची पराकाष्ठेची निस्पृहता, इत्यादि गोष्टींचा परिचय आम्हांस प्रत्यक्ष असल्याकारणानें त्यांच्याविषयीं येथें कमी अधिक लिहिलेलें त्यांस खपणार नाहीं, हें आम्हांस माहीत आहे. परंतु आवश्यकतेनुसार त्यांच्या कामगिरीचा निर्देश करणें हेंही आम्हांस आमचें एक पवित्र कर्तव्यच वाटतें.

नानासाहेबांच्या लेखनास सुमारें सन १९०५ नंतर सुरुवात झालेली दिसते व त्यांचा ' अजिंक्य तारा ' (१९०५) कथावाङ्मयांत त्यांच्या अजिंक्यपणाविषयींचें प्रमाणपत्रच घेऊन निघाल्यासारखा

दिसतो. कारण तेव्हां उचललेली लेखणी यांनीं 'आनंदमंदिर', 'आफ्रिकेच्या जंगलांत', 'कपटजाल', 'कर्मगति', 'कल्पनाचित्र', 'भुरळ', 'पिशाच्चसाधन', 'दुरंगी दुनिया', 'मानवी आशा—विरुद्ध—देवाची इच्छा', 'लांच्छित चंद्रमा', 'लोकमित्र', 'रजपुतांचा भीष्म', 'वंदावें कीं निंदावें', 'समर्थशिष्य', 'सुखाचा मूलमंत्र', 'हृदयाची श्रीमंती', 'वैभवाच्या कोंदणांत', 'संधिकाल' व 'न पटणारी गोष्ट' इत्यादि अठरा वीस उत्तमोत्तम पुस्तकें लिहूनही अद्यापि खालीं ठेवली नाहीं आणि तीहि 'लोकमित्र' व 'किर्लोस्करखबर' यासारख्या मासिकांचे सहकारी संपादकत्व संभाळून.

नानासाहेबांच्या कादंबऱ्यांचे विषय किती विविध असून त्यांचें प्रतिपादन किती जोराचें व यथातथ्य असतें ही गोष्ट वरील पुस्तकांपैकीं दोन चार पुस्तकें वाचलीं असतां सहज कळून येण्यासारखी आहे नानासाहेबांचा कादंबऱ्यांच्या व त्यांच्या कामगिरीचा यथायोग परिचय करून देण्यास लवकरच एखादा लेखक पुढें येईल अशी अपेक्षा बाळगणें केव्हांही गैरवाजवी होणार नाहीं. परंतु तोंपर्यंत आमच्या या कादंबरीच्या गोष्टींत आम्हांस श्रीयुत नारायण हरि आपटे यांना 'झाले बहु होतिल बहु आहेतचि बहु परंतु या सम हा' या श्रेष्ठ कोटींतील कादंबरीकारांपैकीं एक स्थान खात्रीनें द्यावें लागतें.

साताऱ्यानंतर मध्यंतरीं कोठेंही न थांबतां आपणास एकदम गुजराथेंत जावें लागतें कारण कोणताही कॅटलॉग चाळून पहा,

मराठी ग्रंथप्रकाशनाचें कामीं मुंबई, पुणें, वांई व बडोदें या चार शहरांनींच विशेष हातभार लावल्यासारखा दिसतो मधून मधून कोठें धुळें, कोठें कोल्हापूर, तर कोठें खानापूर चमकतें परंतु याशिवाय जिकडे तिकडे शुकशुकाट आहे. धुळ्याचें मराठीसाहित्य एकमार्गी आहे. तर कोल्हापूरच्या ग्रंथाप्रकाशनास अलीकडे पुष्कळच ओहोटी लागलेली दिसते. खानापूर मात्र आपली जागा धरून आहे व याबद्दल तेथील लोकमित्राचे संपादक दत्तात्रय गोविंद सडेकर हे महाराष्ट्रीयांच्या सहानुभूतीस खात्रीनें लायक आहेत. ही जाग त्यांनीं बळकट धरून ठेवण्याचें श्रेय यांच्या ' लोकमित्र ' व तद्वारें प्रसिद्ध होणाऱ्या कथावाङ्मयास दिलें पाहिजे, हें सांगणें नकोच.

परंतु महाराष्ट्राबाहेर असून त्यांतील प्रमुख शहरांच्या बरोबरीनें त्यास प्रत्यादेश देणारें असें जर दुसरें एकादें शहर असेल तर तें बडोदें हें होय. बडोद्यानें केलेली मराठी वाङ्मयाची सेवा विपुल व वाखाणण्यासारखी आहे. त्याचें विस्तृत विवेचन, याच पुस्तकाच्या कर्त्यानें आपल्या ' बडोद्याचें मराठी साहित्य व साहित्यभक्त ' या पुस्तकांत केलेलें, जिज्ञासूंस पहावयास मिळेल. येथें आपणास बडोद्याच्या कथावाङ्मयाशीं कर्तव्य आहे; आणि या सदरांतही त्यानें आजपर्यंत सुमारें पंचवीस पुस्तकांची भर घातलेली दिसते. विष्णु धोंडदेव कर्वे यांची ' सती राणकदेवी, ' विष्णु सीताराम देव यांची ' विषवृक्ष, ' धनुर्धारी यांची ' वाईकर भटजी ', मांडेकृत ' माधवी कंकण ', शंकर विष्णु पुराणिककृत ' देवी सत्यभामा ', शिवराम गोविंद फाळके-

कृत ' दुर्गेशनंदिनी ', नागेश विनायक बापट यांची ' पानपतची मोहीम ', धोंडू जगन्नाथ भांगळे याची ' आनंदाश्रम ' व रामचंद्र अबाजी राजे यांची ' विलासिनी ' इत्यादि ' सहविचारिणी सभा व ग्रंथसंपादक व प्रसारक मंडळीच्या द्वारें प्रसिद्ध झालेल्या बडोदें-करांच्या कादंबऱ्या लोकप्रिय आहेत; परंतु तेथेंही कै. श्री. चिंतामण नारायण मुजुमदार यांच्याशिवाय अलीकडे कादंबरीलेखनांत कोणी विशेषसें लक्ष घातल्यासारखें दिसत नाहीं श्री. मुजुमदारांनीं मात्र ' गुजराथचा समशेर बहाद्दर ' व ' राणा हमीर ' इत्यादि दोन तीन ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. येथील ' सहविचार ' द्वै-मासिकाचे संपादकद्वय चटकदार गोष्टी लिहिण्यांत कुशल आहेत. परंतु ते कादंबरीलेखनांत लक्ष घालतील तेव्हां रा. वि. स. वाकसकर यांचें कांहीं दिवसापूर्वी मुंबईच्या प्रफुल्लतेंत ' थ्रीमस्केटियर्स ' चें रूपांतर येत असे; परंतु तें पुस्तकरूपानें उपलब्ध असल्याचें आम्हास माहीत नाहीं.

# प्रकरण ८ वें.

## नंतरचा मागोवा.

काय कारण असेल तें असो; आमच्या वाङ्मयविषयक चळवळीस सन १९१५ सालीं जशी भरती आली होती तशी तत्पूर्वी व तदनंतर केव्हांही आलेली दिसून येत नाहीं. या भरतीचीं तशीं चिन्हें तर सन १९१०-११ पासूनच दिसून येत होतीं; पण स. १९१५ सालीं तर तिची हद्द झाली. वर्षा दोन वर्षांतच हिला ओहोटी लागली व हल्लीं तर तिचा मागमूसही दिसत नाहीं; परंतु या सालीं ती आली होती हें खास वाङ्मयाच्या इतर शाखांचा विचार जरी बाजूस ठेवला, तरी मराठी कथावाङ्मयाची या सालांतील चलती ध्यानात ठेवण्यास रखी आहे. या सालीं कथावाङ्मयविषयक साप्ताहिकांत 'आल्हाद' व 'करमणूक' आणि मासिकांत 'उद्यान', 'चित्रमयजगत', 'नवयुग', 'प्रभात', प्रेमोद्यान', 'मकरंद', 'मधुकर', 'लोकमित्र' 'सुधाकर' व हास्यविनोद' इत्यादि नियतकालिकें जोरानें चालत असलेलीं दिसतात. तसेंच 'एक आणा माला', 'कुटुंबशिक्षणमाला', 'गुणागोविंद पुस्तकमाला', 'चित्तविनोदमाला', भारतगौरवग्रंथमाला', 'सरसवाङ्मयरत्नमाला' व 'सुरसग्रंथमाला' इत्यादि कथावाङ्मयविषयक स्वतंत्र कथाग्रंथमालांचा प्रचारही याच एक दोन सालांत

विशेष झाला होता, असें म्हणावें लागतें. बरेच दिवस स्तब्ध बसलेले ' महाराष्ट्रभाषाचित्रमयूर ' या नव्या मन्वंतरांत फिरून एकदां जागे होऊन ' कलमबहादुरांस शेलापागोटें ' अर्पण करतांना दिसतात, तर श्रीयुत आजगांवकरांनी याच समयीं ' ज्ञानांजनाचे ' कांहीं वळसे उगाळल्याचें दिसतें. एवंच, साप्ताहिकें, पाक्षिकें, मासिकें, त्रैमासिकें, ग्रंथावल्या व ग्रंथमाला यांची सन १९१५ सालीं लयलूट झाली होती, आणि नियतकालिकांचीही रेलचेलच जणू प्रस्तुत लेखकास त्यांची ' दीपिका ' तयार करण्याची स्फूर्ति होण्यास कारणीभूत होऊन ती त्यानें याच सालीं प्रसिद्ध केल्याचें आम्हांस चांगलें आठवतें. अस्तु.

ही लाट फार दिवस टिकली नाहीं तरी ती मराठी वाङ्मयास अपकारक झाली असें म्हणण्याचें कारण आम्हांस दिसत नाहीं. ती आपलें काम खात्रीनें करून गेली. कारण कथावाङ्मयाच्या भवितव्याविषयीं हीहि वेळ अशीच नाजुक होती. यावेळीं मराठी वाङ्मय क्षेत्राकडे—विशेषतः कथावाङ्मय भागाकडे पहावें तों त्याच्यांत निराळेंच स्थित्यंतर झालेलें दिसून येतें. या भागांतील कांहीं वीर अंतर्धान पावले होते तर कांहीं विश्रांति घेण्याच्या विचारांत होते, आणि कांहीं जण सकारण तर कांहीं जण विनाकारण आपलें अंग या कार्यांतून काढून घेत होते. उदाहरणार्थ, धनुर्धारीप्रभृति दिवंगत झाले होते. किरातांच्या शरसंधानाचा कथावाङ्मयास उपयोग होत नव्हता. वि. कों. ओक थकले होते आणि हरिभाऊंचें

लेखन आपला उत्तर काल गाठीत होतें. रा. सीताराम केशव दामले आपलें दप्तर आटोपीत होते, तर रा. चिंतामणराव वैद्य यांनीं 'दुर्दैवी रंगू' ( १९१४ ) नंतर कादंबरीलेखनासाठीं आपली लेखणी कधींच उचलली नाहीं. या वेळीं या क्षेत्रावर प्रामुख्यानें झळकणारे वीर म्हणजे ते श्रीयुत नाथमाधव, वासुदेव गोविंद आपटे, विठ्ठल सीताराम गुर्जर, गोविंद नारायण दातार व नारायण हरि आपटे हे होत पैकीं वा. गो. आपटे यांनींही आपलें लक्ष पुढें केवळ बालवाङ्मयाकडे परंतु पूर्ण रीतीनें वळविलें.

परंतु उपरिनिर्दिष्ट सन १९१५ साल कालीन खळबळींतून जसे कित्येक कवि, कित्येक नाटककार तसेंच कित्येक कादंबरीकार व कथावाङ्मयप्रणेतेही उदयास आले व रिकाम्या पडत चाललेल्या जागा भरून निघूं लागल्या.

श्रीयुत वालचंद रामचंद कोठारी, तात्या नेमिनाथ, पांगळ प्रभाकर श्रीपत भसे वालचंद नानचंद शहा, सौ. जानकीबाई देसाई, दत्तात्रय भिमाजी रणदिवे, भाऊ श्रीधर कुलकर्णी, दत्तात्रय माधवराव कुळकर्णी, नारायण गोविंद पेशवे, भिकाजी गोपाळ भिडे, कृष्ण महादेव चिपळूणकर, नारायण केशव बेहरे, द. वि. परांजपे व खं. भि. कोराने इत्यादि पंधरावीस कथावाङ्मयप्रणेते याच उसळीसरसे पुढें आले.

या सर्व ग्रंथकारांचा प्रामाणिक प्रयत्न या कालीन मराठी कथावाङ्मयचा परिपोष होण्यास ठीकच कारणीभूत झाला. परंतु ज्यानें या कालास क्रांतिकारक कादंबरीनें गौरविलें असा एक, व ज्यांनीं

तसें गौरविलें इतकेंच नव्हे, तर अखिल महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणास चटका लावून सोडला असे दोन उत्कृष्ट कादंबरीकार महाराष्ट्र-वाङ्मयक्षितिजावर या वेळीं चमकून या काळाविषयीं आपणास आदर व खेद करावयास लावतात. ते कादंबरीकार म्हणजे अनुक्रमें रा. वामन मल्हार जोशी, आणि प वा. गणेश विठ्ठल कुलकर्णी व ' सहकारीकृष्ण ' हे होत. श्रीयुत वामन मल्हार जोशी यांनीं ' आश्रमहरिणी ' *' नलिनी ' वगैरे दुसरींही एक दोन गोष्टीचीं पुस्तक लिहिलीं आहेत; परंतु मराठी कादंबरीकारां या पहिल्या श्रेणींत त्यांना नेऊन बसविणारें त्याचें पुस्तक म्हणज ' *रागिणी ' हें होय. या कादंबरीचें ' रागिणी ' ह नुस्त नांव देखील तिच्याकडे कित्येकांस अनुरागपूर्वक पहावयास लावते. मग तिच्याकडे प्रत्यक्ष अवलोकन करणारा वाचक तिच्या . सुडौल अवयवांनीं व तिच्या निर्विकार परंतु मनोहर नेत्रकटाक्षांनीं केवळ मोहित होऊन जात असेल यांत आश्चर्य काय ? आपल्या सर्वांगसौंदर्यामुळें तिनें स्वतः तर आपलीं पाउलें मराठी कथावाङ्मयावर स्पष्ट उठविलींच; परंतु त्याबरोबरच ' रागिणीनें ' महाराष्ट्रियांस आपल्या जनकाकडेही सदैव सादर पहावयास लाविलें.

श्रीयुत गणेश विठ्ठल कुलकर्णी हे निराळ्या वळणाचे व निराळ्या बाण्याचे गृहस्थ होते. यांना कादंबरीलेखनेच्छा तृप्त करण्यासाठीं प. आगरकरनींच घेतलेला अवतार म्हणतां येईल. समाजहिताविषयीं तीच कळकळ, धार्मिक अन्यायाविषयींचा तोच

निटकारा व विषयप्रतिपादन तितकेंच जोराचें जर कोणास पहावयाचें असेल तर त्यानें ग. वि. कुळकर्णीकृत 'कर्मसंन्यास', 'कुसुंबा,' 'जन्मठेप!' 'चंद्रचूड', 'योगायोग' व 'हा संशयाचा प्रताप' ह्या कादंबऱ्या अवश्य वाचून पहाव्या. यांच्या अकालनिधनानें मराठी कथावाङ्मयाचें झालेलें नुकसान भरून येणें अशक्य जरी नाहीं तरी दुरापास्त आहे.

आतां राहिले आपले 'सहकारीकृष्ण.' शिव शिव राहिले कसचे? त्यांनीं तर कुळकर्ण्यांपूर्वींच देवलोकीं प्रयाण केलें! सन १९१५ साल कालीन खळबळींतून निघालेल्या दैदिप्यमान् रत्नांचीं एखादी मालिका तयार केली तर 'सहकारीकृष्ण' हे त्या मालिकेचे मेरुमणि खात्रीनें शोभतील. आणि तेंही त्यांच्या 'शापित महाराष्ट्र' या एकाच कादंबरीनें कृष्णाजी अनंत एकबोटे ऊर्फ 'सहकारीकृष्ण' यांचा जन्म ता २१ मे सन १८८० सालीं झाला कृष्णरावांची घरची स्थिति फारच गरीबीची होती. त्यांचें प्राथमिक शिक्षण नूतन मराठी विद्यालय व न्यू इंग्लिश स्कूलमध्यें झालें. पण महाराष्ट्राच्या सुदैवानें त्यांना इंग्रजी दुसऱ्या इयत्तेंत आल्यापासून इतिहासवाचनाची गोडी का न लागावी? आधींच इतिहासग्रंथ हाताच्या बोटावर मोजण्याइतके व इकडे वाचनाची हाव तर दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत चाललेली. मग काय? नाटकें, कादंबऱ्या वगैरे बरींवाईट दिसतील तीं पुस्तकें त्यांनीं वाचून टाकलीं. असल्या अव्यवस्थित वाचना-

बद्दल त्यांना नंतर हळहळच वाटत असे. परंतु नंतर तसें वाटून उपयोग काय ?

आपल्यांतील जीं थोडीं फार माणसें मोठेपणास चढलीं आहेत, तीं शिक्षणसंस्थांतील उत्तेजनामुळें मुळींच नसून निव्वळ बाह्य परिस्थितींत होणाऱ्या घडामोडी व तसेंच स्वावलंबनानें चढलीं आहेत आपल्य सहकारीकृष्णांच्या बाबतींत पाहिलें तरी हेंच प्रत्ययास येतें. त्यांना वाचनाचा नाद सहज लागला व तो पुढें बळावतच गेला म्हणून बरें ! नाहीं तर मध्यमस्थितीत कसेबसे दिवस कंठणाऱ्या कुटुंबांतील जसेच्या तसे बोल त्यांच्या प्रतिभाशाली लेखणीतून उतरलेले ऐकावयास कधींच सापडले नसते. इंग्रजी चौथ्या इयत्तेंत गेल्यापासून हीं इंग्रजी पुस्तकें वाचा तीं वाचा, असा सारखा त्यांचा क्रम चालू होता. मात्र या वाचनामुळें व अभ्यासांत वरचेवर खो आणणाऱ्या क्रिकेटच्या नादामुळें यांचें शाळेंतील अभ्यासकडे लक्ष राहिलें नाहीं तें नाहींच—इकडे मुलगा मोठमोठीं पुस्तकें वाचतो आहे, मग तीं अभ्यासाचींच असलीं पाहिजेत असें आपल्या मनाशींच समाधान मानून त्यांचे वडीलही स्वस्थ होते. पुढें इतिहास व इंग्रजी या दोन विषयांत पास होत गेल्याकारणानें ढकलत ढकलत ते सातव्या इयत्तेंत तर येऊन पोहोंचले पण थॅकरे, डिकन्स, लिटन् शेक्सपीअर वगैरे नामांकित लेखकांचे ग्रंथ वाचण्यांत वेळेचा दुरुपयोग ( अर्थात् तो जगाच्या म्हणजे व्यवहारा या दृष्टीनें ) करून, आपण सगळा स्कॉट वाचला आहे, व हेनरीवुडच्या २७ कादंबऱ्या

वाचल्या आहेत अशा अभिमानांत गर्क होऊन गेल्यामुळें त्यांची परिक्षेच्या अभ्यासाची कितीशी तयारी होणार? शिवाय ' नाहीं परिक्षा पास झाली नाहीं, निदान आपण नामंकित ग्रंथकार तरी होऊं, दारिद्र्याची काय बिशाद आहे, त्याच्याचमुळें तर कित्येक लेखक विशेष प्रसिद्धीस आले.' अशा प्रकारचे भावी प्रसंग कल्पना-सृष्टींत रेंखाटण्यांत स्वारी गर्क झालेली! मग कशाची परीक्षा आणि काय! युनिव्हर्सिटीच्या मंडपांत थॅकरे, डिकन्स यांचा वशिला न पटल्यामुळें प्रथम तर त्यांना हात हालवीतच परत यावें लागलें. दुसऱ्या खेपेसही परीक्षा न उतरल्यामुळें वडिलाकडून आणि तोंही त्यांच्या पत्नी देखत दुःसह बोलणीं सुरू झाल्यामुळें "पुष्कळ नामांकित ग्रंथकार भिकारीच होते! पैशाची काय पत्रास आहे!" ही समजूत बाजूस सारून त्यांना अभ्यासांत लक्ष घालावें लागलें तिसऱ्या खेपेला मात्र ते मॅट्रिक व स्कूल फायनल या दोन्ही परिक्षांत पास झाले.

आतां काय परिक्षा झाली, आपल्याला हां हां म्हणतां नोकरी मिळेल, मग आपल्याला बोलण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. अशा ऐटीनें जिकडे तिकडे अर्जांची फेंकाफेंकी करून उत्तरांची वाट पाहण्यांत कांहीं काल गेल्यावर, कृष्णरावांनीं 'कारकुनी नाहीं तर मास्तरकी' या उदरंभरणाच्या सक्तीच्या नियमाला अनुसरून नूतन मराठी विद्यालयांत शिक्षकाचें काम केलें. पुढें शाळेंतील नोकरी सोडून ते मुंबईच्या सॉर्टिंग खात्यांत काम करूं लागले. तेथें 'क्या गद्धेके माफक काम करता है!'

थवा ' फेक देवतेरा थॅकरे और डिकन्स !' अशा प्रकारचीं हेड सॉर्टरचीं बोलणीं ऐकत ते सरकारी नोकरी तर करूं लागले. परंतु ही दगदगीची नोकरी त्यांच्या प्रकृतीला मानवली नाहीं, म्हणून ती सोडून देऊन, प्रथम सॅनिटरी कमिशनरच्या कचेरींत व तेथून सेशन कोर्टांत रायटरचें काम करण्यात त्यांनीं कांहीं दिवस घालविले. नंतर बऱ्याच कचेऱ्यांचे उंबरठे झिजविल्यानंतर त्यांना पुणें येथील डि. पोलिस सुपरिंटेंडेंटच्या कचेरींत पंधरा रुपयांची नोकरी लागली. पंधराचे वीस, वीसचे पंचवीस; संपलें कारण त्यांच्या मानी स्वभावाला कोणापुढें दांत विचकण्याचें मुळींच खपत नसल्यामुळें व कानांनीं बरेंच कमी ऐकूं येत असल्यामुळें, त्यांना कामाच्या भाराखालीं व प्लेगच्या दिवसांत मरायचेंच झालें तर निदान एक दोन दिवस औषधपाण्याला व स्वतःच्या प्रेतसंस्काराला जेमतेम पुरे इतक्या या दरमहीं पंचवीस रुपये तनख्यातच मरेपर्यंत खितपावें लागलें ! कृष्णरावांचें संसारसुख ' मरशील तर सुटशील बाबा ' अशा अंतःकरणाच्या विव्हळण्यानेंच भरलेलें होतें ! नाहीं म्हणावयाला कृष्णरावांच्या स्नेह्यांनीं मात्र त्यांना वरचेवर शक्य ती मदत मोठ्या भक्तीनें केली. एवढीच काय ती त्यांना समाधान मानावयाला जागा होती स्वभावानें अत्यंत सरळ व प्रामाणिक, दुसऱ्याला मदत करण्याच्या बाबतींत नेहमीं तत्पर व देशाच्या उत्कर्षाची सारखी तळमळ या अमोलिक गुणांवर कोणाची बरें भक्ति बसणार नाहीं ? कृष्णरावांना देशाची तळमळ किती होती, याची थोडी फार जाणीव ज्यांनीं त्यांनी त्यांचा विविध विषयावरील पुस्तकांनीं व मासिकांनीं भरलेला ग्रंथ-

संग्रह पाहिला असेल, व जे जे पाहतील त्यांनाच फक्त होईल मध्यम स्थितींत रखडणाऱ्या प्राण्यांना आपला संसार कसा सुखाचा करतां येईल, हा प्रश्न ज्यांत निरनिराळ्या बाजूंनीं थोडा फार सोडविला आहे अ ीं मासिकें व पुस्तकें—स्वतःच्या कुटुंबाला अर्धपोटीं व फाटक्या तुटक्या चिंध्यात ठेवून, विकत घेऊन नीं वाचण्यांत व त्यांतील उपयुक्त तत्त्वें लहान लहान पुस्तकांच्या द्वारें आपल्या महाराष्ट्रियांच्या अंतःकरणांत बिंबवून देण्यांत त्यांनीं रात्रीचा दिवस केला. हें सर्व कशाकरितां व कोणाकरितां? अर्थात् आपणाकरितां व कृष्णरावांना देशाची कळकळ होती म्हणूनच.

सन १९१३ पासून 'ही प्रेमाची मूस कां पुरुषार्थाची कूस?' 'माझी कहाणी' 'हा संसार कीं नरकवास,' 'आत्मोद्धार,' 'देहस्वभाव' 'संक्रांत,' 'शिकली पण चीज केलें,' 'आधुनिक स्वयंवर,' 'मानापमान,' 'अपमानाचा मान' व त्याचप्रमाणें संकट कीं सौभाग्य' 'खुनाचा आरोप,' 'चैत्राचा महिना,' 'वर्षारंभ' व अखेरचा स्वार्थत्यागी देशस्थ,' इत्यादि विविध मनोवृत्तींच्या सुवासांनीं व रंगांनीं नटलेलीं पुष्पें आपल्याला अर्पण करण्याचा कृष्णरावांनीं—या स्वार्थत्यागी देशस्थानें—उगीचच कां अट्टाहास केला? कोणाला त्यांचीं कथानकें आवडणार नाहींत, तर कोणाला त्यांची भाषापद्धति व कांहीं कहीं विचार रुचणार नाहींत. पण त्यांचें अंतःकरण अधोगतीला थोपवून उत्तेजन देऊन सन्मार्गाला लावणारें व 'शापित महाराष्ट्राला' परमेश्वराच्या चरणाजवळ एकीचा, स्वाभि-

मानाचा व कर्तव्यजागृतीचा निरंतर उःशाप मागणारें त्यांचें अंतःकरण अखिल महाराष्ट्रास खात्रीनें आवडेल. श्रीमंतीगरीबीचा झगडा, सहकारित्व, स्त्रीशिक्षण वगैरे सामान्य जनांना सहसा न कळणारे विषय गोष्टीच्या रूपानें व तेहि आपल्या समाजाच्या अंतरंगांत शिरून किती कुशलतेनें व मार्मिकपणें रेखाटले आहेत हें त्यांचीं पुस्तकें वाचणारांना सहज कळून येईल. ' कै विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं सुशिक्षितांत जो आपलेपणा जागृत केला, तशाच प्रकारच्या आपलेपणा रात्रंदिवस ठेचाळणाऱ्या अल्पशिक्षितांत सहकारीकृष्णांनीं जागृत केला " असें जें कृष्णरावांविषयीं ' दिवाकरानें ' आपल्या मृत्युलेखांत लिहिलें आहे तें सर्वस्वीं अन्वर्थक वाटतें. या श्रेष्ट पुरुषाच्या आत्म्यानें ' देवा ! महाराष्ट्रांतील कर्तव्यतत्पर तरुणांचा अकालीं संहार करूं नकोस ' ' असा परमेश्वराजवळ उःशाप मागण्याकरितांच कीं काय, गुरुवार ता. २३ नोव्हेंबर सन १९१६ रोजीं देवलोकीं प्रयाण केलें !

शापित महाराष्ट्राविषयीं लिहितांना श्रीयुत न. चिं. केळकर लिहितात कीं, " नांवाखेरीज ऐतिहासिक असें दुसरें कांहींच न ठेवतां लिहिलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्या आज मराठी वाङ्मयांत आहेत, तसेच त्याच्या उलट पुष्कळसा इतिहास व काल्पनिक रचना थोडी, अशाहि कादंबऱ्या आहेत. पण त्यांतल्या त्यांत मला पहिल्या प्रकारापेक्षां दुसराच प्रकार अधिक संमत वाटतो. या प्रकारचें एक ठळक उदाहरण रा. ब. चिंतामणराव वैद्य यांचीं " दुर्दैवी रंगू "

ही कादंबरी होय. प्रस्तुत सहकारीकृष्ण यांनीं लिहिलेली शापित महाराष्ट्र ही कादंबरी याच प्रकारचें नांव घेण्यासारखें आणखी एक उदाहरण होईल असें मला वाटतें. या कादंबरींत संभाजमिहाराजांचा वध, त्यानंतर राजाराम महाराजांचा जिंजीवास व त्यांचें महाराष्ट्रांत प्रत्यागमन एवढा कथाभाग आहे....या कादंबरींतलि पुष्कळच भाग चटकदार आहे. परंतु कांहीं काल्पनिक प्रसंग आणि संभाषणाची व वर्णनाची द्रव वगळली असतां... ऐतिहासिक माहिती परोपरीनें सांगण्याचा व सहजपणें ती मनावर ठसवून दण्याचा ' सहकारी कृष्ण ' यांचा प्रयत्न मला विशेष अभिनंदनीय वाटतो .......

" सहकारी कृष्ण ' यांनीं संभाजी व राजाराम यांच्या वेळची स्थिति तत्कालीन कागदपत्रावरून रेखाटण्याचा प्रयत्न केला असल्यामुळें तिच्या वर्णनांत भाषापद्धतीशिवाय आधुनिक असें फारसें कांहीं आलेलें नाहीं. त्या वेळचे धार्मिक सांप्रदाय, दानें, देणग्या, इनामें, राज्यव्यवहारपद्धति, धर्मभोळेपणा, युद्धपद्धति, शस्त्रास्त्रांची सामुग्री वगैरे माहिती होतां होईल तों सप्रमाण दिलेली असल्यामुळें वाचकांस कादंबरी वाचतां वाचताच अनेक प्रकारच्या ऐतिहासिक गोष्टींची माहिती नकळत सहजासहजीं होऊन जाण्यासारखी आहे व हाच प्रस्तुत कादंबरींतील विशेष गुण आहे असें मला वाटतें. संभाजी, येसूबाई, राजाराम, ताराबाई, धनाजी, प्रल्हादपंत, रामचंद्रपंत वगैरे प्रमुख पात्रें ऐतिहासिक आहेतच; पण खंडोजी, भोलानाथ, सूर्याजी, रूपाजी, पदाजी, विठोजी चव्हाण, बहिरजी, गणोजी शिर्के, राज-

कुंवर वगैरे दुय्यम प्रतीचीं ऐतिहासिक पात्रें वरींच पुढें आणून त्यांच्या ऐतिहासिक चरित्र्याचा परिचय वाचकांस प्रथम करून दिला आहे, हाही फायदा महत्त्वाचा होय. कादंबरींतील सर्व स्थळें ऐतिहासिक व खरीं असून ग्रंथकारानें स्थलवर्णनावर घेतलेली मेहनत ऐतिहासिक भूगोलाच्या दृष्टीनें फार उपयुक्त आहे. ' शिष्टाईची सिद्धता,' दिव्य आत्मार्पण,' ' रायगडचा वेढा ' वगैरे प्रकरणें ऐतिहासिक दृष्टया खरीं असून चटकदार वाटतात. केसरीनेंही त्यांच्या शोचनीय मृत्यूबद्दल लेख लिहून " यांच्यासारखे मर्मज्ञ वाचक व लेखक विरळा ! यांनीं ' शापित महाराष्ट्र ' ही पहिली मोठी ऐतिहासिक कादंबरी लिहिली आहे. यांचा हा व्यवसाय आणखीं कांहीं वर्षे असाच चालता तर मराठी भाषेंत ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणारे हे ' सर वाल्टर स्कॉट ' बनले असते ! ' असे धन्योद्गार काढले आहेत.

आतां सन १९१५ ते १९२५ पर्यंतच्या परिस्थितीचें थोडेसें पर्यालोचन करूं म्हणजे झालें.

हीं दहा वर्षेंही मराठी कथावाङ्मयानें फुकट घालविलीं असें नाहीं. या कालीन कथावाङ्मयावरही विशिष्ट प्रकारच्या कादंबऱ्यांची व कादंबरीकारांचीं पाउलें स्पष्ट उमटलेलीं दिसूं शकतील. थोडेसें पुढें या. फार नाहीं. अवघीं चार पांच वर्षें. सन १९२० साल उलटा कीं, आपणास निराळाच प्रकार दिसून येतो ' करमणुकीची ' जागा ' प्रफुल्लतेनें ' घेतलेली दिसते. सरस–सुरसप्रभृति कथाग्रंथमाला पहिल्याच जोमानें चाललेल्या दिसतात. नाथमाधव, ना. ह. आपटे,

सौ. जानकीबाई देसाई व द. मि. रणदिवे इत्यादि मंडळी कादं-बऱ्यांवर कादंबऱ्या जणूं फेकीत असतात व गो. ना. दातार यानीं आपली जागा संभाळलेली असते. या वेळीं गुर्जरांची ‘ देवता ’ अग्रपूजेचा मान मिरवित होती व आपटे यांचा ‘ सुखाचा मूलमंत्र ’ लोकांच्या तोंडचा विषय झाला होता.

तोंच आणखी एक गोष्ट होते. प्रि गोविंद चिमणाजी भाटे ‘ प्रेम कीं लौकिक ’ लिहितात व आपल्या विद्वत्तेच्या लौकिकांत एका सुंदर कांदबरीकर्त्याच्या लौकिकाची भर टाकतात. प्रि. भाट्यांना ही स्फूर्ति कदाचित् रा. कर्व्यांच्या आत्मचरित्रापासून झाली असण्याचा संभव आहे. परंतु पाहिजे तो मसाला पडल्यामुळें भाट्यांचें पुस्तक कादंबरी सदरांत पडलें आहे हें खास.

श्रीयुत कृष्णाजी आठल्ये प्रो. चिंतामण गंगाधर भानु व श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर इ. जुने रथी अनुक्रमें ‘ श्वेतांबरी ’, ‘ शृंगेरीची लक्ष्मी ’, ‘ दुटप्पी कीं दुहेरी ’व शामसुंदर लिहून या भागावर याच वेळीं उपस्थित होतात व डॉ. केतकरही त्यांच्या ‘ गोंडवनांतील प्रियंवदे ’चा परिचय आपणास याच सुमारास करून देतात.

परंतु खरी मौज शेवटीं श्रीयुत गद्र्यांच्या मौजेनें करून दिली. मौजेच्या ‘ अंधरांतील गोष्टी ’ अथवा ‘ पठणांच्या लीला ’ कितीही रसभरित असल्या तरी त्यांच्या वाचनाची शिफारस आम्हीं सहसा करणार नाहीं. परंतु एका मौजेचे कादंबरीकाराची तिनें जोड करून दिल्यामुळें मराठी कथावाङमय मौजेची नेहमीं आठवण ठेवील.

नाटककारांत ' विनोद—करमणूक ' कर्ते रा. जोशी यांस जें स्थान द्यावें लागतें तेंच स्थान कादंबरीकारांत श्रीयुत हडप यांना दिल्याखेरीज आमच्यानें राहवत नाहीं. कारण त्यांच्या ' बहकलेल्या निवळलेल्या तरुणीस ' न कें मुरडणारे जसे कांहीं वाचक आमच्या पाहण्य त आहेत तसेच या तरुणीद्वयांचा नूपुरध्वनि कानीं पडतांच तन्मय होणारे कांहीं वाचकही आम्हीं हात धरून दाखवूं शकतों आणि म्हणूनच ज्या एका विशिष्ट वर्गाच्या कादंबरीवाचनाची तहान आतांपर्यंत इतर कादंबरीकारांनीं उपेक्षिली होती ती श्रीयुत हडप फार मार्मिकपणें भागवीत आहेत, असें आम्हांस निःसंशय म्हणावें लागतें.

सन १९२४–२५ साल काढून अथवा तदनंतरच्या कथा-वाङ्मयाची चर्चा करणें आतांच बरोबर दिसत नाहीं. बरींच पुस्तकें व त्यांचे कर्ते पुष्कळांस अद्यापि अपरिचित आहेत. श्रीयुत परांजपेकृत ' विंध्याचल ' याच वर्षी पुस्तकरूपानें पुढें आली आहे. शृंगेरीची लक्ष्मी पुष्कळ लोकांस माहीत नाहीं तर ' गोंडवनांतील प्रियंवदा ' अद्यापि परीक्षिली व निरीक्षिली जात आहे तरी पण वारा निराळ्याच दिशेनें वाहूं लागला आहे असें कथावाङ्मयाचें वातावरण खात्रीनें सांगतें. ' मजूर ', ' कुलाब्याची दांडी ', ' कुठें ? ' ' मला काय त्याचें ? ' इ. पुस्तकें या निराळ्या दिशेच्या वाऱ्याची पहिली झुळूक समजावी लागते व सन १८३८ ते सन १९२५ पर्यंतच्या कथावाङ्मयाचें पर्यालोचन केलेल्या हातास येथेंच थकवा येऊन या नव्या झुळुकेबरोबरच त्याची लेखणी विश्रांति घेते.

## प्रकरण ९ वें.

### स्त्री व बालवाङ्मय

स्त्रीवाङ्मय म्हणजे स्त्रियांकडून निर्माण होणारें अथवा स्त्रियोपयोगी वाङ्मय. पहिल्या प्रकारांत कर्तृस्थानीं स्त्रीचें नांव धारण करणारें प्रत्येक पुस्तक दाखल करतां येतें तर दुसऱ्या प्रकारांत पुरुषांकडून लिहिले गेलेल्या वाङ्मयाचाही समावेश होऊं शकतो. आपण दोन्ही प्रकाराविषयीं थोडा थोडा विचार करूं.

परंतु आपणास येथें कर्तव्य आहे कथावाङ्मयाशीं यामुळें या उभयविध प्रकाराचा विचार आपण कथावाङ्मयापुरताच मर्यादित करूं.

आपल्या स्त्रीनिर्मित कथावाङ्मयास सन १८७३ सालापासून सुरुवात झाली असें आपणास मराठी स्त्रीलेखकांची सूची ' सांगते. या सालीं साळूबाई तांबळेकर या महाराष्ट्र महिलेनें ' चंद्रप्रभाविरहवर्णन ' लिहून स्त्रियांच्यातर्फे मराठी कथावाङ्मयांत पहिलें पाऊल ठेवलें व तेव्हांपासून तों आतांपर्यंत या समाजाकडून आपणास सुमारें तीस कादंबऱ्या व गोष्टींचीं पुस्तकें मिळालीं आहेत.

ही संख्या फार थोडी वाटते परंतु तसें नाहीं, ती पुष्कळ मोठी आहे. कारण हें पुस्तक जमेस धरलें तरच महाराष्ट्र स्त्रियांची कामगिरी आपणास सन १८७३ पर्यंत ढकलतां येते. नाहीं तर सन १८९० पर्यंत एकही महाराष्ट्रमहिला या शाखेंत आपणापुढें

येत नाहीं. त्यानंतर मात्र येतात आणि त्यानंतरच काय तो त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीस प्रारंभ होतो.

हा काल हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरी लेखनारंभाचा होय. जशी वाचनाची तशी लेखनाचीही गोडी महाराष्ट्र स्त्रीसमाजांत पहिल्यानें हरिभाऊ आपटे यांनींच लावली ही गोष्ट, सौ. कानिटकर यांची 'रंगराव' ही कादंबरी हरिभाऊंच्या माजी 'मनोरंजन व निबंधचंद्रिके'त क्रमशः येत असे या एकाच उदाहरणावरून आपणास स्पष्ट दिसून येण्यासारखी आहे. सौ. कानिटकरांपूर्वीं जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत तीं गोदावरीबाई पंडितकृत 'प्रीतीचा मोबदला' (१८९०), मिस मेरी भोरकृत 'पुष्पकरंडक' (१८९०) व काशीबाई देसाईकृत 'आईची मालिनी' हीं तीन पुस्तकें होत. परंतु अभिजात ग्रंथरचनेस सौ. कानिटकरांच्या रंगरावापसूनच सुरुवात होते आणि 'रंगराव' (१९०३) या ठळक पुस्तकावरून पाहतां कथावाङ्मयांतील स्त्रियांची कामगिरी आजमित्तीस सुमारें पंचवीस वर्षांची जुनी दिसते.

पंचवीस वर्षांत तीस कथावाङ्मयग्रंथ तयार होणें हेंही आम्हांस आश्चर्यकारक व अभिमानास्पद वाटतें. कारण हिन्दी स्त्रीशिक्षणाचें मंद पाऊल, हिन्दी स्त्रीसमाजाशीं हिन्दी पुरुषसमाजाचें असणारें करडें वर्तन, त्यांचें परावलंबित्व, त्यांचें बालविवाहनिबद्धत्व इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्यास आमच्या महाराष्ट्र स्त्रीसमाजाच्या या अल्पशा कामगिरीचेंही आम्हांस भूषण वाटतें.

कथावाङ्मय निष्पत्तींत करमणुकी खालोखाल मनोरंजनाचा कसा अनुक्रम येतो हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे परंतु ती स्त्रियांकडून करविण्याच्या बाबतींतही ' मनोरंजन ' आपली जागा सोडीत नाहीं ही गोष्ट कै. का र. मित्र यांना खरोखरच भूषणावह आहे. कारण आपल्यांच्या प्रोत्साहनानें जसे सौ. कानिटकरप्रभृतींचें, तसें मित्रांच्या प्रोत्साहनामुळें सौ. काशीबाई हेर्लेकरप्रभृति विदुषींचे प्रयत्न सफल झाले. सौ. हेर्लेकर यांच्या संसारांतल्या गोष्टीं ' नीं हल्लीं तिसरी आवृत्ति पाहिली आहे, ही एकच गोष्ट त्या पुस्तकाचा चांगुलपणा दाखविण्यास पुरे आहे.

याच सुमारास पुढें येणारी दुसरी महाराष्ट्रमहिला म्हणजे त्या सौ. गिरिजाबाई केळकर ह्या होत यांनीं ' गृहिणीभूषण ', ' स्त्रियांचा स्वर्ग ' व ' पुरुषांचें बंड ' इत्यादि वाङ्मयाच्या निरराळ्या भागांत फिरून अलीकडे ' मुलांचें बंड ' ही कादंबरी व ' समाजचित्रे ' नामक एक गोष्टींचें पुस्तकही प्रसिद्ध केलें आहे.

यानंतर हिराबाई पेडणेकरकृत ' सरोजिनी, ' यशोदाबाई भटकृत शिक्षणाच्या प्रभावानेंच', इंदिराबाई हरिपूरकरकृत ' दैवलीला, ' सौ. कमळाबाई किबेकृत ' राजकुमारी, '* इंदिराबाई सहस्रबुद्धेकृत ' गोदावरी ', गोदावरीबाईकृत ' प्रीतीचा मोबदला ', सिंधूकृत ' सुशिला ', अनुसूयाबाई देशपांडेकृत ' वसईचा वेढा ', राधाबाई दांडेकरकृत ' संसारचित्र ' व लक्ष्मीबाई अभ्यंकरकृत ' सद्यःस्थिति '

* फुली असलेल्या पुस्तकास डे. व्ह. ट्रा. सोसायटीकडून बक्षिस मिळाले आहे.

पुढें येतात व सौ. जानकीबाई देसाईकृत ' गृहलक्ष्मी ', ' ताजमहाल ', ' प्रेमळ सवत ', ' चारुगात्री ' व ' सौभाग्यतिलक ' इत्यादि नावें सांगितलीं म्हणजे आमच्या स्त्रीनिर्मित कथावाङ्मयाची यादी संपते

सौ. जानकीबाई देसाई यांच्याशिवाय बाकीच्या सर्व कादंबऱ्या आमच्या महिला समाजाच्या सद्यःस्थितीस पूर्ण साजेशा आहेत. सौ. देसाई यांच्या पुस्तकांना मात्र पुरुषनिर्मित लेखनाचा वास येतो व हाच वास त्यांच्या विपुल ग्रंथकर्तृत्वास कारणीभूत होत असावा असें वाटतें. नाहींतर सन १९१५ पूर्वी कधींही न ऐकलेल्या लेखिकेनें या बाबतींत काशिबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर व काशिबाई हेर्लेकर यांना मागें टाकण्याचा संभव कोठला! आणि अशा स्थितींत ब्रॉंटीभगिनी, जॉर्ज इलिएट व मेरी कॉरेली इत्यादि पाश्चात्य महिलांसारखी स्वतंत्र व आश्चर्योत्पादक ग्रंथरचना होण्याची अपेक्षा तरी कशी करतां येणार!

असें जरी आहे तरी अगदीं अलीकडील कमलाबाई सोहनीकृत ' कुठें ? ' इत्यादि पुस्तकावरून पुढील काळाविषयीं आपणास सर्वस्वी निराश होण्याचें कारण दिसत नाहीं.

आतां थोडें स्त्रियोपयोगी कथावाङ्मयाविषयीं. या प्रकारांत पुरुषांकडून झालेल्या ग्रंथनिष्पत्तीचाही समावेश होतो, हें पूर्वी सांगितलेंच आहे कित्येकांस पुरुषोपयोगी पुस्तकांपासून स्त्रियोपयोगी पुस्तकें निराळीं पाडणें आवडणार नाहीं व कित्येक स्त्रियांनाही असला निर्बंध

घातलेला खपणार नाहीं. अशांचें समाधान आम्हीं करूं इच्छीत नाहीं. अलबत्, एवढें मात्र आम्हीं सांगू शकतो कीं असें करणेंच हितावह आहे. कारण महाराष्ट्राची संस्कृति व त्याची परंपरा यांचा जो कोणी सूक्ष्म रीतीनें विचार करील त्यास असें सहज दिसून येईल कीं, त्याच्या महिलासमाजाच्या कथावाङ्मयविषयक गरजा त्यांच्या यांनीच भागवाव्या अशी स्थिति निदान अद्यापि तरी आली नाहीं हें खास. अशा स्थितींत त्यांच्या बन्धुवर्गानें हें काम हातीं घेऊन त्यांना त्यांच्या प्राथमिक अवस्थेंत मदत करणें कोणास आवडणार नाहीं? अशा विशिष्ट हेतूनें प्रेरित झालेले कथावाङ्मयप्रणेते थोडे आहेत; पण आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

कांहीं अश्लील व आक्षेपार्ह पुस्तकें आमच्या पाहण्यांत आलीं नसतीं तर असा निर्बंध घालण्याचें आम्हांस कारणच नव्हतें. परंतु कथावाङ्मयाविषयीं इतका सोवळेपणा कोण बाळगणार! व अशांचा हात कोण धरणार! अशीं पुस्तकें येथें उदाहरणासाठीं म्हणून दाखविणेंही एक औचित्यभंग वाटतो व म्हणूनच तो नाद आम्हीं सोडून देतों.

आतां स्त्रियोपयोगी पुस्तकांविषयीं पाहूं गेल्यास हरि नारायण, वासुदेव गोविंद व नारायण हरि या तीन्ही आपट्यांचीं सर्व पुस्तकें आमच्या भगिनीवर्गासाठीं खुशाल शिफारस करतां येईल. मित्र आणि त्यांच्या मित्रांचीं पुस्तकेंही महाराष्ट्र महिलांच्या फार उपयोगाचीं व आवडीचीं आहेत. गो. ना. दातार, वि. सी. गुर्जर व नाथमाधव

यांचीं पुस्तकेंही त्यांच्या हातीं देण्यास हरकत नाहीं व अशींच कांहीं चांगलीं पुस्तकें सरस–सुरसप्रभृति कथा ग्रंथमालांतून निवडून काढतां येईल.

उपरिनिर्दिष्ट ग्रंथकारांच्या कथावाङ्मयांतच ‘ कथाकल्पतरु ’, ‘ कादंबरीसार ’, ‘ कुवलयपूरची राणी कुमुद्वती ’, गुणसुंदरी ’, ‘ ठगाची जबानी ’, ‘ दुर्गेशनंदिनी ’, दुर्दैवी रंगू ’, ‘देवी सत्यभामा’, ‘ धर्माजीरावचें कुटुंब ’, ‘ नारायणराव गोदावरी ’, ‘ रजपूत कुमारी तारा ’,* ‘ झनानतमहाल ’,* ‘ नूरजहान ’,* ‘ पानपतची मोहीम ’, ‘ मंजुघोष ’, ‘मित्रचंद्र’, ‘मोचनगढ ’, ‘रागिणी , ‘ लक्ष्मी आणि सरस्वति ’, ‘ वांईकर भटजी ’, ‘ विश्वासराव ’, ‘ विषवृक्ष ’, ‘ वेणू ’, ‘ शापितमहाराष्ट्र ’, ‘ सती राणकदेवी ’, ‘ सुशील यमुना ’ व ‘ हंबीरराव–पुतळाबाई ’ इत्यादि जुन्या नव्या पुस्तकांची भर टाकली म्हणजे स्त्रियोपयोगी कथावाङमय खासें तयार होईल व असलें वाङमय त्यांनीं हवें तितकें व विनदिक्कत लुटावें असें आम्ही निश्चिंतपणें म्हणूं शकतों.

\+ + + +

आतां केवळ बालवाङ्मयासंबंधीं दोन शब्द लिहिले म्हणजे आमचें कर्तव्य संपतें.

हें सदरही फार महत्वाचें आहे. आणि याचींही स्थित्यंतरें फार मौजेचीं झालीं आहेत. याची फार जोपासना झाली आहे, असेंही

म्हणतां येत नाहीं व सर्वस्वीं उपेक्षा झाली आहे, असेंही म्हणतां येत नाहीं.

अगदीं आरंभीं हें सदर मुंबईस बापूसाहेब छत्रे व नंतर विनायक कोंडदेव ओक व पुण्यास कृष्णशास्त्री चिपळूणकर, हरि कृष्ण दामले व गोविंद त्र्यंबक बापट या पंचकडीच्या हातीं होतें. या पंचकडीनें केलेली कामगिरीच मराठी भाषेंत बालवाङ्मयाचा पाया पडण्यास कारणीभूत झाली हें निर्विवाद आहे अर्थात् मराठी वाङ्मयाच्या जननकालापासून त्याच्यांत बालवाङ्मय तयार होणें सुरू झालें होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

परंतु कथावाङ्मयाविषयीं पाहिलें तर दोन तीन पुस्तकेंच ठळकपणें आपल्या निदर्शनास येतात. तीं 'इसापनीति', छत्रेकृत 'बालमित्र' व बापटकृत 'हरि आणि त्रिंबक' हीं होत. या तीन पुस्तकांतही शेवटचें पुस्तकच आम्हांस उल्लेखनीय वाटतें. कारण बाकीच्या ग्रंथकारांचीं पुस्तकें भाषेच्या दृष्टीनें बालवाचकांच्या आटोक्या बाहेरचीं अथवा केवळ उपदेशपूरित असत. म्हणूनच 'हरि आणि त्रिंबक 'चें महत्त्व विशेष आहे. या एका पुस्तकाखेरीज बालवाचकांकरितां मनोरंजक असें दुसरें पुस्तकच त्यावेळीं नव्हतें.

'बालबोधा 'नें बालवाङ्मयाचा पाया घातला खरा; पण त्याचें दृढीकरण 'आनंदा 'चा काल येईपर्यंत व्हावयाचें नव्हतें. 'शाळा-पत्रक 'ही उपयुक्त; पण तें प्रौढ विद्यार्थ्यांकरितां. म्हणून या कामाचा खरा भार आनंदावरच पडला

श्रीयुत वा. गो. आपटे यांचें ग्रंथकर्तृत्व विविध व विपुल आहे; परंतु त्यांचें नांव जें आज आबालवृद्धांच्या तोंडीं झालें आहे तें त्यांच्या ‘ आनंद ’ मासिकामुळेंच. श्रीयुत आपटयांचें लक्ष या विषयाकडे केव्हांपासून लागलें आहे, हें ‘ आनंद ’ हल्लीं पंचवीस वर्षांचा तरुण होत आला आहे, एवढें सांगितलें ह्मणजे पुरें. परंतु एकटया आनंदाचीच जोपासना करीत आपटे बसले नाहींत. त्यांनीं या अवधींत ‘ चित्तरंजन ’, ‘ बालभागवत ’, ‘ बालभारत ’, ‘ बालरामायण ’, ‘ मनी आणि मोत्या ’, ‘ महाभारतांतील सोप्या गोष्टी ’, ‘रामायणांतील सोप्या गोष्टी’ + ‘ वीरांच्या कथा ’, ‘ साधुसतांच्या गोष्टी ’ व ‘ लहान मुलांसाठीं मौजेच्या गोष्टी ’ इत्यादि दहा बारा पुस्तकें तयार करून बालवाङमयाचें आनंददायक कथासदर तयार केलें व हा त्यांचा अभिनंदनीय व्यासंग अद्यापि वाढत्या जोमानें चालू आहे.

श्रीयुत आपटयांनीं बालवाङ्मयाचें शिंग फार सुवेळीं फुंकल्यासारखें दिसतें. कारण तेव्हांपासून या विषयाकडे आपल्या लोकांचें लक्ष उत्तरोत्तर अधिकाधिक लागत चाललें आहे. तोंपर्यंत मुलांचे कवि मोरो गणेश लोंढे, मुलांचे नाटककार अनंत नारायण भागवत व रेव्ह. नारायण वामन टिळक, गोष्टी लिहिणाऱ्या काशिबाई कानिटकर व मुलांचे कादंबरीकार खंडेराव भिकाजी बेलसरे हे होत. लोंढ्यांनीं ‘ बोधसुधा ’ इत्यादि अनेक कविताग्रंथ लिहिले आहेत. भागवतांनीं

+ फुली असलेल्या पुस्तकास डे. व्ह. ट्रा. सोसायटीकडून बक्षिस मिळालें आहे.

'तेजोभंग' व रेव्ह. टिळकांनीं 'शीलं परं भूषणं' हीं दोन नाटकें लिहिलेलीं दिसतात. काशिबाई कानिटकर यांनीं 'मारुतीचा प्रसाद' व 'चांदण्यांतील गप्पा'+ तयार केल्या आहेत व बेलसऱ्यांनीं 'उद्यावरची गोष्ट'+ निवेदिली आहे.

परंतु बालवाङ्मयांत अभिजात गोष्टी लिहिणारे आमचे लेखक म्हणजे ते कृष्णाजी गोविंद किनरे, विष्णु विनायक करमरकर, यादव शंकर वावीकर व पारुजी नारायण मिसाळ हे होत. किनरेकृत 'चिमुकलें भारत', 'ध्रुव व चिलया', 'भांगेंत तुळस अथवा प्रल्हाद,' 'भारतांतील गोष्टी', 'मुलांचा श्रीकृष्ण' व 'वानरांचा देव' हीं पुस्तकें आमच्या प्रत्येक बालवाचकांच्या हातीं पडावयास हवींत व करमरकरकृत 'महाराष्ट्राचे पंचप्राण' इत्यादि पुस्तकेंही याच मासल्याचीं आहेत. वावीकरांच्या कामगिरीचा उपयोग शालापत्रकाच्या द्वारें होतो व मिसाळांचीं पुस्तकें नित्युपदेश करणारीं असलीं तरी चांगलीं आहेत. कै. राम गणेश गडकरी व जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यांनींही या कामीं थोडा हातभार लावला आहे व अगदीं अलीकडे हुदलीकरांच्या 'बूबी'नेंही बालकथावाङ्मयांत चांगली भर टाकली आहे. एवंच, बालवाङ्मयाकडे आमच्या लोकांचें लक्ष अलीकड अधिकाधिक लागत चाललें आहे व थोड्याच कालांत तें विशेष बाळसेदार होण्याची आपेक्षा बाळगणें केव्हांही गैरवाजवी होणार नाहीं.

---

+फुली असलेल्या पुस्तकास डे. व्ह. ट्रा. सोसायटीकडून बक्षीस मिळालें आहे.

## प्रकरण १० वें.

### कांहीं लोकप्रिय कादंबऱ्या व त्यांचीं कथानकें

आमच्या मराठी कादंबरींच्या गोष्टीविषयीं आतां आम्हांस कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं. राहिली असेल तर ती फक्त एकच गोष्ट आणि ती म्हणजे ही कीं, आमच्या कादंबऱ्यांचीं कथानकें तरी असतात कशाविषयीं हें दाखविणें. हें आम्हीं कोठेंच केलें नाहीं. परंतु तसें न केलें तर संसारांतील कोणकोणत्या बाबती मराठी कादंबरीकाराच्या विवेचनांत आल्या आहेत, अथवा यावयाच्या राहिल्या आहेत, हें आपणांस समजणार नाहीं. आणि हें समजणें तर अवश्य आहे. यासाठीं सुमारें शंभर कादंबऱ्यांचीं कथानकें पुढील-प्रमाणें आम्हीं नामानुक्रमानें दिलीं आहेत. कै. हरि नारायण आपटे यांच्या सर्वप्रसिद्ध कादंबऱ्यांचीं त्रोटक कथानकें त्यांच्याविषयीं या माहितीबरोबरच दिलीं असल्यानें त्या कादंबऱ्या पुढील अनुक्रमांतून वगळल्या आहेत हें येथें नमूद करणें योग्य वाटतें.

**अजिंक्य तारा**—राजाराम महाराजांचे कारकिर्दींत मराठ्यांचें राज्य पुन्हा स्थापन होऊं लागलें होतें. नव्या राज्याला साजेशा सोइस्कर जागीं नवी राजधानी स्थापावी हा राजाराम महाराजांचा हेतू त्यांच्या निधनानंतर ताराबाईसाहेबांनीं सिद्धीस नेला. साताऱ्याचा किल्ला अजिंक्य तारा मराठ्यांनीं काबीज केल्यानंतर तेथेंच बालराजा

शिवाजी यांचा राज्यारोहण समारंभ झाला. हा अजिंक्य तारा काबिज करण्याचा वृत्तांत या कादंबरींत वर्णित केला आहे.

**अमृतपुलीन**–ही कादंबरी ननिलाल बंद्योपाध्याय यांच्या पुस्तकाच्या आधारें लिहिली असून हिचें कथानक करुणाजनक आहे. ग्वाल्हेरची राजकन्या हिरण्मयी आणि चितोडचा राजकुमार अजयसिंह या प्रणयियुगुलाच्या दुष्ट दैवानें केलेल्या छलाचें वर्णन यांत आहे.

**आजपासून पन्नास वर्षांनीं**–या कादंबरींत प्रौढविवाह आणि मिश्रसमाजपद्धति यांची जोराची तरफदारी केलेली असून संसारांत नेहमीं दृष्टीला पडणाऱ्या साधारण मनुष्यांच्या स्वभावाचें चित्र कुशलतेनें रेखाटण्यांत आलें आहे. सूक्ष्म तऱ्हेचा हास्यविनोदही यांत पदोपदीं पहावयास मिळतो.

**आश्रमहरिणी**–पौराणिक कादंबरीच्या वेशांत लिहिलेली एक सामाजिक गोष्ट

**उषःकाल**–महाप्रतापी शिवाजीराजे यांनीं आपल्या मनांतील स्वराज्यस्थापनेच्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्याकरितां काय काय उपाय केले व त्या वेळच्या परिस्थितीनें चिडलेल्या एका किल्लेदाराच्या मुलानें त्यांच्या गोटांत शिरण्याकरितां कसकसे प्रयत्न केले, समर्थांच्या श्रीधरस्वामी नामक शिष्यानें शिवाजीराजांस हिंदुधर्माचें व गोब्राह्मणाचें रक्षण करण्याविषयीं कसें प्रोत्साहन दिलें व या सर्व गोष्टींचें पर्यवसान अखेरीस मोंगलांच्या ताब्यांतला एक महत्वाचा गड काबिज करण्यांत येऊन, स्वराज्यस्थापनेची मुहूर्तमेढ शिवाजी, तानाजी व

श्रीयुत वा. गो. आपटे यांचें ग्रंथकर्तृत्व विविध व विपुल आहे; परंतु त्यांचें नांव जें आज आबालवृद्धांच्या तोंडीं झालें आहे तें त्यांच्या ' आनंद ' मासिकामुळेंच. श्रीयुत आपटयांचें लक्ष या विषयाकडे केव्हांपासून लागलें आहे, हें ' आनंद ' हल्लीं पंचवीस वर्षांचा तरुण होत आला आहे, एवढें सांगितलें ह्मणजे पुरें. परंतु एकटया आनंदाचीच जोपासना करीत आपटे बसले नाहींत. त्यांनीं या अवधींत ' चित्तरंजन ', ' बालभागवत ', ' बालभारत ', ' बालरामायण ', ' मनी आणि मोत्या ', ' महाभारतांतील सोप्या गोष्टी ', 'रामायणांतील सोप्या गोष्टी' + ' वीरांच्या कथा ', ' साधुसतांच्या गोष्टी ' व ' लहान मुलांसाठीं मौजेच्या गोष्टी ' इत्यादि दहा बारा पुस्तकें तयार करून बालवाङमयाचें आनंददायक कथासदर तयार केलें व हा त्यांचा अभिनंदनीय व्यासंग अद्यापि वाढत्या जोमानें चालू आहे.

श्रीयुत आपटयांनीं बालवाङ्मयाचें शिंग फार सुवेळीं फुंकल्यासारखें दिसतें. कारण तेव्हांपासून या विषयाकडे आपल्या लोकांचें लक्ष उत्तरोत्तर अधिकाधिक लागत चाललें आहे. तोंपर्यंत मुलांचे कवि मोरो गणेश लोंढे, मुलांचे नाटककार अनंत नारायण भागवत व रेव्ह. नारायण वामन टिळक, गोष्टी लिहिणाऱ्या काशिबाई कानिटकर व मुलांचे कादंबरीकार खंडेराव भिकाजी बेलसरे हे होत. लोंढ्यांनीं ' बोधसुधा ' इत्यादि अनेक कविताग्रंथ लिहिले आहेत. भागवतांनीं

+ फुली असलेल्या पुस्तकास डे. व्ह. ट्रा. सोसायटीकडून बक्षिस मिळालें आहे.

' तेजोभंग ' व रेव्ह. टिळकांनीं ' शीलं परं भूषणं ' हीं दोन नाटकें लिहिलेलीं दिसतात. काशिबाई कानिटकर यांनीं ' मारुतीचा प्रसाद ' व ' चांदण्यांतील गप्पा '+ तयार केल्या आहेत व वेलसऱ्यांनीं ' उद्यावरची गोष्ट '+ निवेदिली आहे.

परंतु बालवाङ्मयांत अभिजात गोष्टी लिहिणारे आमचे लेखक म्हणजे ते कृष्णाजी गोविंद किनरे, विष्णु विनायक करमरकर, यादव शंकर वावीकर व पारुजी नारायण मिसाळ हे होत. किनरेकृत ' चिमुकलें भारत ', 'ध्रुव व चिलया', 'भांगेंत तुळस अथवा प्रल्हाद,' ' भारतांतील गोष्टी ', ' मुलांचा श्रीकृष्ण ' व ' वानरांचा देव ' हीं पुस्तकें आमच्या प्रत्येक बालवाचकांच्या हातीं पडावयास हवींत व करमरकरकृत ' महाराष्ट्राचे पंचप्राण ' इत्यादि पुस्तकेंही याच मासल्याचीं आहेत. वावीकरांच्या कामगिरीचा उपयोग शालापत्रकाच्या द्वारें होतो व मिसाळांचीं पुस्तकें नित्युपदेश करणारीं असलीं तरी चांगलीं आहेत. कै. राम गणेश गडकरी व जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यांनींही या कामीं थोडा हातभार लावला आहे व अगदीं अलीकडे हुदलीकरांच्या ' बूबी 'नेंही बालकथावाङ्मयांत चांगली भर टाकली आहे. एवंच, बालवाङ्मयाकडे आमच्या लोकांचें लक्ष अलीकड अधिकाधिक लागत चाललें आहे व थोड्याच कालांत तें विशेष बाळसेदार होण्याची अपेक्षा बाळगणें केव्हांही गैरवाजवी होणार नाहीं.

---

+फुली असलेल्या पुस्तकास डे. व्ह. ट्रा. सोसायटीकडून बक्षीस मिळालें आहे.

## प्रकरण १० वें.

### कांहीं लोकप्रिय कादंबऱ्या व त्यांचीं कथानकें

आमच्या मराठी कादंबरींच्या गोष्टीविषयीं आतां आम्हांस कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं. राहिली असेल तर ती फक्त एकच गोष्ट आणि ती म्हणजे ही कीं, आमच्या कादंबऱ्यांचीं कथानकें तरी असतात कशाविषयीं हें दाखविणें. हें आम्हीं कोठेंच केलें नाहीं. परंतु तसें न केलें तर संसारांतील कोणकोणत्या बाबती मराठी कादंबरीकारांच्या विवेचनांत आल्या आहेत, अथवा यावयाच्या राहिल्या आहेत, हें आपणांस समजणार नाहीं. आणि हें समजणें तर अवश्य आहे. यासाठीं सुमारें शंभर कादंबऱ्यांचीं कथानकें पुढील प्रमाणें आम्हीं नामानुक्रमानें दिलीं आहेत. कै. हरि नारायण आपटे यांच्या सर्वप्रसिद्ध कादंबऱ्यांचीं त्रोटक कथानकें त्यांच्याविषयीं या माहितीबरोबरच दिलीं असल्यानें त्या कादंबऱ्या पुढील अनुक्रमांतून वगळल्या आहेत हें येथें नमूद करणें योग्य वाटतें.

**अजिंक्य तारा**—राजाराम महाराजांचे कारकिर्दींत मराठ्यांचें राज्य पुन्हा स्थापन होऊं लागलें होतें. नव्या राज्याला साजेशा सोइस्कर जागीं नवी राजधानी स्थापावी हा राजाराम महाराजांचा हेतू त्यांच्या निधनानंतर ताराबाईसाहेबांनीं सिद्धीस नेला. सातान्याचा किल्ला अजिंक्य तारा मराठ्यांनीं काबीज केल्यानंतर तेथेंच बालराजा

शिवाजी यांचा राज्यारोहण समारंभ झाला. हा अजिंक्य तारा काबिज करण्याचा वृत्तांत या कादंबरींत वर्णित केला आहे.

**अमृतपुलीन**—ही कादंबरी ननिलाल बंद्योपाध्याय यांच्या पुस्तकाच्या आधारें लिहिली असून हिचें कथानक करुणाजनक आहे. ग्वाल्हेरची राजकन्या हिरण्मयी आणि चितोडचा राजकुमार अजयसिंह या प्रणयियुगुलाच्या दुष्ट दैवानें केलेल्या छलाचें वर्णन यांत आहे.

**आजपासून पन्नास वर्षांनीं**—या कादंबरींत प्रौढविवाह आणि मिश्रसमाजपद्धति यांची जोराची तरफदारी केलेली असून संसारांत नेहमीं दृष्टीला पडणाऱ्या साधारण मनुष्यांच्या स्वभावाचें चित्र कुशलतेनें रेखाटण्यांत आलें आहे. सूक्ष्म तऱ्हेचा हास्यविनोदही यांत पदोपदीं पहावयास मिळतो.

**आश्रमहरिणी**—पौराणिक कादंबरीच्या वेशांत लिहिलेली एक सामाजिक गोष्ट

**उषःकाल**—महाप्रतापी शिवाजीराजे यांनीं आपल्या मनांतील स्वराज्यस्थापनेच्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्याकरितां काय काय उपाय केले व त्या वेळच्या परिस्थितीनें चिडलेल्या एका किल्लेदाराच्या मुलानें त्यांच्या गोटांत शिरण्याकरितां कसकसे प्रयत्न केले, समर्थांच्या श्रीधरस्वामी नामक शिष्यानें शिवाजीराजांस हिंदुधर्माचें व गोब्राह्मणाचें रक्षण करण्याविषयीं कसें प्रोत्साहन दिलें व या सर्व गोष्टींचें पर्यवसान अखेरीस मोंगलांच्या ताब्यांतला एक महत्वाचा गड काबिज करण्यांत येऊन, स्वराज्यस्थापनेची मुहूर्तमेढ शिवाजी, तानाजी व

पूर्वोक्त किल्लेदाराचा मुलगा नानासाहेब यांच्या हातून कशी रोंवली गेली, वगैरे मनोरम कथाभागाचें अत्यंत रसभरित वर्णन ह्या ऐतिहासिक कादंबरींत केलें आहे. ह्या कादंबरींतील आप्पासाहेबासारख्या हिन्दु किल्लेदाराची स्वामिभक्ति, सावळ्याचा विनोद व धारिष्ट, सयदुल्लाखानाचीं कृष्णकारस्थानें, सर्जेरावाचें कौटिल्य, रणदुल्ला खानाची त्रेधा, नानासाहेबाच्या बायकोवरील संकटें व आपल्या शत्रूचा सूड उगविण्याकरितां रामदेवराव जाधवांच्या मनांत वाणलेला सकारण द्वेष, इत्यादि प्रसंगांचें वर्णन वाचीत असतां वाचकास क्षण भर बाह्यसृष्टीचें भानच रहात नाहीं.

**इंदिरा**—या कादंबरींत हिंदु समाजांतील मध्यम वर्गाच्या हल्लींच्या स्थितीचें वर्णन करून मधून मधून पुनर्विवाह, प्रौढविवाह, स्त्रीशिक्षण इत्यादि समाजसुधारणेच्या कल्पनांचा अनुवाद केलेला आहे.

**ऐतिहासिक गोष्टी**—ह्या गोष्टी कै. गोपाळराव हरि देशमुख यांनीं प्रथम ‘ लोकहितवादी ’ नामक मासिक पुस्तकांत लिहून प्रसिद्ध केल्या. ह्यांतील बहुतेक गोष्टी मराठेशाहींतील किंवा पेशवाईतील प्रसिद्ध पुरुषांच्या किंवा शूर सरदाराच्या असून त्यांत त्यांचें शहाणपण, औदार्य, शौर्य, युक्तिवाद व मुत्सद्दीपणा हीं चांगलीं दिसून येतात.

**कल्पनाचित्र**-या कादंबरींत महत्वाकांक्षा, चिकाटी, स्वार्थत्याग, एकपत्नित्व वगैरेंचीं उदाहरणें वाचकांस पहावयास मिळतील.

**कुठें ?**—शिक्षण घेत असतांना तरुण कुमारिकांच्या चित्तांत उत्पन्न होणारे विचार व विकार, त्यांच्या संभाषणांचा ओघ, त्यांचीं ध्येयें इत्यादि गोष्टी लेखिकेनें या पुस्तकांत कुशलतेनें दाखविलीं आहेत.

**कृपणकन्या**—हें पुस्तक सुप्रसिद्ध आंग्ल कादंबरीकार अॅन्सवर्थ यांच्या ' मायझर्स डॉक्टर ' या कथानकाधारें लिहिलें असून त्यांत कृपणपिता द्रव्यलोभामुळें आपल्या कन्येस पोकळ व दिखाऊ श्रीमंतीला कसा हपापलेला असतो हें दर्शविलें आहे. ही कादंबरी पारशी समाजाला अनुरूप अशा पात्रांच्या द्वारें रंगविली असल्यामुळें त्या समाजांतील मनोरंजक चालीरीतींचीही वाचकांना माहिती होते.

**खरी आर्यकन्या**—स्त्रीवर्गाची खरी सुधारणा घडवून आणण्यास व त्यावरील पुरुषवर्गाची अरेरावी दूर करण्यास स्त्रियांना स्वावलंबी केलें पाहिजे या सिद्धांताचें प्रतिपादन यांत आहे.

**खरी लोकसेवा**-मुंबईतील कामगारवर्गाची स्थिति वर्णित करणारी सामाजिक कादंबरी.

**गड आला, पण सिंह गेला !**—कोंडाणा ऊर्फ सिंहगड घेत असतां तानाजी मालुसरा रणांत पडल्याचा मराठ्यांच्या इतिहासांतील जो अत्यंत उज्ज्वल परंतु हृदयद्रावक प्रसंग, तो या कादंबरीचा विषय आहे. कोंडाण्याच्या बंदोबस्ताकरितां औरंगजेबाकडून आलेल्या उदयभानूनें कमलकुमारी नामक एका साध्वीस, ती सती जात असतां अभिलाषबुद्धीनें पकडून आणून बादशहाच्या परवानगीनें तिच्याशीं

निका लावण्याचा केलेला निश्चय, आपलें पातिव्रत्य राखण्यासाठीं तिनें, तिच्या मैत्रिणीनें व मैत्रिणीच्या नवऱ्यानें केलेलें धारिष्ट, कमल कुमारीचा निकाल लावण्याची ठरीव वेळ भरण्यापूर्वी तिचें पातिव्रत्य रक्षण करण्याकरितां तानाजीस गडावर हल्ला करण्याचे बाबतींत करावी लागलेली घाई व अखेरीस तिच्या पातिव्रत्याचें रक्षण करून, गड सर करण्याचें काम बहुतेक पुरें झालें असतां त्यांत वीरपुरुषास योग्य असा तानाजीस आलेला मृत्यु, वगैरे प्रसंगाची हकीकत वाचीत असतां वाचकाचें हृदय भरून येतें व कंठ सद्गदित होतो

**गहनगूढ**—यांत आरंभीं एखाद्या गहन अपराधाच्या चातुर्यपूर्ण चौकशीची छटा दिसून येते; पण हळू हळू हें स्वरूप पालटून कथानकाला प्रणयाचा रंग चढतो; व अखेरीस कथानकाचें पर्यवसान आनंदांत होतें.

**गृहलक्ष्मी**—या कादंबरीस ‘ गृहलक्ष्मी ’ असें नांव देण्यांत आलें आहे, तरी ती यमुना नांवाच्या एका गतभर्तृकेची करुण कहाणी आहे. मुलीच्या लग्नाकरितां कर्ज काढल्यामुळें अगोदरच दरिद्री असलेल्या एका कुटुंबास किती हाल सोसावे लागले याचें हृदयभेदी चित्र ग्रंथकर्तानें रेखाटलें आहे. दारिद्र्यामुळें मुलांना शिक्षण देणें कसें अशक्य होतें, शिक्षणाभावामुळें मुलें वाईट मार्गाला कशीं लागतात व नाटकांत वगैरे शिरल्यामुळें घरावरील व भावाबहिणीवरील त्यांचें प्रेम कसें नाहींसें होतें, याचें वर्णन या कादंबरींत केलें आहे.

**गृहशिक्षण**—मुलांना जन्म दिल्यानें मातेची पदवी पटकाव-णाऱ्या पुष्कळ आहेत. मुलांना शिक्षण देईल, तीच खरी माता होय, हें तत्व या पुस्तकांत मनोरंजक रीतीनें ग्रथित केलें आहे

**ग्रहदशेचा फेरा**—देशी डॉक्टर व परिचारिका यांच्या अंतःकरणाचा कठोरपणा व इंग्रज डॉक्टर व परिचारिका यांचें औदार्य व दयाळूपणा यासंबंधीं प्रत्यक्ष घडलेल्या प्रसंगावर रचलेली ही गोष्ट आहे. ( नाथमाधव )

**चंद्रकांता**—ही अद्‌भुत कादंबरी वाचतांना आपण नेहमींच्या सृष्टींत नसून एकाद्या चमत्कारिक सृष्टींत आहोंत असें वाचकांच्या मनाला वाटतें. पदोपदीं यांत्रिक चमत्कार, वाटेल त्या इसमाचे हुबेहुब सोंग घेणारे बहुरूपी, निरनिराळ्या युक्त्याप्रयुक्त्या योजून परस्परांचे बेत ढासळून पाडणारे कुशल प्रतिपक्षी हे दृष्टीस पडतात (नभोविहारी)

**चंद्रगुप्त**:—युरोपियन राजनीतिविशारदांत प्रसिद्ध इटालियन गृहस्थ मॅकियाव्हेली याचें जें स्थान तेंच इकडील राजनीतिविशारदांत आर्य चाणाक्य याचें आहे, एवढें सांगितलें म्हणजे चाणाक्याच्या नीतिनिपुणतेचें उत्कृष्ट वर्णन झालें. प्रस्तुत कादंबरींतील चाणाक्य अमात्य राक्षस व चंद्रगुप्ताची माता मुरादेवी या पात्रांचीं कारस्थानें ग्रंथकारानें इतकीं सुबक रंगाविलीं आहेत कीं. तीं वाचीत असतां वाचकांचें मन तद्रूप बनून जातें. तसेंच स्त्रियांची कोमलता कांहीं कारणानें एकदां नष्ट झाली म्हणजे त्या किती खुनशी व धाडशी बनतात व सरळपणा, सत्यनिष्ठा, स्वामिभक्ति व देशभक्ति हीं एका-द्याच्या अंगीं कितीही वास करीत असलीं तरी वक्रनीतीशीं गांठ

पडली असतां त्या सरळपणामुळेंच तो त्या वक्रनीतीस कसा बळी पडतो, याचें उत्कृष्ट चित्र या कादंबरींत पहावयास मिळतें. आर्यचाणाक्याची स्पृहणीय निस्पृहता, विद्वत्ता व तेजस्विता आणि त्यांच्याच जोरावर त्यानें गवळ्याच्या हातीं सांपडलेल्या राजकुमारास मगध देशाचें सिंहासन मिळवून देण्यांत संपादिलेलें यश, हीं या देशांतील विद्वान् व सुशिक्षित लोकांच्या आज कित्येक पिढ्या इतकीं ठळकपणें डोळ्यासमोर आहेत कीं. चाणाक्याचें तें कृत्य हा राजनीतीचा एक स्वतंत्र धडाच होऊन बसला आहे ( आपटे )

**चंद्रचूड**–ही कादंबरी म्हणजे प्रस्तुत समाजस्थितीवर अत्यंत मार्मिक, निःपाक्षपातानें केलेली व बोधप्रद अशी टीका आहे कादंबरींतील पात्रांचें स्वभावरेखन बहारीचें वठलें आहे विशेषतः चद्रंचूडाचें पात्र अत्यंत उठावदार रंगलें आहे. ( कुळकर्णी )

**छत्रसाल**—या कादंबरीचें कथानक औरंगजेबाच्या काळांतील असून, मोंगलांच्या सत्तेंतून सुटण्यासाठीं बुंदेलखंडानें छत्रसालच्या आधिपत्याखालीं जे प्रयत्न केले, त्याचें चित्र या कादंबरींत काढलें आहे. ( शहा )

**जीवनरहस्य**–खरी मैत्री, उदार स्वार्थत्याग, दृढनिश्चय, जुन्या मतांविषयीं अतिशय आवड या विषयांचें उदहरणांनीं विवेचन करणारी आणि १९१३ सालांतील ब्यांकांच्या स्थितीविषयीं उत्तम वर्णन असलेली सामाजिक कादंबरी.

**जीवनलता**—एक अनाथ बालिका बाल्यावस्थेंत आईबापांच्या कठोर इच्छेमुळें विवाहास बळी पडून विधवा होते. पुढें आईबाप मृत झाल्यानें तिचे अत्यंत हाल होतात. विद्याश्रमांत राहून कशी तरी ती ज्ञानसंपन्न झाल्यावर पुढें एका श्रीमंताच्या मुलीची शिक्षकीण होते. तेथें त्या श्रीमंताचें तिजवर प्रेम जडतें, पण तें तो गुप्त ठेवतो. कारण तो विवाहित असतो त्या नंतर ती शाळामास्तरीण बनते. तेथें एक पुनर्विवाहेच्छु तिला मागणी घालतो पण ती त्याचा तिरस्कार करते. इकडे घर जळाल्यामुळें पूर्वींच्या तरुण श्रीमंताची दुष्ट स्त्री मरण पावते व तोही दुखापतीमुळें अंध बनतो. ही बातमी त्या बालविधवेस कळतांच ती त्यास भेटते व अंध असतांही त्याच्याशीं पुनर्विवाह करते. ( लिमये )

**जीवनसंध्या**—ही कादंबरी रोमेशचंद्र दत्त यांच्या बंगाली पुस्तकाच्या आधारें लिहिली असून, हींत महाराणा प्रतापसिंहानें केवळ स्वातंत्र्यासाठीं अकबर बादशहाशीं आमरण युद्धप्रसंग करून प्रगट केलेलें असामान्य क्षात्रतेज, भोगलेली दुर्धर विपत्ति, त्याचें विमल यश, अतुल देशभक्ति, विलक्षण आत्मत्याग; त्याचप्रमाणें कुमार तेजसिंहाचा धीरोधात्त स्वभाव, देवकन्या पुष्पकुमारीचें सच्चरित्र, भिल्लबाला गिरिजेचें चातुर्य आणि सतीत्व वगैरे अनेक प्रसंग बहारीचे आहेत. ( गुर्जर )

**जग हें असें आहे**—ही एक सामाजिक कादंबरी आहे. या कादंबरींत वर्णिलेले प्रसंग व्यवहारांत नित्य अनुभवास येणारे असल्यामुळें हिच्या वाचकांपैकीं बहुतेकांस हिच्यांत आपल्या स्वभावाचें

अथवा अनुभवाचें छायाचित्र पहावयास सांपडतें ! चिंतोपंतानें द्रव्याच्या लोभानें व स्त्रैणपणामुळें राधाबाईसारख्या सत्वशील माउलीचा व तिच्या पोरांचा केलेला घात, चिंतोपंताच्या बायकोची अनावर द्रव्यतृष्णा, मि. चॅरिटी आणि फेअरब्रेन यांचें औदार्य व इंग्रज लोकांच्या एकंदर शीलास साजेसा थोरपणा, नेटिव्ह कामगारांतील परस्पर मत्सर व त्यामुळें त्यांची होणारी हानी इत्यादि नित्य अनुभवास येणाऱ्या गोष्टींचें यथास्थित चित्र या कादंबरींत रेखाटलें गेलें आहे. (आपटे)

**जंजिऱ्याचा वेढा**—संभाजी महाराजकालीन देशस्थिति दाखविणारी ऐतिहासिक कादंबरी.

**ठगाची जबानी**—टेलरकृत ' Confessions of a Thug ' या पुस्तकाचें उत्कृष्ट भाषांतर. या कादंबरीवरून या देशांत पूर्वी ठगाचें प्राबल्य किती होतें याची चांगली कल्पना होते. ( बर्वे )

**तिलोत्तमा**—महाराष्ट्र स्त्रीसमाजांत संगीत कलेची गोडी उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणारी सामाजिक कादंबरी. ( गोखले )

**तीन शिलेदार**—फ्रेंच कादंबरीकार ए. डयुमास याच्या ' थ्री मस्केटिअर ' या राजकारस्थानपूर्ण ऐतिहासिक कादंबरीचें सुंदर भाषांतर.

**ताजमहाल**—तरुण शहाजहानच्या पूर्ववयांतील रमणीय कथाप्रसंग या ऐतिहासिक कादंबरींत वर्णिला असून ब्राह्मणकन्येस दिल्लीपतीची बादशाहीण बनविण्याचें रहस्यपूर्ण कारस्थान यांत वर्णिलें आहे.

यांत पिशाच्चलीला, भुताटकीचे चमत्कार इत्यादि प्रसंगामुळें खुद्द जहां-गिरासारखा मर्द भयानें कसा पळत सुटला हें दाखविलें आहे (देसाई)

**दुर्दैवी रंगू**—या कादंबरीचें संविधानक पानपतचा रणसंग्राम हें आहे. मूळ ऐतिहासिक कथानक जसेंच्या तसें ठेवून त्याला कल्पित गोष्टीच्या थोड्याबहुत पुरत्या देऊन लढाईची हकीकत शक्य तितकी सुसंबद्ध अशी दिली आहे. भाऊसाहेब पानपतावर दोन महिने कां पडून राहिले, आदले रात्रीं ठरल्याप्रमाणें गोल न बांधतां भाऊ-साहेबांनीं लढाई कां केली पार्वतीबाईचा शेवटपर्यंत भाऊसाहेब रणांत मेले नाहींत असा समज कां राहिला, नानासाहेब पेशव्यांनीं दुसर लग्न कसें केलें, सुजाउद्दौल्याला भाऊसाहेबांनीं शेवटची चिठ्ठी कशी लिहिली, अबदालीस गैरसावधपणानें मारण्याचा भाऊसाहे-बांचा बेत कसा फसला, इत्यादि मूळ हकीकतीस कल्पित कथान-काच्या जोडीनें ग्रंथकारानें सफाइदार रीतीनें रंगविली आहे. (वैद्य)

**दुःखांतीं सूख**—' जिच्या हातीं पाळण्याची दोरी तीच देशाला उद्धरी !' चांगली माता कितीही गरीबी कितीही संकटें, केवढेही दुर्धर प्रसंग आले, तरी त्यांतून पार पडून आपल्या मुलांना कशी सन्मार्गवर्ती बनविते आणि अप्रबुद्ध व मूर्ख अई आपल्या मुलांचें कसें मातेरें करिते याचें चित्र या कादंबरींत दिसेल. (आपटे)

**दैवाची विचित्र लीला**-या कादंबरीचा नायक रमेश याच्या स्वभावाची आणि शेक्सपिअरच्या हॉम्लेट्च्या स्वाभावाशीं तुलना करून पहाणें मोठें मौजेचें आहे. ( सहृदय )

**धाकट्या सूनबाई**—ही उपदेशपूर्ण मनोवेधक कादंबरी प्रत्येक मुलीकडून अवश्य वाचवावी अशी आहे. धाकट्या सूनबाईच्या संगतीनें सून सद्गुणी निपजून ती कुटुंबसुखाची वृद्धीच करील. (मित्र)

**नरेंद्रनाथ**—रमेशचंद्र दत्त यांच्या 'Slave girl of Agra' या पुस्तकाचें हें सुरस रूपांतर आहे.

**नवयुग**—या पुस्तकांत नव्या आणि जुन्या अशा दोन्ही पक्षांतील मंडळींच्या वर्तनांतील कित्येक बऱ्यावाईट गोष्टींचें चित्र निःपक्षपातानें रेखाटण्यांत आलें आहे. ( आपटे )

**नशिबाची परीक्षा**—' इथेंच करावें आणि इथेंच भरावें ! दुसऱ्यासाठीं खाडा खोदणाराला स्वतःच त्या खाड्यांत पडावें लागतें व भल्याचा परिणाम शेवटीं भलाच होतो हें या कादंबरींत सुंदर रीतीनें दाखविलें आहे ( साठे )

**न्याय कीं अन्याय !**—या कादंबरीमध्यें बँकेच्या एका लफंग्या कृत्याचें वर्णन करण्याचा सत्कृद्दर्शनीं जरी लेखकाचा हेतू दिसतो तरी प्रो रत्नप्रकाश ह्या एकट्यालाच सर्व महत्त्व ग्रंथकारानें दिलेलें नाहीं. साधाभोळा जनार्दनपंत हा व्यवहाराच्या अज्ञानामुळें जगांतील अन्यायाला कसा बळी पडतो, परोपकारी गंगाधरपंत व त्रिंबकराव यांच्या सान्निध्यानें सरस्वतीबाईसारख्या मानी, करारी, हुषार परंतु थोड्या बहकलेल्या स्त्रीला अखेर आर्तजनांच्या दुःखपरिमार्जनाच्या मार्गामध्यें पडण्याची सद्बुद्धि होऊन अखेर तिच्या मनाला

शांति कशी प्राप्त होते व डॉ. शूळपाणी यांच्यासारखा सरळ व जात्या पापभीरु पुरुष परिस्थितीमध्यें एकाच प्रसंगीं थोडें गर्ह्य वर्तन घडलें तरी पुढें सुधारत जाऊन त्या एका प्रसंगाच्या कृतीचें निराकरण स्वार्थावर पाणी सोडून पुढें कसें करूं शकतो, इत्यादि मनुष्यस्वभावाचें आविष्करण ग्रंथकारानें बऱ्याच चातुर्यानें केलें आहे कादंबऱ्या म्हणजे केवळ शृंगाररसाचें थैमान दाखविणारे ग्रंथ होत असा जो ग्रह अलीकडच्या काळीं महाराष्ट्रांत बळावत चालला होता, तो 'न्याय कीं अन्याय' या कादंबरीनें पार बदलून कादंबऱ्यांमध्यें सुद्धा उत्कृष्ट प्रकारच्या नीतिमत्तेची ओळख करून देतां येते ही गोष्ट ग्रंथकारानें यशस्वी रीतीनें पटविली आहे. ( दामले )

**पण लक्षांत कोण घेतो?**—या कादंबरींत एका बालविधवे-कडून आपलें आत्मचरित्र वदविलें आहे. असें करण्यांत उच्च म्हणविलेल्या जातींत बालविधवांची स्थिति किती अनुकंपनीय आहे हें वाचकांच्या लक्षांत आणून द्या। असा कर्त्याचा उद्देश कितीसा सफळ झाला आहे हें, हें पुस्तक वाचलें असतां कळून येईल. बालविधवांचा प्रश्न अत्यंत बिकट आहे तो कसा सोडवावा यासंबंधानें एकमत होणें शक्य नाहीं. तरी निदान या महत्वाच्या सामाजिक बाबीसंबंधानें विचार करण्यास या पुस्तकाच्या वाचनानें वाचकांस इच्छा झाली तरी कर्त्याचा हेतू सफल झाला असें मानण्यास हरकत नाहीं. ( आपटे )

**पतित**— रंगनाथ नांवाच्या एका घरंदाज, कुलीन व मराठी शिक्षण घेतलेल्या पण सांपत्तिक अडचणीमुळें पतित झालेल्या ब्राह्म-

णाचें चारित्र वर्णन केलें आहे. रंगनाथाचें पात्र उठावदारपणें वठ-विण्यासाठीं वल्लभाचार्यासारख्या नीच पात्राची योजना करण्यांत आली आहे व वल्लभाचार्यांचीं कृष्णकृत्यें वर्णन करितांना ढोंगी गुरूंचा चांगला समाचार घेतला आहे नीच मनुष्याच्या संगतींत त्याच्या पदरचीं माणसें विशेषत: त्यांचीं मुलें कशीं बिघडतात लहाणपणीं वाममार्गाचें बाळकडू आपस्वार्थी लोक आपल्या मुलींना पाजून त्यच्या जन्माचें कसें मातेरें करून टाकतात याचें वर्णन प्रस्तुत पुस्तकांत वाचकास पहावयास मिळेल.

**परिणामीं हेंच** !—मूलबाळ असतांहा प्रथम पत्नि निवर्ततांच द्वितीय संबंध करणाऱ्या गृहस्थितीचें, सापत्नभावाचें व कुटुंबक्लेशाचें वर्णन या कादंबरात केलें आहे.

**प्रियंवदा**—गृहिणीच्या खऱ्या कर्तव्याची दिशा या कादंबरींत चांगल्या रीतीनें दाखविली आहे लिहिणें वाचणें शिकलेल्या परंतु गृहकृत्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सांप्रतच्य तरुण स्त्रियांना हें पुस्तक मार्गावर आणील ( मित्र )

**प्रेमपरिक्षण**—मेरी कॉरेली या ग्रंथकर्तीच्या मतें द्रव्य हें शुद्ध प्रेमोद्भवाच्या आड येणारें आहे. याच तत्वाचा ठसा तिच्या इंग्रजी पुस्तकावरून अनुवादिलेल्या या कादंवरींत वाचकांस पहावयास मिळेल. ( रघुनाथसूनु )

**प्रेमशृंखला**—ही एक रहस्यपूर्ण डिटेक्टिव कादंबरी आहे यांत एक शंकेखोर स्त्री भ्रमाखलीं दुसऱ्या एका सच्छील स्त्रीला व

एका निरपराधी मनुष्यास संशयांत ठेवून त्यापासून पैसे उकळण्याचा कसा प्रयत्न करते व तो फसल्यामुळें तिची कशी फजिती उडते हें दाखविलें आहे. ( दळवी )

**बकुलमाल** —ही ऐतिहासिक कादंबरी स्वर्णकुमारीदेवी यांच्या एका बंगाली, पुस्तकावरून लिहिली असून, निसर्गकोमल अशी रमणी सूडाच्या इच्छेनें प्रसंगीं राक्षसी बनली तरी शेवटीं प्रेमामुळें ती पुन्हां कोमल हृदय बनून आपल्या प्रियजनांकरितां विलक्षण आत्मत्याग कसा करते हें या कादंबरीची नायिका प्रेमला हिच्या चरित्रावरून वाचकांना उत्कृष्ट रीतीनें दिसून येईल. ( नाईक )

**भद्रंभद्र**—सारासार विचार न करितां जुनें तें सोनें मानणाऱ्या पुराणप्रिय मंडळीकडून वेळोवेळीं कसे हास्यास्पद प्रकार घडतात, याचें पुस्तकांत बहारीचें वर्णन आहे. ( करंदीकर )

**भयंकर सूड**—विक्रम राजावर आलेल्या अनेक भयंकर संकटांतून अद्भुत प्रकारानें कशी मुक्तता झाली, तो प्रसंग या कथानकांत आहे. ( पंडित)

**भयंकर स्वप्न**—Lord Oakburn's daughters या इंग्रजी पुस्तकाच्या आधारें ही कादंबरी लिहिली आहे. (इनामदार)

**भयंकर दिव्य**—' गोल्डन गँग ' ऊर्फ सोनेरी टोळी या नांवानें प्रसिद्ध असलेल्या मुंबईच्या अट्टल लुच्चे व फसवे लोकांच्या कंपूचीं भयंकर कृत्यें व त्यांचे आणि त्यांच्या मोहांत सांपडलेल्या कित्येक सुशील परंतु दुर्दैवी व्यक्तींचें चरित्र हा ह्या कादंबरीचा विषय आहे.

ह्या कादंबरींतील नायक पद्माकर याचा अविचार आणि त्यामुळें नायिका कमला हिची झालेली दुर्दशा व करुणास्पद स्थिति हीं वाचींत असतां ज्याचें अंतःकरण कळवळणार नाहीं असा वाचक विरळा. प्रो. डँडीचीं कृत्यें पाहून तर वाचक आश्चर्यानें थक्क होतो पद्मप्रकराचे वडील दादासाहेब यांचें करारीपणाचें वर्तन, काका-साहेबांचा द्रव्यलोभ व त्याच्यापायीं त्यांची झालेली फजीती, सदू नानाच्या कुटुंबानें नवऱ्यास नकळत आपल्या उडाणटप्पू बनलेल्या पोराचे लाड करून घेतलेली फसगत, जुन्या शास्त्र्यांची प्रामण्यकुशा-लता, बिंदुमाधव पांड्यांची हातचलाखी व त्यानें काढलेली ' शौंडिर-शाला ' व शेवटीं दादासाहेबांच्या मनःस्थितींत झालेला फेरबदल व त्यांनीं कमलेला व पद्माकराला सुखानें राहण्याबद्दल दिलेली संमति व केलेला उपदेश वगैरे हकीकती वाचीत असतां वाचकांच्या मनो-वृत्ति उचंबळून येतात. ( आपटे )

**भिकारीण**—एका सरळमनस्क सुप्रवृत्त तरुणीची, ती एका लफंग्या व पोषाखी सौजन्यानें नटलेल्या इष्कबाजाच्या नादीं लागल्या-मुळें कशी शोचनीय अवस्था झाली याचें मार्मिक चित्र या कादं-बरींत रेखाटलें आहे. ( शिवराम )

**मुरळ**—नवऱ्याच्या दुर्वर्तनामुळें उत्पन्न झालेलीं दुःखें जिनें धिमेपणानें सहन केलीं अशा एका तरुण स्त्रीची गोष्ट. (आपटे)

**मधली स्थितिः**—ही कादंबरी स १८८८ च्या सुमारास लिहिली गेली आहे अर्थात् तत्कालीन मध्यम लोकांच्या आचार-

विचारांचें चित्र हींत रेंखाटलें गेलें आहे तो काळ अव्वल इंग्रजीन निपजलेल्या पहिल्या पिढीचा होता. त्यामुळें मध्यम वर्गांतलि लोकांची स्थिति साधारण ख्यालीखुशालीची व कांहींशी रंगेल होती जुनीं व्यसनें व नवीं व्यसनें यांचा संगम त्यांच्या ठिकाणीं होत होता. अल्प विद्येनें बराच पैसा व मान त्यावेळीं मिळवितां येत असे, अर्थात् अशा लोकांचा आयुष्यक्रम कांहींसा निष्काळजीपणाचा व रंगेलपणाचा असावयाचा आणि तो तसा याकाळीं होताही सुमारें शतकार्धा-पूर्वीच्या महाराष्ट्रांतलि मध्यम स्थितींतलि लोकांचें चारित्र्य कसें असे, हें ज्याला मौजेनें अथवा ऐतिहासिक जिज्ञासेनें पहावयाचें असेल, त्यास प्रस्तुत कादंबरीसारखें दुसरें साधन क्वचित्च सांपडेल. (आपटे)

**मराठशाहीची ढाल**——संभाजी राजांच्या कारकिर्दीत मराठी राज्यावर प्राणसंकट आलें होतें असें म्हटलें असतां चालेल राजांच्या अमानुष वधानंतर मराठशाहीचें तख्त रायगडाहून जिंजीला न्यावें लागलें. गादीच्या संरक्षणासाठीं मराठे वीर यवनांच्या सैन्याला थोप-वून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. या वीरांचें नेतृत्व संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्याकडे होतें व त्यांनीं आपल्या निधड्या छातीच्या ढालीवर मोगलाचे सगळे आघात थोपवून धरले पैकीं वीर शिरोमणी संताजी घोरपडे यांचें चरित्र ग्रंथकारानें या पुस्तकांत कुशलतेनें रंगविलें आहे

**माणिकवाग**——शुद्ध वर्तनाच्या आणि निष्कपट, निष्पाप व कोमल अंतःकरणाच्या, परंतु संशय आणि मत्सर यांनीं ग्रासलेल्या

एका हतभागी स्त्रीनें आपल्या एकंदर जन्माचें कसें मातेरें करून घेतलें आणि जन्मभर पश्चात्ताप करूनही आपल्या भयंकर चुकीचा परिणाम तिला कसा टाळतां आला नाहीं याचें चित्र या कादंबरींत रेखाटण्यांत आलें आहे. (आपटे)

**मायेचा बाजार**—ही कादंबरी निव्वळ सामाजिक असून करुणरसानें अगदीं थबथबली आहे. पति हल्लींच्या तऱ्हेनें सुशिक्षित व विचारांत फार पुढें गेलेला व पत्नी अशिक्षित व पुराणकल्प-नांनीं अंध झालेली असली म्हणजे परस्परासंबंधानें एकमेकांच्या मनांत कसा साहजिक तिटकारा उत्पन्न होतो व तेणेंकरून कौटुंबिक सौख्याची कशी राखरांगोळी होते याचें चित्र या कादंबरींत पहावयास सांपडेल. पद्माताई व मालतीबाई या दोन्ही मैत्रिणी मनानें अगदीं सरळ, प्रेमळ, सत्वशील, सुशिक्षित, श्रीमंत अशा असून मालतीला हा संसार नंदनवनाप्रमाणें सुखकर व्हावा व पद्माताईला बापानें घरजांवई केलेल्या पाषाणहृदयी, मायावी व द्रव्यपर नवऱ्या-पासून सुखाचा लेशही न मिळतां त्याचा छळ सोसता सोसतां निरा-शेनें हृदय फाटून मरण्याची पाळी यावी, हें पाहून जगांत असें कां व्हावें ? या विचारांत मन गुंतून जातें. मालतीची सुस्थिती पाहून एका डोळ्यांतून आनंदाश्रु व पद्मेची अनुकंपनीय दुःस्थिति पाहून दुसऱ्या डोळ्यांतून दुःखाश्रु जों येत आहेत तोंच आण्णासाहेबांची राक्षसी मूर्ति पुढें उभी पाहून वाचकाच्या त्वेषाची कमान इतकी चढते कीं, 'या मनुष्याचा एकदम खूनच करून

टाकावा' असें वाटून त्याच्या मुठी वळावयास लागतात. पण्भेवर बहिणी-पेक्षांही जास्त प्रेम करणारा मालतीचा भाऊ वसंतराव व डॉ. भवानराव या जोडीचा उदार, प्रेमळ व सात्त्विक असा स्वभाव पाहून वाचकांच्या तोंडून धन्योद्गार निघतात तोंच दिगंबरपंत व कृष्णाजी-पंत ही दांभिक, कुटाळ व धर्माच्या नांवाखालीं कृष्णकारस्थानें कर-णारी धार्मिक बकांची जोडी पुढें उभी राहते व जगाचा एकप्रकारें वीट येऊन खरच, जग हें असें आहे' म्हणून वाचक उद्विग्न होतो. तसेंच खरें सुख पैशांत नसून सदाचरणांत व सात्त्विक प्रेमांतच तें आहे हें सिद्ध करणारें अनाथ, दरिद्री व प्रेमळ असें तें पांच भावांचें कुटुंब पुढें दिसूं लागतें व दुष्टांचे अनेक छळ सोसल्यानंतर त्यांना शेवटीं सुख झालेलें पाहून आपल्याला खरा सुखाचा मार्ग सांपडला असें वाटून वाचकांच्या मनाला शांती मिळेल. (आपटे)

**मानवी आशा विरुद्ध देवाची इच्छा**—गुजराथचा नबाब बहादूरशहा यानें चितोडवर स्वारी केली असतां किल्ल्यांतील रजपूत कन्यांनीं पुढील विटंबनेंतून वाचण्यासाठीं मुद्दाम पेटविलेल्या चितेंत स्वतःची अहुती कशी दिली याचें चित्र या कादंबरींत रेखाटलें आहे. ( आपटे )

**मानसपूजा**—देशांत प्रसन्न व संतुष्ट माता निर्माण होण्यास सध्याच्या विवाहाच्या चालींत कालमानाप्रमाणें फेरफार करणें किती अवश्य आहे ह्याची कल्पना, ' चांद 'ची (कादंबरीतल्या नायिकेची) हकीगत वाचून वाचकांना होईल.

**मानसिक यातना**—मि. हेनरी वुडच्या 'A life's secret' या कादंबरीचें रूपांतर. ( दातार )

**मुरारराव**—गुप्त पोलिसाच्या चातुर्यासंबंधीं ही एक चटकदार गोष्ट आहे. (राजारामीयन)

**मूर्तिमंत गुलामागिरी**—Uncle Tom's Cabin चें रूपांतर. ( गोखले )

**मूर्तिमंत देशाभिमान**—राजाराम महाराजांच्या कारकीर्दीच्या वेळीं मराठी राज्याची आणि समाजाची स्थिति कशी होती याचें सुंदर चित्र या कादंबरींत रेखाटलें आहे. (आपटे)

**मृण्मयी**—बंकिमचंद्राच्या ' कपाल कुंडला ' ह्या बंगाली कादंबरीच्या आधारें लिहिलेली एक गोष्ट. (पेशवे)

**रजपूतकुमारी तारा**—दारा व औरंगजेब या दोघांचें प्रेम जडलेल्या एका रजपूत राजकन्येची गोष्ट. जिच्यांत त्यांचे प्रयत्न निष्फल झाले असून तारेस या कुचंबळणींतून उदेपूरच्या राण्यानें सोडविलें आहे. (आनंदीरमण)

**रजपुतांचा भीष्म**—एका उदारमनस्क रजपूत राजपुत्रानें आपल्या सापत्न भावासाठीं राज्यावरील आपला हक्क कसा सोडला हें दाखविणारी कादंबरी. ( आपटे )

**रमा आणि माधव**—' पन्नाशीची झुळुक लागली बाइल दुसरी करूं नको ! ' असें लोक सांगत असतांही एका थेरड्या

नवरदेवानें कपाळाला बाशिंग बांधण्याचें धाडस करून आपली कशी फटफजीती करून घेतली यांचें चटकदार चित्र या पुस्तकांत दिलें आहे. ( मित्र )

**रहस्यभेद**—रेनाल्डकृत The Rye House Plot चें उत्कृष्ट रूपांतर ( दातार )

**रागिणी**—एक उच्च प्रतीची सामाजिक कादंबरी. विविध विषयावरील विद्वत्तापूर्ण व मार्मिक संवाद हा या कादंबरीचा एक विशेष असल्यामुळें हिला 'काव्यशास्त्रविनोद' हें उपनांव छान शोभतें. (जोशी)

**राजा तोडरमल**—यांच्या वेळच्या समाजस्थितीचें चित्र या कादंबरींत रेखाटलें आहे. नरेंद्रनाथाचें शौर्य, सरलेचें विशुद्ध प्रेम, महाश्वेतेची कठोर प्रतिज्ञा शकुनीचें भयंकर कपट, विमलेचा देवतास्वभाव व अमला—कमला यांचें निष्काम प्रेम यांचें वर्णन यांत केलें आहे. ( शांताराम )

**रूपनगरची राजकन्या**—ह्या कादंबरीचें मूळ कथानक कर्नल टॉड यांच्या इतिहासांतून घेतलें आहे. हें मूळ कथानक इतकें बहारीचें आहे कीं, तें सरळ गोष्टीच्या रूपानें जरी कुणी वाचलें तरी त्याच्या वृत्ति तल्लीन होतात. आपला हेतु तडीस नेऊं पाहणाऱ्या औरंगजेबाचीं कारस्थानें, इंदिरेचा व छोटूसिंगाचा रोषनार बेगमनें केलेला छळ, दुर्गादासाच्या कार्यक्षम मसलती, शिवसिंह व पद्मादासी यांच्या गूढ मसलती, अचलेश्वराचा वैकुंठयोगी, म्हातारा झालेल्या विजयसिंगाचा अभिमान व पाणीदारपणा, राजसिंगाची मुत्सद्देगिरी, प्रेमास बळी

पडलेल्या नयनपाळाचीं वेषांतरें व कामगिरी वगैरे प्रसंग इतके सुंदर व चटकदार साधले आहेत कीं, ते कोणत्याही सहृदय वाचकाचें चित्त तन्मय करून सोडतात रजपूत वीरांचें प्रखर क्षात्रतेज व रजपूत स्त्रियांची अंतःशुद्धीविषयीं विलक्षण दक्षता यांचें नयन मनोहर दर्शन ह्या कादंबरींत होतें आणि तें होत असतां वाचकांच्या उदात्त मनोवृत्तींचें आंदोलन सुरू होतें. ( आपटे )

**लताकुंजगूढ**—अविचाराचे दुष्परिणाम व त्यामुळें जन्मभर होणाऱ्या मानसिक यातना, आत्मसंयमनाचें व सच्छील वर्तनाचें थोर महत्व व निरपेक्ष प्रेमाची अलौकिक थोरवी यांचें चित्र या कादंबरींत उत्कृष्ट रीतीनें रेखाटलें आहे. तसेंच अव्यापारेषु व्यापार केल्यानें इतरांवर व अंतीं स्वतःवर कसे अनर्थ ओढवतात याचेंही यांत वर्णन आढळतें (परांजपे)

**लीला**—भाऊबंदकीनें घरादाराचें वाटोळें होऊन 'खोड्याचे कपाळीं गोटा' कसा बसतो याचें चित्तवेधक वर्णन या गोष्टींत केलें आहे. ( मित्र )

**लोकमित्र**—आपल्या गांवाची स्थिति सुधारण्यास झटणाऱ्या एका परोपकारी, उदार व तत्पर मनुष्याची वाचनीय गोष्ट (आपटे)

**वंगसूर्यास्त**—फंदाफितुरीच्या निंद्य कृत्यानें बंगालचें स्वराज्य कसें धुळीस मिळालें याचें करुणाजनक शब्दचित या ऐतिहासिक कादंबरींत वर्णिलें आहे. ( हडकर )

**वनज्योत्स्ना**—वनज्योत्स्ना नामक एका सुशिक्षित मुलीवर तिच्या खेडेगांवच्या एका उद्योगी व सच्छील तरुणाचें प्रेम जडतें, पण ती त्याच्या प्रेमास झिडकारते. पुढें विद्वत्तेमुळें 'महाराष्ट्र साहित्य-संमेलनांत' तिची तारीफ होते व तेथें एका बॅरिस्टराचें तिजवर प्रेम जडतें. हाच बॅरिस्टर एका आंग्ल तरुणीशीं विवाहबद्ध झालेला असतो, पण तिला फसवून तो इंग्लंडांतून इकडे येतो हें कोणास माहीत नसतें ही सुशिक्षित तरुणी त्याच्या प्रेमपाशात सांपडणार तोंच ती आंग्ल तरुणी अचानक हिंदुस्थानांत येऊन बॅरिस्टराचे कान उपटते. हा प्रकार पाहतांच वनज्योत्सना गांगरून जाते व निराश होत्साती पुन्हां आपल्या खेडवळ जिवलगाजवळ जाऊन शुद्ध प्रेमाची भिक्षा मागते व अखेर तोच तिचें पाणीग्रहण करतो. (रानडे)

**वाईकर भटजी**—'व्हिकार ऑफ वेकफिल्ड'चें उत्कृष्ट रूपांतर. (धनुर्धारी)

**विद्वान सोबती कीं कुशल गृहिणी**:—महाराष्ट्र स्त्रियांस उच्च शिक्षणाची अनवश्यकता दाखविणारी गोष्ट.

**विलक्षण भोळेपणा**—ही एक हास्यरसोत्पादक मौजेची कादंबरी आहे. भोळ्या बाळूची प्रत्येक कृति वाचकांना पोट-धरधरून हसवील. ( आपटे )

**विलासमंदिर**—मि. हेनरीवुडच्या Canonbury House या कादंबरीचें मनोरम रूपांतर. ( दातार )

**विहंगवृंद**—स्त्रीशिक्षण प्रौढविवाह, विधवाविवाह इत्यादि विषया-वरील या कादंबरींतील विचार मननीय आहेत ( नाथमाधव )

**शशांक**—राखालदास बानर्जी यांच्या एका ऐतिहासिक पुस्तकाच्या आधारें ही कादंबरी लिहिली आहे. हिच्यांत गुप्त साम्राज्याच्या उत-रत्या काळच्या परिस्थितीचें हुबेहुब चित्र रेखाटण्यांत आलें आहे. ( गुर्जर )

**शृंगेरीची लक्ष्मी**—ही नाना फडणवीसांच्या काळांतील रहस्य-पूर्ण कथा आहे. शृंगेरीच्या मठाच्या संरक्षणासाठीं नायिकेनें केलेल्या कारस्थनांची हकीकत अत्यंत मनोवेधक आहे. मुख्य कथेच्या ओघां-तच लेखकानें पेशवाईंतील समाजस्थितीही कौशल्यानें रंगविली आहे. ( भानु )

**शैशवसहचरी**—ही कादंबरी एका बंगाली कादंबरीच्या आधारें लिहिली आहे. आधींच बंगाली कादंबऱ्या गोड व रसाळ असतात, त्यांत मनोरंजक व गुंतागुंतीच्या कथानकांची व चित्तवेधक प्रसंगांची भर पडल्यामुळें ही कादंबरी बरीच उठावदार झाली आहे. ( रणदिवे )

**सगुणा**—सुगृहिणी ही परमार्थसाधनाची आडकाठी नसून उलट त्यास मदत करणारी एक शक्तीच आहे हें तत्व प्रतिपादन करणारी गोष्ट.

**सरस्वती**—दुसऱ्याचें कल्याण चिंतिल्याचा शेवटीं किती गोड परिणाम होतो आणि दुसऱ्याच्या घातपाताची इच्छा करणाराची शेवटीं

कशी दुर्दशा होते याचा ही कादंबरी वाचकांच्या मनावर चांगलाच ठसा उमटविते. ( कुळकर्णी )

**मावळ्या तांडेल**—शिवकालीन आरमारविषयक ऐतिहासिक कादंबरी. ( नाथमाधव )

**सुखाचा मूलमंत्र**—व्यायाम व तज्जन्य फायद्याचें विवेचन करणारी उत्कृष्ट सामाजिक कादंबरी. ( आपटे )

**सुधा**—रमेशचंद्र दत्त यांच्या Lake of palms या इंग्रजी पुस्तकाचें ही कादंबरी रूपांतर असून हिच्यांत वंगसंसाराचें प्रतिबिंब यथातथ्य व मार्मिक रीतीनें दाखविलें आहे. ( शारदाश्रमवासी )

**सुधारणेचा मनु**—सामाजिक सुधारणेचे दुष्परिणाम दाखविणारी कादंबरी. ( नरहरी )

**सुशील यमुना**—सन १८७९ तील वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडावरील हृदयस्पर्शी कादंबरी.

**संसार असार !**—संसार असार वाटून त्याचा त्याग केलेल्या परंतु संन्यास आश्रमाचा विरुद्ध अनुभव येऊं लागल्यामुळें फिरून संसारांत पडलेल्या एका इसमाची ही गोष्ट ' नवीन संन्यासी ' या बंगाली कादंबरीवरून लिहिली आहे ( गुर्जर )

**संसारांतल्या गोष्टी**—स्वयंपाकाची माहिती, आरोग्यरक्षणाचे नियम, गृहकृत्यांची व्यवस्था, जमाखर्चाचा हिशेब, वगैरे संसारोपयोगी अनेक विषयांचें यांत गोष्टींच्या रूपानें सुंदर विवेचन केलें आहे. ( हेर्लेकर )

**स्वर्गीय प्रेम**–एक जवळची नातेवाईक बाई आपल्या सुशिक्षित मुलीस केवळ पैशाच्या लोभानें श्रीमंत म्हाताऱ्याशीं लग्न करण्यास सांगते मुलीचें अनपेक्षित प्रेम पाहून म्हातारा निराश होऊन प्रवासास निघतो. वाटेंत त्याचे फार हाल होतात. वाटेंत एका उदारमनस्क स्त्रीच्या व तिच्या प्रियकराच्या सुश्रुषेनें बरा झाल्यावर तो वृद्ध त्या बाईच्या व तिच्या प्रियकराच्या नावें आपल्या सर्व इस्टेटीचें मृत्युपत्र करतो. पण अखेर त्या बाईचा प्रियकर हाच निष्काम प्रेम करणारी आपली पूर्वीची सुशिक्षित मुलगी आहे असें जेव्हां त्या वृद्धाला कळतें तेव्हां त्याच्या आनंदाला पारावार उरत नाहीं. ( गोखले )

**स्वराज्याचा श्रीगणेशा**–( १६४६–१६४८. ) शिवाजी महाराजांनीं तोरणा किल्ल्यावर स्वराज्याचें तोरण लाविलें व तेथें सांपडलेल्या खजिन्याच्या जोरावर दुसऱ्या किल्ल्याचें काम सुरू करून स्वातंत्र्याचा पाया घातला तो सर्व वृत्तांत या कादंबरींत आला आहे. परस्त्रीला मातेसमान मानणाऱ्या शिवाजीनें सुभेदाराच्या लावण्यसंपन्न व तरुण सुनेला वस्त्रालंकार देऊन परत पाठविलें हा प्रसंगही याच कादंबरींत आहे. बजाजी निंबाळकर मुसलमान झाला होता त्याला हिन्दुधर्मांत परत घेऊन राजांनीं स्वराज्य व स्वधर्म यांचें निकटवर्तित्व किती उत्कृष्ट रीतीनें दाखविलें तें या कादंबरींत मनोहर शब्दांत रंगविलें आहे. ( नाथमाधव )

**स्वराज्याचा कारभार**–( १६७४–१६८० ) राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनीं राजव्यवस्थेचें काम हातीं घेतलें त्यावेळीं

महाराजांनीं जी मांडणी केली त्याच पद्धतीनें मराठेशाहीचा कारभार चालला. पण त्या पद्धतींत ढिलाई झाली तेव्हांच मराठीशाहीची घडी विस्कटली. हीं तत्त्वें इतिहासकारांनीं नमूद केलीं आहेत; पण तींच तत्वें कशी व कां अमलांत आणलीं व त्याचे फायदे काय झाले हें विशिष्ट प्रसंग घेऊन या कादंबरींत लेखकानें स्पष्ट दाखविलें आहे. ( नाथमाधव )

**स्वराज्यावरील संकट**–( १६८०–१६८९ ) संभाजी-राजाच्या कारकिर्दीचा हृदयद्रावक वृत्तांत या कादंबरींत आला आहे. नुकत्याच स्थापन झालेल्या स्वराज्याच्या गादीवर असला राजा आल्या-मुळें महाराष्ट्राची कशी धूळधाण झाली हें या कादंबरींत कुशलतेनें दाखविलें आहे मदिरेच्या निषेंत गुंग होऊन नाचरंगाच्या आधीन झाल्यामुळें संभाजीच्या निधड्या शौर्याचा महाराष्ट्राला मुळींच उपयोग झाला नाहीं. स्वराज्याच्या गादीवर येणाऱ्या राजावर केवढी मोठी जबाबदारी असते व त्या पदासाठीं सर्व सुखांचा होम करणें किती जरूर असतें हें संभाजीच्या कारकिर्दीवरून स्पष्ट झालें. या कादंबरींत स्वामिभक्तीचा कडेलोट व फंदफितुरीचा कळस लेखकानें स्फूर्तिदायक व हृदयद्रावक रीतीनें वर्णिला आहे. ( नाथमाधव )

**स्वराज्याची स्थापना**–( १६६४–१६७४ ) बारीकसारीक संकटांनीं न डगमगतां वीर पुरुष कार्यसिद्धीचा मार्ग तसाच आक्रमण करीत राहिला कीं, त्याचा कस पाहण्याकरितां परमेश्वर त्याच्यावर संकटांचा घाला पाठवितो. या कादंबरींत शिवाजी राजांनीं औरंग-

जेब्राच्या तुरुंगाची व शाहजादीच्या गोड गोड शब्दांचीं बंधनें तोडून दक्षिणेंत परत येऊन स्वराज्याचा उद्योग पुनः अधिक जोमानें कसा हातीं घेतला हें सुरस रीतीनें दाखविलें आहे पुण्यांतील शाइस्तेखानावरील हल्ला, सुरतेची लूट, गड आला पण सिंह गेला, छत्रसालाची भेट वगैरे मनोवेधक प्रसंगही या कादंबरींत आले आहेत. (नाथमाधव)

**स्वामी पुडंभट**—हिन्दु समाजाच्या सध्याच्या अवनतस्थितीचा विचार ज्यांत केला आहे, असें एक ( कल्पित ) संन्याशाचें आत्मवृत्त. ( फडके )

**हिन्दुधर्म आणि सुधारणा**—हा ग्रंथ प्रथम एखाद्या कल्पित कादंबरीप्रमाणें मनोरंजनार्थ लिहिला आहे असें वाटतें. पण त्यांतील विषयाचा विचार करूं लागले म्हणजे तो तत्वविवेकाच्या दृष्टीनें लिहिला आहे, असें दिसून येईल. विद्वान् सुधारक आपलीं मतें कशीं मंडण करतात व त्याचे उलट धर्माभिमान्यांची इंग्रजी विद्येच्या ऐन अमदानींतही धर्मावर पूर्वश्रद्धा कां असते, हिन्दुधर्मात व जुन्या चालीरीतींत कोणत्या उत्कृष्ट प्रेरणा व उच्च मनोवृत्ती आहेत फाजिल सुधारणेमुळें कोणतें नुकसान घडून काय प्रसंग ओढवतील याचें योग्य ज्ञान देऊन दोन्ही बाजूंचा साधक बाधक विचार केलेला असा हा ग्रंथ आहे. ( गोळे )

---

# उपसंहार.

कादंबरीच्या गोष्टीलाही उपसंहार पाहिजे. कारण कादंबऱ्यांनाही उपसंहार असतो. त्यांना असो किंवा नसो, कथावाङ्मयविषयक जे विचार अस्थानीं प्रकट होण्याच्या शंकेमुळें आम्ही आतापर्यंत अप्रकटित ठेविले होते त्यांना एका छोटेखानी उपसंहारांतच जागा देणें आम्हांस अधिक इष्ट वाटलें.

आपल्या अर्वाचीन मराठी कथावाङ्मयाची ग्रंथसंख्या अदमासें हजार ग्रंथांची आहे, असें महाराष्ट्रवाङ्मयसूचीवरून कळतें आणि आपल्या एकंदर मराठी वाङमयाची ग्रंथसंपत्ति आजमित्तीस दहा हजार ग्रंथांची आहे असें धरून चालल्यास कथावाङमयाची ग्रंथसंख्या त्याच्या एकदशांश ठरते हें प्रमाण असमाधानकारक नाहीं.

या हजार ग्रंथसंख्येंत अर्ध्या कादंबऱ्या आहेत. परंतु कादंबऱ्या पांचशेंच आहेत, असा खेद करावयास नको. कथावाङमयांत चुटके, दंतकथा, कहाण्या, गोष्टी, आख्यायिका, फार्स, नाटकें व कादंबऱ्या इत्यादि एकंदर मनोरंजक वाङमयाचा समावेश केला पाहिजे. मोगऱ्यांच्या 'अभिनव कादंबरी' सारखें पद्यकथावाङमय असतें तें निराळेंच.

मराठी वाङम ांत नाट्यवाङमयाची ग्रंथसंख्या कथावाङमयाइतकीच मोठी आहे; परंतु खरें रंगभूम्योपयोगी नाट्यवाङमय फार थोडें असून, त्यांतील अर्ध्याहून अधिक पुस्तकें आजमित्तीस कथावाङमयांत

दाखल होऊं शकतील. जें कथानक केवळ श्राव्य अथवा पाठ्य असेल तें संवाद पद्धतीनें लिहिलेलें कथावाङ्मयच होय, इतकेंच नव्हें तर आज रंगभूमीवर दिसणारें नाट्यवाङ्मयही कालेंकरून याच सदरांत येऊन पडतें. कारण लौकिक व तत्काल आनंद देणारीं असल्याशिवाय नाटकें बहुशा लोकप्रिय होत नाहींत आणि तीं तशीं असल्याशिवाय नाटकमंडळ्यांचें व आपलेंही चालणार नाहीं. तें कसेंही, कालांतरानें अशीं नाटकें नाट्यवाङ्मय सदरांत ठेवलीं तरी निरुपयोगीच होत. प्रो. शि. म. परांजपे उत्तम नाटककार आहेत, हें खरें वाटत नाहीं. परंतु वस्तुतः त्यांनीं ‘ मानाजीराव ’ व भीमराव ’ हीं दोन वाचनीय नाटकें लिहिलीं आहेत. किर्तन्यांचीं ‘ जयपाळ ’ वगैरे नाटकें तर सोडूनच द्या, पण आजघटकेस नांवाजलेल्या खाडिलकरांसारख्यांचींही सर्वच नाटकें रंगभूमिवर कोठें येतात ? त्यांचीं ‘ प्रेमध्वज ’, ‘ बायकांचें बंड ’ इत्यादि नाटकें तर आजच मागें पडलीं आहेत व ‘ मानापमान ’ही कांहीं दिवसांनीं त्याच पंथास लागेल. एवंच, नाट्यवाङ्मय हें कथावाङ्मयाचें एक अभिन्न अंग नसलें तरी त्याचाच परिपोष होण्यास कारणीभूत होणारें आहे. असो.

स्वतंत्र, भाषांतरीत, रूपांतरीत, अनुवादित, परिवर्द्धित व संक्षिप्त असे कथावाङ्मयाचे अनेक प्रकार आहेत. त्यांचीं लक्षणें सांगण्याचें अथवा त्यांच्याविषयींचा साधकबाधक विचार करण्याचें हें स्थळ नव्हें. येथें फक्त यांतील कांहीं प्रकारांत उपलब्ध असलेल्या ग्रंथांविषयींचा विचार करणें पुरें आहे.

गोष्टींचें वर्गीकरण करण्याचें कारण नाहीं. त्याचें बंधन आपण फक्त कादंबऱ्यांसच घालूं आणि तसें केल्यास फक्त ११३ अद्भुत, ५५ ऐतिहासिक व १७० सामाजिक याप्रमाणें एकंदर ३३८ स्वतंत्र पुस्तकें मराठी कथावाङ्मयाचें सदर शोभवितात. ही संख्या सन १९१७ पर्यंतची आहे. आणि नंतरची ग्रंथसंख्या मोठी धरली तरी ४०० पलीकडे जाईलसें वाटत नाहीं.

परंतु स्वतंत्र पुस्तकांतील सर्वच कादंबऱ्या पहिल्या प्रतीच्या नाहींत आणि भाषांतरित अथवा रूपांतरित सर्वच कादंबऱ्या टाकाऊ नाहींत. उलट कांहीं रूपांतरित कादंबऱ्या स्वतंत्र कादंबऱ्यांसही खत्रीनें मागें टाकतील आम्ही तर थोडें या पुढें जातों आणि म्हणतों कीं, आपल्या हल्लींच्या एकंदर कथावाङ्मयांतून परपुष्ट असें एकंदर कथावाङ्मय निराळें केल्यास आपल्या हातीं जें राहील त्यांतून फारच थोडे ग्रंथ कथावाङ्मयाचा आधार समजले जातील आणि बाकीच्या कथा केवळ भाकडकथा ठरतील. तस्मात असें पृथःक्करण निदान प्रस्तुतसमयीं तरी इष्ट नाहीं.

आपल्या एकंदर अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा प्रारंभच मुळीं इंग्रजी राज्यापासून सुरू झाला आहे. तेव्हां मराठी कथावाङ्मया-वरही पहिल्यानें इंग्रजी कथावाङ्मयाचा पगडा बसावा हें साहजिक आहे. आम्हीं त्याच्यापासून फक्त कादंबरीलेखनाची पद्धत उचलून स्वस्थ बसलों नाहीं तर त्यांबरोबरच आम्हीं त्यांच्या चांगल्या चांगल्या व कित्येक सटरफटर कादंबऱ्यांनाही मराठी पेहराव चढविला.

स्कॉट, लिटन, गोल्डस्मिथ, स्विफ्ट, डिफो, ऑस्टेन, कॉरेली, इलिएट व मिसेस वुड इत्यादि पाश्चात्य स्त्रीपुरुष लेखकांच्या बऱ्याच कादं- बऱ्यांचा परिचय आम्हांस या अवधींत झाला आहे.

अशा ग्रंथकारांचीं कांहीं पुस्तकें मराठी कथावाङ्मयांत आज इतकीं एकजीव झालीं आहेत कीं, त्यांचें मूळ सांगणेंही आज आपणास नकोसें होईल उदाहरणार्थ, अनाथ पांडुरंग कुवलयपुरची राणी कुमुद्वति, केवळ स्वार्थापायीं, ठगाची जबानी, दुःखाअंतीं सूख, नाट्यमकरंद, मोचनगड मौनयौवना, वांईकर भटजी व हरि आणि त्रिंबक वगैरे लहान मोठ्या कादंबऱ्या इतक्या चांगल्या साधल्या आहेत कीं, त्यांचें रुपांतरित्व त्यांच्याविषयींच्या आदरांत मुळींच कमीपणा आणीत नाहींत.

इंग्रजी खालोखाल नव्हें तर या बाबतींत जिनें इंग्रजीसही मागें टाकलें आणि मराठी कथावाङ्मयाच्या समृद्धीस बहुमोल मदत केली अशी दुसरी एखादी भाषा असेल तर ती बंगाली ही होय. ज्या बंगालनें दुसऱ्याही कित्येक बाबतींत महाराष्ट्राच्या पुढें उडी मारली आहे. त्यानें कथावाङ्मयाचे बाबतींतही महाराष्ट्रावर सरशी करावी हें ठीकच आहे. त्यांच्या कथावाङ्मयाचें संख्याबल आम्हांस माहीत नाहीं; परंतु आम्हींही त्यांच्या थोडथोडक्या नाहीं तर १२६ कादंबऱ्या आतापर्यंत अनुवादिल्या असून त्यांपैकीं कित्येक कादंबऱ्या लोकप्रियतेच्या बाबतींत स्वतंत्र ग्रंथांनाही मागें टाकतील हें मात्र आम्हीं खात्रीनें सांगू शकतों. पाश्चात्यांप्रमाणें यांच्यांतीलहीं

बंकिमचंद्र, रोमेशचंद्र दत्त, दामोदर मुखोपाध्याय, हरिसाधन मुखोपाध्याय, ननिलाल बंधोपाध्याय व स्वर्णकुमारी इत्यादि प्रमुख स्त्रीपुरुष लेखकांचे ग्रंथ मराठींत आले असून, चितळे, भसे मित्र, गुर्जर, भांगले, फाळके, जानकीबाई देसाई, व वा. गो. आपटे इत्यादि नामंकित कादंबरीकारांचे बहुतेक ग्रंथ बंगालींतूनच मराठिलेले आहेत, इतकेंच येथें सांगितलें असतां पुरे. यावरून बंगालीचें ज्ञान महाराष्ट्रीयांस मुबलक दिसतें परंतु हा आमचा भ्रम आहे. बंगालींतून आलेल्या हिन्दी पुस्तकांचें भाषांतर अथवा रूपांतर करून त्यांस बगालीचा हवाला देणें महाराष्ट्रीयास अधिक प्रौढीचें वाटल्यासारखें दिसतें. हो. नाहीं तर बंगालीचें इतकें उत्तम ज्ञान आम्हांस कोठून होणार!

वंगालीपेक्षां मुसलमानी, हिन्दी, गुजराथी वगैरे भाषांचा परिचय महाराष्ट्रियांस अधिक व्हावयास हवा. पण तसें दिसत नाहीं गुजराथींतून करण वाघेला, भद्रंभद्र, चंद्रकान्त, सरस्वतिचंद्र, गुणसुंदरी, स्त्रियांचा स्वर्ग व हिंद आणि ब्रिटानिया इत्यादि आठ दहा पुस्तकें मराठींत आलीं आहेत, तर मुसलमानी, हिन्दी वगैरेंतून तीं मुळींच आलीं नाहींत असें दिसतें. आणि महाराष्ट्रवाङ्मयसूचीवरून पाहतां मराठी कथावाङ्मयात कानडी, तेलुगु, तामिळ व आंध्र इत्यादि द्राविड भाषांच्या कथावाङ्मयाचा धागा कोठेंच आढळून येत नाहीं. या भाषांतील वाङ्मयांत कदाचित् विपुल व आकर्षक कथावाङ्मय नसावें अथवा या भाषा महाराष्ट्रियांस कदाचित् अद्यापि चांगल्याशा परिचित झाल्या नसाव्यात. आम्हांस हीं दोन्ही कारणें

संभवनीय वाटतात. तें कसेंही असो; इंग्रजी व बंगाली या दोनच भाषांतील कादंबऱ्यांचा आमच्या मराठी कथावाङ्मयावर विशेष पगडा बसला आहे, हें खास

परंतु आमच्या माहितीप्रमाणें पाहतां अखिलभारतीय कथावाङ्मयांत बंगाली खालोखाल मराठीचाच नंबर लागेल. बंगाली सोडून दिल्यास मराठी कथावाङ्मयच विशेष भारदस्त तसेंच विपुल आहे मराठी कादंबरीकारच जास्त शोधक, जास्त बुद्धिमान् व जास्त कार्यप्रवण दिसून येतात. ज्या मराठी कथावाङ्मयांत धनुर्धारी, शं. मो. रानडे, ना. वि. बापट, ह. ना. आपटे, वि. त्रिं. मोडक, सहकारीकृष्ण, ग. वि. कुळकर्णी व का. र. मित्र यांच्यासारखे मार्मिक कादंबरीकार चमकून गेले व ज्यांत वा. सं गडकरी, वि सी. गुर्जर, ना. ह. आपटे, गो. ना. दातार व नाथमाधव, सी. के. दामले व वा. म जोशी यांच्यासारखे उत्कृष्ट कादंबरीकार यांत आहेत त्या मराठी कथावाङ्मयांत भविष्यकाळींही अशींच नामांकित रत्नें निर्माण झाल्याशिवाय खात्रीनें राहणार नाहींत.

हिन्दी भाषेंतही ग्रंथरचना विपुल होत आहे; पण तीही बंगालीवरूच. हिंदी कादंबरीकारांचाही ओढा बंगालीकडेच जास्त. त्यांच्यांतही प्रेमचंदासारखे कादंबरीकार, मैथिलीशरण गुप्त यांच्यासारखे कवि व श्रीवास्तव यांच्यासारखे नाटककार अगदीं बोटावर मोजण्याइतके आहेत. बाबू शामसुंदरदास, रामचंद्रवर्मा, रूपनारायण पांडेय, चांदकिरण शारदा, शिवसहायचतुर्वेदी, दुलारेलाल भार्गव,

महावीरप्रसाद द्विवेदी इत्यादि मंडळींची कामगिरीही वाखणण्यासारखी असते.

या हिन्दी पंडितांस बंगालीनें जरी पूर्णपणें मोहून टाकल्यासारखें दिसतें, तरी मराठीही त्यांस आपलें तेज दाखविल्याशिवाय रहात नाहीं. मराठींतील विविध प्रकारचें वाङ्मय हिंदींत बऱ्याच दिवसापासून जात आहे. तसें कथावाङ्मयही गेलें आहे. भा. वि. फडकेकृत ' जेव्हां सूर्योदय होईल ', ह. ना. आपटे कृत ' सूर्योदय ' व वा म. जोशीकृत ' रागिणी ' वगैरे महत्वाच्या कादंबऱ्या हिंदींत गेलेल्या पाहून जसा आनंद तसा अभिमान वाटतो.

गुर्जरभाषेसही मराठीनें शह दिला असून तिच्यांतही ह. ना. आपटे यांचीं व इतर एक दोन कादंबरीकारांचीं पुस्तकें पाहण्यांत आलीं आहेत. उलट आपणही त्यांच्या चंद्रकान्त, सरस्वतिचंद्र या उच्च प्रकारच्या कादंबऱ्या मराठींत आणिल्या आहेत.

कथालेखनाची हातोटी आतां महाराष्ट्रीयांस चांगली साधली आहे. ते आतां एखादी गोष्ट जशी पांच पानांत लिहूं शकतील, तशी तिला ते आतां पांचशें पृष्ठांची कादंबरी बनवूं शकतील. ते आता विद्वानांच्या माना डोलविणाऱ्या कादंबऱ्या जशा तयार करूं शकतात, तशा त्या लहान दहा वर्षांच्या मुलांसाठींही तितक्याच सफाईनें लिहूं शकतात. त्यांनीं तरुणांचीं मनें बिथरविणारें जसें कथावाङ्मय निर्माण केलें आहे, तसें त्यांना ताळ्यावर आणणारें

कथावाङ्मयही तयार केलें आहे. अशक्तास सशक्त करणारें, अज्ञानास ज्ञान देणारें, सामाजिक घडामोडींचें प्रतिबिंब उठविणारें, वैराग्य बाणविणारें अथवा उलट जगतावर प्रेम करावयास लावणारें आणि केवळ मनोरंजक असें कथावाङ्मयही त्यांच्या हातून तयार झालें आहे व होत आहे. या सामर्थ्याचा उपयोग त्यांनीं कसा करावा हें त्यांना कोणी सांगावयास नको. महाराष्ट्राची परंपरा, त्याचा राष्ट्रीय दर्जा, त्याची श्रेष्ठ संस्कृति व त्याचें उज्वल भविष्य त्यांना निःसंशय सन्मार्गावरच ठेवील.

# शुद्धीपत्र.

| अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ | ओळ |
|---|---|---|---|
| योमेन | योगेन | १ | १ |
| आगरकानी | आगरकरांनीं | ४ | २१ |
| सतरीन | उतरीन | १४ | ९ |
| बृहकथामंजरी | बृहत्कथामंजरी | १५ | ६ |
| हातो | होता | १५ | ७ |
| स्वाहासुकारचंपु | स्वाहासुधाकरचंपु | १७ | ५ |
| आम्हस | आम्हांस | १८ | ११ |
| राजधानाची | राजधानी | १९ | ३ |
| एकसमयाच्छेदंछरून | एकसमयावच्छेदेंकरून | २० | ११ |
| उभे रारिले | उभे राहिले | २२ | १ |
| कवळ | केवळ | ३३ | १ |
| वाखाखण्यासारख्या | वाखाणण्यासारख्या | ४४ | ४ |
| पण हल्लीं | पण दुसरीनें हल्लीं | ४९ | १९ |
| असंद्धता | असंबद्धता | ५२ | ८ |
| रामजो | रामजी | ५२ | १४ |
| मौल्यावान | मौल्यवान | ५३ | ४ |

| अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ | ओळ |
|---|---|---|---|
| स्वाधान | स्वाधीन | ६५ | १९ |
| सासुरवासा | सासुरवास | ८५ | ७ |
| आधारच्चित | आधाररचित | ८६ | ९ |
| जम्मास | जन्मास | ८८ | २० |
| अभिलाबबुद्धीनें | अभिलाषबुद्धीनें | १३५ | २० |
| बालविवांची | बालविधवांची | १४३ | १३ |
| शब्दचित | शब्दचित्र | १५२ | १९ |

# श्री सयाजीग्रंथमालेंतून प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांची यादी.

## ( १ ) श्रीसयाजीसाहित्यमाला.

| ग्रंथानुक्रम. | ग्रंथाचें नांव. | किंमत. |
|---|---|---|
| १ | **संस्कृत वाङ्मयाचा इतिहास–( इतिहासगुच्छ )–** लेखक रा. रा. सीताराम वासुदेव पेंडसे बी. ए., एम् सी. पी., एफ्. आर. सी. आय., Macdonnel's History of Sanskrit Literature ह्या पुस्तकाचें भाषांतर. वेदकाळ, वेदांतील कविता, तत्त्वविचार, सामाजिक स्थिति, ब्राह्मणग्रंथ, सूत्र, पुराण, काव्य, नाटक, तत्त्वज्ञान, वगैरे विषयांचा इतिहास या पुस्तकांतून देण्यांत आला आहे. | २–८–० |
| १० | **बालोद्यानपद्धतीनें गृहशिक्षण–(शिक्षणगुच्छ) सचित्र–** लेखक रा रा वासुदेव गोविंद आपटे बी ए. Kindergarten Teaching at Home ह्या ग्रंथाचा अनुवाद. पाठ कसा द्यावा याचा विचार, शिक्षणाचें साधन या दृष्टीनें खेळाचा विचार, वाचन व लेखन शिकविणें, प्राथमिक गणित, हातकाम, शाळेंतल्या इतर विषयांतले प्राथमिक पाठ, एक आठवड्यापुरत्या अभ्यासाचें पत्रक, इतके विषय ह्या ग्रंथांत दिले आहेत; आणि यावरून घरीं लहान मुलांना शिकवितां येतें | ०–८–० |
| १५ | **सुधारणा आणि प्रगति–( प्रकीर्णगुच्छ )–**द्वितीयावृत्ति. लेखक रा. रा. दाजी नागेश आपटे बी. ए , एल्एल्. बी. Crosier's Civilization and Progress ह्या ग्रंथाचा अनुवाद. | |

| ग्रंथानुक्रम. | ग्रंथाचें नांव. | किंमत. |
|---|---|---|
| | प्रमाणाचिकित्सा, साध्यमीमांसा, विषयविवेचन आणि उपसंहार ह्या चार परिच्छेदांतून इतिहास, सुधारणेचा मार्ग, परिस्थितींचें समीकरण, समाजरचना, जनताधर्म, धर्मसाधन, राजकीय अनुशासन वगैरे विषयांचें उत्कृष्ट विवेचन केलेलें आहे. ग्रंथ फार उपयोगी व लोकप्रिय झाला आहे व ाचें गुजराथी व हिंदी या भाषांतून भाषांतर झालें आहे. | ३–०–८ |
| २१ | **शिस्त–( प्रकीर्णगुच्छ )**–लेखक कर्नल नानासाहेब शिंदे व मेजर के. एन्. सावंत, स्वतंत्र मराठी पुस्तक. लष्करी दृष्टीनें गृहशिक्षण, शाळाशिक्षण, खेळ, व्यवहार वगैरेंतून शिस्तीची उपयुक्तता, नीतिविषयक, व धार्मिक शिस्तीचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार, हे विषय ह्या ग्रंथांत दिले गेले आहेत. | १–०— |
| २३ | **दीघनिकाय भाग १ ला–( धर्मगुच्छ )**–लेखक रा. रा. चिंतामण वैजनाथ राजवाडे एम्. ए., बी. एससी. पाली भाषेंतील ग्रंथाचें भाषांतर. बौद्धपंथाचा मूळ ग्रंथ 'त्रिपीटक' याचे तीन भाग आहेत. त्यापकीं 'सुत्तपिटकां 'तून बुद्ध भगवानानें वेळोवेळीं केलेल्या उपदेशांचा संग्रह केला आहे. त्याचे पांच भाग आहेत; त्यांपैकीं ' दीघनिकाय ' हा एक भाग आहे. त्यांत मोठ्या सूत्रांचा संग्रह केला आहे त्यांचें हें भाषांतर आहे. | १–८— |
| ३९ | **हिंदुस्तानचा लष्करी इतिहास व दोस्त राष्ट्रांच्या फौजा–( प्रकीर्णगुच्छ )**–लेखक कर्नल नानासाहेब शिंदे. स्वतंत्र मराठी पुस्तक ह्या ग्रंथांतून वेदकालापासून आधुनिक काळापर्यंतचा लष्करी इतिहास दिला आहे; इतकेंच नव्हे तर देशी संस्थानें, इंग्रज सरकार, ग्रेटब्रिटन, फ्रेंच, रशियन, इटालियन, अमेरिकन व जर्मन या राष्ट्रांच्या फौजा ह्या संबंधानेंहि हकीकत दिलेली आहे. | २–८–० |

| ग्रंथानुक्रम | ग्रंथाचें नांव. | किंमत. |
|---|---|---|
| ४१ | **महाराजा शिवाजी**-( चरित्रगुच्छ )-लेखक रा. रा. सीताराम वासुदेव पेंडसे बा. ए., एफ्. आर. सी. आय्., एम. सी. पी. स्वतंत्र मराठी पुस्तक. यांत महाराष्ट्रवीर शिवाजी महाराजांचे चरित्र दिलें आहे. | १-६-० |
| ६५ | **हिंदुस्तानचा अर्वाचीन इतिहास**-मराठी रियासत (मध्य विभाग). इतिहासगुच्छ. द्वितीयावृत्ति. लेखक रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए. स्वतंत्र मराठी पुस्तक. अनेक आधारांचें दोहन करून छत्रपति शाहू महाराजांचा इतिहास व बाळाजी विश्वनाथाच्या उदयापासून बाजीरावानें दिल्लीवर स्वारी केली तेथपावेतों जो इतिहास घडला त्याची हकीकत व बाजीरावाची योजना आणि त्यांचें जीवनचरित्र यांत दिलें आहे | २ १२-० |
| ६६ | **हिंदुस्तानचा अर्वाचीन इतिहास** ( मध्यविभाग भाग )-१७४०-१७६१-इतिहासगुच्छ. लेखक रा. रा. गोविंद स. सरदेसाई बी. ए स्वतंत्र. नवीन पेशव्याच्या उपक्रमापासून इंग्रज लोकांची हकीकत देऊन नागपुरकर भोसल्यांपर्यंतची सगळी उपयुक्त हकीकत ह्या ग्रंथांत दिली आहे. | ३ -०-० |
| ६८ | **सदर-मध्यविभाग १७४०-१७६१ पानिपत प्रकरण. इतिहासगुच्छ**-लेखक रा. रा. गो स. सरदेसाई बी. ए. स्वतंत्र मराठी ग्रंथ. यांत रघुनाथरावाच्या पहिल्या स्वारीपासून पानिपतच्या भयंकर रणसंग्रामापर्यंतची माहिती देण्यांत आली आहे. | २-४-० |
| ७३ | **जबाबदार राज्यपद्धति**-( प्रकीर्णगुच्छ )-लेखक स्व० महादेव रामचंद्र भिडे एम्. ए. स्वतंत्रग्रंथ. लोक आणि लोकमत | |

ग्रंथानुक्रम. ग्रंथाचें नांव. किंमत.

प्रतिनिधी आणि प्रतिनिधींच सभा, कायदे घडणारी मंडळी, हुकुमांची अम्मलबजावणी राज्यबंधारण, वगैरे विषयांच्या संबंधानें उपयुक्त माहिती दिली आहे. ०-१३-६

६४ **मिरांबाई-( चरित्रगुच्छ )**-लेखक-रा. रा. दाजी नागेश आपटे बी. ए., एल्एल्. बी. गुर्जर कवयित्री मिरांबाईच्या संबंधानें ह्या ग्रंथांत संपूर्ण माहिती दिली आहे. ०-१५-०

६९ **इंग्रजी शिष्टाचार ( प्रकीर्णगुच्छ )**-लेखक रा. रा. चिंतामण विनायक जोशी, एम्. ए. Webb's English Etiquette ह्या ग्रंथाचें भाषांतर. यांत शिष्टाचाराचे सामान्य नियम, भेट घेणें, व्हिझिटिंग कार्ड, उपवन संमेलन, भोजनसमारंभ, वाटेंत भेटण्याच्या प्रसंगाचे शिष्टाचार, दरबार, विवाहसमारंभ, प्रवास, सार्वजनिक ठिकाणें, गृहशोभा, सेवकांचा शिष्टाचार, त्यांचें काम, इतक्या विषयांचें विवेचन केलें आहे. ०-१४-०

८४ **पार्लमेन्ट-( इतिहासगुच्छ )**-लेखक-रा. रा. दाजी नागेश आपटे बी. ए., एल्एल्. बी. 'Parliament' by Sir Courtney P. Ilbert, या ग्रंथाचा अनुवाद. पार्लमेंटची उत्पत्ति आणि वाढ, कॉमन्स सभेची घटना, कायदे करण्याची पद्धति, जमाबंदी व राज्यकारभार, सभेचें अधिवेशन व कार्यपद्धति, सभेची कार्यव्यवस्था, सभासद व मतदारसंघ, सभेचें दफ्तर, छापखाना व लौकिकसंघ, हाऊस ऑफ लॉर्डस् व तुलनात्मक विवेचन, इतक्या प्रकरणांत मुख्य विषयाचें सुंदर विवेचन केलें आहे. १-८-०

८४-८५ **सनईवादन पाठशाळा**-पुस्तक तिसरें. (विज्ञानगुच्छ). लेखक रा. रा. गणपतराव पिराजी वसईकर.

| ग्रंथानुक्रम. | ग्रंथाचें नांव. | किंमत. |
|---|---|---|
| | स्वतंत्र पुस्तक १ | ०-१२-० |
| | ,, पुस्तक २ | ०-८-० |
| | ,, पुस्तक ३ | १-२-० |
| | सदर पुस्तक ४ | १-१२-० |

मनई कशी वाजवावी हें ह्या ग्रंथांतून शास्त्रीय रीतीनें दाखविलें आहे.

८६ **सगुणोपासना व मूर्तिपूजा**–स्वतंत्र. लेखक रा. रा. शिवराम महादेव फडके. मूर्तिपूजेच्या संबंधानें संपूर्ण माहिती ह्या ग्रंथांत दिली आहे. १–८–०

८७ **नागरिकांचीं कर्तव्यें–( प्रकीर्णगुच्छ )** लेखक रा. रा. कृष्णाजी गंगाधर गोगटे, बी. ए. यांत कुटुंब, शाळा, समाज, राज्य, ब्रिटिश राज्य, बडोदें राज्यांतील स्थानिक स्वराज्य, ग्रामपंचायत, वगैरे विषयांच्या संबंधीं नागरिकांचीं कर्तव्यें दाखविलीं आहेत. ०-१४-०

८८ **सजीव सृष्टीची उत्क्रांति–( विज्ञानगुच्छ )**–सचित्र लेखक रा. रा. सदाशिव नारायण दातार एम्. ए., बी. एस्सी. स्वतंत्र. ह्या ग्रंथांत उत्क्रांतीबद्दलचें ऐतिहासिक विवेचन, नैसर्गिक संमति, निषदसंबंधीं संमति, मानवजातीची उत्क्रांति, मनुष्यासारखे वानर, मनुष्य वानरांपासून उत्पन्न झाला आहे कीं काय, पशूंचें मन व त्यांची बुद्धि, मनुष्यांची मानसिक उत्क्रांति, इत्यादि विषयांची चर्चा केली आहे. २-१५-०

९० **मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया–( इतिहासगुच्छ )**– लेखक कर्नल नानासाहेब शिंदे स्वतंत्र. ह्या ग्रंथांत मराठ्यांच्या मुख्य मुख्य लढायांचें सविस्तर वर्णन केलें आहे. ३–०–०

९१ **यामिकप्रदीप, सचित्र, प्रथम भाग ( विज्ञानगुच्छ )**– लेखक रा. रा. सखाराम विनायक आपटे एम्. ए., बी. एस सी.

| ग्रंथानुक्रम. | ग्रंथाचें नांव. | किंमत. |
|---|---|---|
| | स्वतंत्र, ह्या ग्रंथांत यंत्रशास्त्राच्या विविध विषयांची सविस्तर हकीकत देण्यांत आली आहे. | |
| ९४ | **बडोद्याचें मराठी साहित्य-(प्रकीर्णगुच्छ)**-लेखक रा. रा. गणेश रंगनाथ दंडवते स्वतंत्र. बडोदें राज्यांत आजपावेतों प्रसिद्ध झालेल्या मराठीग्रंथांची सविस्तर माहिती यांत दिली आहे. | ०-११-० |
| ९८ | **अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें-( इतिहासगुच्छ )**-लेखक रा. रा. विनायक सदाशिव वाकसकर. स्वतंत्र ह्यांत मराठ्यांच्या इतिहासांतील अज्ञात ऐतिहासिक व्यक्तींच्या संबंधानें आजपावेतों अप्रसिद्ध राहिलेली हकीकत देण्यांत आली आहे | १-०-० |
| ११२ | **तत्त्वज्ञानांतील कूटप्रश्न**-लेखक-रा. रा. दाजी नागेश आपटे बी. ए., एल्एल्. बी. पाश्चात्य व पौरस्त्य अशा दोन्हा पद्धतींच्या तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करण्यास उत्तम ग्रंथ यांत नित्य व्यवहारांतील दृष्टांतांचे द्वारें सर्व विषय सोप्यापासून अवघड या रीतीनें समजाविला असल्यानें विद्यार्थ्यांस तो फार सुलभ व रसाळ झाला आहे. | १-०-० |
| ११३ | **सुबोध कथामाला**-लेखक रा. रा. दाजी गोविंद चिपळोणकर-या पुस्तकात एकंदर साठ गोष्टी असून त्या नेहमीं व्यवहारांत घडणाऱ्या व पदोपदीं त्यांचा आपणांस अनुभव येण्यासारख्या आहेत. लहान मुलांच्या मनावर यांतील नीतितत्त्वांचा चांगलाच परिणाम घडण्यासारखा आहे. शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस गणित, भूगोल, व्याकरण व इतिहास हे विषय जसे त्यांचे शिक्षक त्यांस मनापासून शिकवितात, त्याचप्रमाणें शिक्षकानें शाळेंत व आईबापांनीं घरीं, नीतिशिक्षण हें आपल्या मुलांस अवश्य दिलें पाहिजे. | ०-१५-० |

११४ **सुप्रजाजननशास्त्र**—लेखक रा. रा. गजानन नारायण मोडक बी. एजी. सुप्रजाजननशास्त्रावर पाश्चात्य देशांत अनेक ग्रंथ तयार झाले असून त्याच धर्तीवर मराठी भाषेंत हें पुस्तक तयार करण्यांत आलें आहे. उत्तम प्रकारची संतति कशी निर्माण करतां येईल, हें या पुस्तकांत उत्कृष्ट तऱ्हेनें दाखविलें आहे. ० १२ ०

१२० **मुक्या मुलांचें गृहशिक्षण**—लेखक रा. रा. पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर. मूकशिक्षण आपल्या देशांत नवीन आहे युरोप, अमेरिका वगैरे खंडांतून तें रूढ झालें आहे. त्याविषयीं एक ओळहि आपल्या देशांतील भाषांतून कोठून सांपडणार ? मराठींत हें पुस्तक पहिलेंच आहे मुक्या व बहिऱ्या मुलांच्या पालकांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें. ०-१४-०

३२०८
प्रत
REFBK-0003294

## ( २ ) श्रीसयाजीबालज्ञानमाला.

४७ **छत्रपति संभाजी महाराज-( चरित्रगुच्छ )**-लेखक रा. रा. केशव मंगेश रांगणेकर बी. ए. ह्या लहान ग्रंथांत छत्रपति संभाजी महाराजांचें संपूर्ण जीवनचारित्र दिलें आहे. ०– –८

४८ **महाराणा प्रताप ( चरित्रगुच्छ )**-लेखक परशुराम काटदरे बी. ए. यांत सुप्रसिद्ध क्षत्रियवीर महाराणा प्रताप यांचें सविस्तर चरित्र देण्यांत आलें आहे. ०–६

६० **कोषांचें वर्णन-( विज्ञानगुच्छ )**-लेखक रा. रा. रघुनाथ बळवंत फलणीकर बी. ए. प्राणिशास्त्रासारख्या नीरस विषयासंबंधीचें हें पुस्तक फार सुबोध व सरस उतरलें आहे. आपल्या शरीरामध्यें जे Cells (कोष) म्हणून असतात, त्यांच्यासंबंधानें संपूर्ण शास्त्रीय माहिता त्यांतून मिळते. ०–६–०

७१ **विलियम एवर्ट ग्लॅडस्टन— चरित्रगुच्छ )**--लेखक रा. रा. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. यांत सुप्रसिद्ध इंग्रज राजनीतिनिपुण ग्लॅडस्टन साहेब यांचें सविस्तर चरित्र देण्यांत आलें आहे. ०–६–०

७२ **संपत्ति व भांडवल-( विज्ञानगुच्छ )**-लेखक रा. रा. भास्कर त्रिंबक काळे, बी. ए. प्रस्तुतसारख्या शास्त्रीय विषयावर हें पुस्तक सोप्या व सरळ भाषेत लिहिलें आहे ०–६–०